नाम्रा ७५/१८ मि

# मराठीकविमंडळ

( काव्यरत्नावली मासिक पुस्तक. )

सन १९०४

## ग्रंथ १६ वा.

किंमत १ रुपया.

पत्ता—एन्. एन्. फडनीस जळगांव खानदेश.

बाबजी प्रिंटिंग प्रेस जळगांव खानदेश.

# अनुक्रमणिका.


| कवि, विषय व पद्यसंख्या | पृष्ठांक |
|---|---|
| १ विठ्ठल भगवंत लेंभे ( कविता ४९३ ) | |
| ९९ सुरतरंगिणी काव्य सर्ग १ ला | १ |
| ११८ सर्ग २ रा | १७-२१ |
| ७० सर्ग ३ रा | ४९ |
| ९९ सर्ग ४ था | ६१ |
| ६७ सर्ग ५ वा | ८१ |
| ४८ सर्ग ६ वा | ९७ |
| २ माधवानुज कविता ( २६१ ) | |
| १७२ मेघनादवध ( सर्ग १ ला ) | १२९ |
| ९१ मेघनादवध ( सर्ग २ रा ) | १४९ |
| ३ गणेश-सुत गुगे ( कविता १६९ ) | |
| ३४ श्रीसुदामचरित्र सर्ग १ ला | ५१ |
| ३१ सर्ग २ रा | ७४ |
| २५ सर्ग ३ रा | ११३ |
| २५ सर्ग ४ था | १५३ |
| २९ सर्ग ५ वा | १६१ |
| २५ सर्ग ६ वा | १८९ |
| ४ बाळकृष्ण अनंत भिडे बी. ए. ( कविता ८८ ) | |
| १० काळ आणि दुष्काळ | ११ |

८ ईशस्तुति १०
७ निद्राऽऽव्हान ११
१ अभ्यास ११२
२७ निर्जनवनवास १२३
११ सुनेची विनंति १२७
१४ इथून कोणीकडे १६९

५ विहंगम ( कविता ६२ )

२० कवीस पत्र १५८
२० कवितेवर कविता १६६
१२ सकाळ १७२
१० काव्यरत्नावलीच्या संपादकास पत्र १७७

६ के० बळवंत जनार्दन करंदीकर ( कविता ९८ )

११ स्वामी कोण तुझा ? २७
१५ स्वसंवेदमाला ४५
१६ " ५९
१६ " ७७

७ केशवसुत ( कविता ४७ )

६ संध्याकाळ २९
२ थकलेल्या भटकणाराचें गाणें ४७
७ कविता आणि प्रीति ४८
१० मनोहारिणी ६१
२ सुंदरी दर्शन १२८

४ " माझें ठेवुनि चित्त घे " १४४
१५ भृग १८८

८ बा. सी. जोशी ( कविता ४७ )
४७ मातृवियोग ११७

९ विष्णु बाबाजी कुळकरणी ( कविता ४२ )
२२ रामभस्यसवाद ७८
२० औरंगजेबास १०७

१० भृग ( कविता २४ )
२४ माझें ज्ञान १८२

११ नरहर शंकर रहाळकर बी. ए ( कविता ३२ )
२ प्रीतीचें गाणे ९५
१० तारा आणि काजवा ११०
१७ अवांतिकेस १२५
३ ओम् ब्रह्म १६०

१२ दंडी ( कविता २६ )
२६ कलियुगांत कृतयुग १३१

१३ जगन्नाथ वामन हर्षे ( कविता १६ )
१६ सुमनगुच्छ १९१

१४ पांडुरंग बाळकृष्ण ददकार ( कविता १२ )
१२ विरहिणी ९३

१५ बा. म. देशमुख ( कविता १२ )

१२ सौंदर्यनिर्णय ६३

१६ पांडुरंग रामचंद्र नंदुरबारकर ( कविता १२ )

१२ स्त्रीबोध १०६

१७ जुन्या चालीचा ( कविता ९ )

९ वामनाचें स्मारक १७४

१८ मोरो गणेश लोंढे ( कविता ७ )

५ पंचरत्न १९०

२ सुभाषित १९२

१९ धुंडिराज गणेश बापट ( कविता ६ )

६ मूर्खाविषयी ९६

२० वैनतेय ( कविता ६ )

६ प्रीति आणि मृत्यू १०९

२१ वनवासी ( कविता ४ )

४ जीवितकर्तव्य १८६

२२ कोणी एक कवि ( कविता २ )

२ सुभाषित ६४

# काव्यरत्नावलि.

## सालअखेर.

ईश्वराच्या कृपेनें ह्या वर्षाचे अंक वर्षअखेर प्रसिद्ध झाले ह्याबद्दल त्याचे आम्ही मनःपूर्वक आभार मानून वर्षअखेर संबंधानें थोडा उल्लेख करितों.

पुष्कळ दिवसांच्या अनियमितपणाच्या दोषांतून रत्नावली निघाली आहे. आणि यापुढें ती योग्य नियमितपणानें वाचकांस भेट देत जाईल अशी आशा आहे सन १९०२ ह्मणजे वर्ष १४ वें आणि सन १९०३ ह्मणजे वर्ष १५ वें ह्या दोन वर्षांत भारीच अनियमितपणा वाढला होता. त्या वर्षांचे अंक छापण्यात कालावधि होऊन कदाचित् चालू वर्षांतही अनियमितपणा वाढेल ह्मणून त्या दोन सालचे अंक प्रत्येकी ६ अंकाप्रमाणेंच काढण्याचें ठरविलें. त्या सालचे अंक छापून तयार आहेत लौकरच दोन्ही वर्षें मिळून १२ अंक जुन्या वर्गणीदारांकडे जातील.

सन १९०१ सालच्या वर्षअखेरमध्यें रत्नावलीस काहीं मदत व्हावी ह्मणून कथाप्रवर्तक व विसावें शतक हीं दोन मासिक पुस्तकें सुरु करण्याचा आम्ही उल्लेख केला होता व त्याप्रमाणें त्यांचे काहीं अंकही निघाले, पण रत्नावलीच्या अनियमितपणांत आणखी त्या दोन पुस्तकांच्या अनियमितपणाची भर पडली! यामुळें तो उद्योग सोडून देणें भाग झालें ह्या पुस्तकास ज्या काव्यरत्नावलीच्या वर्गणीदारांनी किंवा दुसऱ्या आश्रयदात्यानीं आश्रय दिला आहे त्यांस ती वर्गणी परत मिळेल किंवा काव्यरत्नावलीच्या खातीं जमा होईल.

ह्या वर्षी रत्नावलीस नवीन वर्गणीदार बरेच मिळाले ह्याबद्दल त्यांचे आम्ही आभार मानतों तरी पण रत्नावलीस अजून आश्रयदात्यांचें सहाय पाहिजे. आणि तें मिळविण्यास आम्ही उद्योग करित आहों. रसिक वाचक आमच्या मराठी कवींच्या कृतींचा आदर करतील अशी आम्ही आशा करितों.

कवितेच्या संबधानें विचार करितां बारा अंकांत १४१० कविता प्रसिद्ध झाली ही सर्व कविता स्वतंत्र विचारात्मकच ह्मटली तरी चालेल. यात भाषांतरात्मक अशी फारच थोडी कविता आहे. ह्या कवितेंत तीन काव्यें मोठीं आलेलीं आहेत. एक सुरतरंगिणी काव्य. हें काव्यरत्नावलींत एकदां प्रसिद्ध झालेलें आहे. परंतु त्यास पुष्कळ वर्षे झालेलीं, प्रत्येक अंकांतून थोडी थोडी कविता प्रसिद्ध झालेली व त्याचा प्रसारही बेताचाच वगैरे कारणांनीं पुनः हें काव्य चालूं वर्षांत सगळें छापून काढिलें. ह्याप्रमाणें मोठीं प्रकरणें एके ठिकाणी वाचण्यास मिळतील अशा व्यवस्थेनें पुनः प्रसिद्ध करण्याचा आमचा विचार आहे. पण ही गोष्ट रत्नावलीच्या वाचकांवर अवलंबून आहे. आमच्या ह्या विचारास जर त्यांची संमति मिळेल तर त्याप्रमाणें व्यवस्था होईल. दुसरें काव्य मेघनादवध हें होय. मोठें काव्य सगळें एका वर्षांत छापून निघावें, हा आमचा उद्देश आहे. परंतु ह्या काव्याचे सर्व सर्ग तयार नाहींत यामुळें दोन सर्ग ह्या वर्षांत प्रसिद्ध करणें भाग पडलें. पुढच्या वर्षी सर्व काव्याचे सर्ग कवीकडून मिळतील अशी आशा आहे. तिसरें काव्य सुदामचरित्र हेंही सगळें छापून निघालें आहे. मूळ एकंदर कवितेंतून ह्या तीन काव्यांची ८८९ संख्या वजा केली असता बाकी निरनिराळ्या विषयावर ५२१ कविता प्रसिद्ध झाली आहे. ह्या कवितेच्या चांगुलपणाविषयीं विवेचन करण्यास स्थळ नाहीं. आणि तसें विवेचन करण्याची गरजही दिसत नाहीं. प्रसिद्ध झालेली कविता आपआपल्या गुणांची साक्ष देत आहेत पौराणिक विषयावर रत्नावलींत काव्यें येत नाहींत अशी कित्येक कवींची कुरकुर

असते, परंतु सुदामचरित्र, मेघनादवध, वामनाचें स्मारक वगैरे प्रकरणें पाहिलीं असतां ह्या गोष्टीचा उलगडा होईल. काव्यकल्पना मनोरम असली म्हणजे पौराणिक विषयही किती मनोरंजक होतो हें काव्यज्ञांस सांगावयास नको.

काव्यरत्नावलीचे हितचिंतक विनायक नारायण मोदगी बी. ए. यानीं आह्मास कांहीं सूचना केल्या आहेत. त्यांत रत्नावलीचीं पृष्ठें वाढवावीं अशी एक सूचना आहे व ही सूचना बहुतेकानींही केली आहे. पण ही गोष्ट सर्वस्वीं आश्रयावर अवलंबून आहे. त्याचप्रमाणें आमचे नवीन कविमित्र विहंगम यांचीही अशी एक सूचना आहे कीं पृष्ठें वाढवून "रत्नावलींतील उत्तम कवितांवर प्रशंसापर अभिप्राय व व्याकरण साहित्य वगैरे दोषाचें दिग्दर्शन यावें" तरी त्याप्रमाणें आमचा विचार ठरला आहे. सवडीप्रमाणें पानें वाढवून काव्यसंबंधाचें विवेचन, काव्यपरीक्षण वगैरे विषय प्रसिद्ध होतील येवढें आश्वासन आज देतों, परंतु ते आश्वासन देण्यापूर्वी ह्या गोष्टीस आमच्या कविमंडळीचें सहाय पाहिजे. आमचे कविमित्र ज्याप्रमाणें कवितेचें सहाय देतात त्याचप्रमाणें गद्यात्मक लेखाचें सहाय ते देतील अशी आह्मास पूर्ण आशा आहे.

ह्यावर्षी गणेश–सुत–गुणे, विहंगम, भृंग, हर्षे, जुन्या चालीचा, वगैरे नवीन कवींचा आह्मास लाभ झाला आहे. ते रत्नावलीवर पूर्ण लोभ ठेवतील अशी आशा आहे.

ह्या अंकांत एका सन्मान्य कवीची मृत्युवार्ता कळविण्याचा दुःखद प्रसंग आला आहे. रत्नावलीचे जुने कविमित्र रा. रा. बळवंत जनार्दन करंदीकर यास ता. १४ आक्टोबर सन १९०२ रोजीं धुळें मुक्कामीं देवाज्ञा झाली. खुद्द ह्याच्या नावाखालीं अशी कविता फारच थोडी प्रसिद्ध झाली आहे. गंधर्व, रमाकांत नागांवकर, आणि बळवंत ह्या तीन नावांखालीं जीं जीं प्रकरणें प्रसिद्ध झालीं आहेत; तीं ह्यांचीच होत. ह्यांच्या कवितेंतील

विचार, मनोहरपणा, सरलार्थता, व प्रसाद हे गुण पहावयाचे असल्यास पुनः एकवार यांचीं प्रकरणें अवश्य वाचावीं. आजपर्यंत रत्नावलींत यांची कविता बरीच प्रसिद्ध झाली आहे. यांचे चरित्रांत कवितेशिवाय दुसऱ्या गोष्टी मुळींच यावयाच्या नाहींत. ज्याचा सगळा जन्म काव्यदेवीच्या उपासनेंत गेला, ज्यास कवितेशिवाय दुसरा व्यवसाय मुळींच माहित नव्हता त्याच्या चरित्रांत दुसऱ्या गोष्टी कोठून आढळतील ? यांचे साग्र चरित्र त्यांचे धाकटे बंधु रा. सा. विश्वनाथ जनार्दन करंदीकर अड्मिनिस्ट्रेटर संस्थान जत हे लौकरच प्रसिद्ध करणार आहे व त्यांची आजपर्यंत प्रसिद्ध झालेली कविता व अप्रसिद्ध कविता स्वतंत्र पुस्तकरूपानें छापून काढणार आहे.

यांचा जन्म धुळें येथें सन १८५५ च्या डिसेंबर महिन्यांत झाला. यांचा इंग्रजी अभ्यास धुळें हायस्कूलांत झाला. म्यॅट्रिकची परीक्षा उतरल्यावर यांनीं धुळ्यास आर्यावर्तपत्र चालू केलें, पुढें ह्या पत्राचा संबंध त्यांनीं सोडला. नंतर खानदेशवैभव पत्राचे हे शेवटपर्यंत एडिटर होते. मराठी भाषा आणि इंग्रजी भाषा लिहिण्यांत हे मोठे प्रवीण होते. बेळगांवच्या भारतमित्र मासिक पुस्तकांत व इतर ठिकाणीं यांनीं आपले लेख प्रसिद्ध केलेले आहेत. रत्नावलींत " विनायक " या नांवाखालीं ज्या कविता प्रसिद्ध झाल्या आहेत ते यांचे धाकटे सख्खे बंधू होत. ह्या दोघा बंधूंच्या कवितेंतील साम्य पाहून केव्हां केव्हां बराच भ्रम उत्पन्न होतो.

ह्या कवीची आलिकडील कविता अनुताप, प्रेमालेख्य, संमोहलहरीचा स्वीकार, गृहिणी, कवितेचा निरोप, वेडा कोण ?, माझी प्रिया, स्वसंवेदमाला, स्वामी कोण तुझा ? वगैरे प्रकरणें अवश्य वाचावी म्हणजे या कवीची थोर योग्यता वाचकास कळून येईल. ह्या कवीच्या मृत्यूनें रत्नावलीचें फार नुकसान झालें आहे. पण ह्या गोष्टीस उपाय काय ? जी स्थिति अपरिहार्य आहे, तींत समाधान मानलें पाहिजे.

जानेवारी १९०४ वर्ष १६ वें.

# काव्यरत्नावलि.

अंक १ ला.

## सुरतरंगिणी काव्य.*

### प्रसंग पहिला.

ह्या काल्पनिक काव्यांत मुख्य नायिका सुरतरंगिणी ही आहे, ह्मणून ह्या काव्यास सुरतरंगिणी हें नाव दिलेलें आहे. ह्या काव्याचे सहा प्रसंग आहेत. ह्यांतील प्रसंग नर्मदा नदीच्या तटाकीं जो प्रसिद्ध भेडाघाट आहे, तेथें घडलेला आहे. ह्या स्थळीं गौरीशंकराचें एक मंदीर आहे तेथें यात्रेदिशानें बराच लोकसमाज मिळाला होता. अशा वेळीं विप्रकन्या सुरतरंगिणी हीही तेथें आली होती. ह्या वेळची तेथील अप्रतिम शोभा पहाण्याकरितां महेश्वर नामक एक सुंदर पुत्र हिंडत होता. हाच ह्या काव्यांतील नायक होय. नायिका आणि नायक ह्यांची दृष्टादृष्ट होतांच दोघांच्या वृत्ति तन्मय झाल्या. इतक्यात सुरतरंगिणी ही आपल्या घरीं निघून गेली. महेश्वराविषयीं सुरतरंगिणीचा अनुराग जास्तच वृद्धिंगत झाला. इकडे महेश्वरही तीच्या चिंतनांत निमग्न झाला. सुरतरंगिणीनें आपली अनुरागवृत्ति आपली सखी जी चंद्रलेखा तीस निवेदन केली, व तीनें तीच्या बरोबर महेश्वर यास पत्र पाठविलें. नंतर नायिका व नायक ह्यांचा समागम होऊन तीं संसारसुख अनुभवूं लागलीं. पुढें एके दिवशीं नायिका व नायक नावेंत बसून नर्मदा नदीची व तेथील सृष्टिवैभवाची शोभा

---

* ह्या काव्यास दक्षिणा प्राईज कमेटीनें बक्षिस दिलेलें आहे.

पहात हिंडत होते. इतक्यांत सूर्यास्ताची वेळ होऊन भयंकर जलवर्षाव व वायूचा प्रचंड वेग चालू झाला. ह्या संकटांत ती नाव पाण्यांत खचून बसली व दुर्दैवानें त्या नव दंपत्याचा अंत झाला. असा हा ह्या काव्याचा मथितार्थ आहे.

श्लोकार्ध.

मना मानसीं व्यर्थ चिंता वहातें
अकस्मात होणार होऊनि जातें.

रामदास.

यदिप्रभुरुदारधीःसुरसकाव्यकौतूहल
स्तथैववचसभासदःसदसितद्गुणग्राहिणः
सुवर्णसदलंकृतिर्भवतितत्रनृत्योद्यता
मदीयरसनानटीरसघटीयमानद्भू

श्लोक.

भेडा नामक रम्य पर्वतचि हो ! ही नर्मदा सुंदरी
रम्यस्थान असें दुजें न नयनीं देखीयलें भूवरी
चित्तानंदद धौतधौत गिरिच्या शृंगावरोनी झरे
धों धों धावत येउनी घुमविती श्रीशंभुचीं मंदिरें १
स्वच्छंदें अति रम्य गर्द हिरव्या झाडींतुनी तोषदा
आली फोडित शुभ्र अद्रिशिखरें जी स्वैरिणी नर्मदा
झाली केवळ दुग्ध सिंधुलहरी फेंसाळुनी या स्थळीं
स्वर्गांतील यशें समस्त हरुनी जाणों जनें चालिली २

१ नर्मदा नदीचा भेडा नांवाचा घाट. ( Marble Rock. ) २ कवि भेडा नांव व नर्मदा दाखवित आहे. ३ चित्तास आनंदकारक ४ पांढरें.

वाहे शुभ्र शिळामधोनि गिरिच्या अत्युच्च रांगातुनी
सारा तो धवळे प्रवाह विलसे अभ्रीं शिळा भिजुनी
येता नाव हळू हळू गमतसे, या भव्य कोटान्तरीं
ज्यूहीं सांपडलों, दरींत पडलों, या, खदकाभीतरीं ३

कोठें ये, खडकीं खळाळत, कुठें गंभीर घोषा करी
कोठें निम्नजळीं, तरंगनिकरीं पुष्पें झगी सावरी
कोठें शुभ्र विशाल रम्य पुलिनामाझारि वाहोनियां
देई स्थान पुरस्त्रियांसि सलिलक्रीडासुखें घ्यावया ४

नाना कोमल बिल्व, फुल्ल तरुही, ज्या पर्वतीं नांदतीं
गौरीशंकरमंदिरें हळुच तीं, तेथोनि डोकावितीं
शोभे दूरवरी प्रचंडसिकतापात्रांतुनी नर्मदा
झाली, नाशुनि पापराशि, सकला जी सर्वदा शर्मदा ५

स्वच्छंदें लहरीवरी फिरुनियां ये गार वारा सखा
लीलें हालवुनी प्रफुल्ल तरुतें दे सौरभाच्या सुखा
ठायीं ठायिं मयूर नाच करिती एक्या सुरें पाखरें—
गातीं; होय विलासमंदिरचि हें श्रीनर्मदेचें खरें ६

आनंदें चरतां बघोनि हिरव्या रानामधें गोधनें
पांवे वाजविती सुखें तरुतलीं गोपाळ मंजुस्वनें
कोणी खेळति लोणपाट, हुतुतू, कोणी उड्या मारिती
बाळा खेळ असे अपूर्व, न शिवे ज्या काळजी वा क्षिती ७

---

१ पांढऱ्या खडकाच्या भींतीमुळें नर्मदा प्रदेश प्रतिबिंब पावून पांढरा झाला होता. २ हा प्रदेश किल्ल्यासारखा दिसतो. ३ खोल पाण्यात. ४ वाळवंटीं ५ जल-क्रीडा. ६ येथें गौरीशंकराचें एक सुरेख मंदीर आहे. ७ कल्याणदायक ८ सुगंध.

गौरीशंकरदर्शना वरिवरी नारीनरांचीं कुलें—
येतीं धांवति सांसवें दडदडा सानंदचित्तें मुखें
सारा रम्य नदीप्रदेश गिरिच्या शृंगावरोनी ह्मणी
पाहातां क्षणिं तर्जनी[1] हनुवरी त्या ठेविती कामिनी ८

भेदाया गगनासि जातिल अशीं झाडें जया भोंवतीं.
जागोजाग अनंत गार हिरवीं शेतें मधें शोभतीं
पाटाचें जल लावुनी टवटवी उद्यानरोपांवरी
येई; तेथ जनांसि आश्रमपदें आल्हाद देती खरीं ९

वेदी[2] सारुनी कुशादि अवघी पूजा ह्मणी मांडिती—
कोणी आणुनि वल्कलें मुनिप्रिया दर्भासनीं ठेविती
कोणी बांधुनि होमधेनुसि तिची सेवा करूं लागतीं
नाना आश्रमकन्यका जपुं तिथें सिद्धींचि त्या राबतीं १०

वेदांचे गुरुघोष नित्य निघती सर्वत्र ऋष्याश्रमीं
ब्रह्मानंद तया सदैव भरला, झाले भवीं जे श्रमी
नाना तत्वविचार येथ करुनी वेदांतवेत्ते सुधी
गेले ब्रह्मपदीं अखंड, तरले लीले भवांभोनिधी ११

गौरीशंकरमंदिरीं दणदणा वाजे नगारा जधीं
"भोविश्वंभर" पूजनीं, वरिवरी, ते भजती पुण्यधी
आनंदें उधळोनि भद्रकरशीं द्रव्यें, सुमें, श्रीदळें
शंभूच्या हृदया प्रसन्न करिती ते एकनिष्ठाबळें १२

---

१ वायकास नवल वाटलें म्हणजे त्या हनुवटीवर बोट ठेवितात. ह्मणजे तेथील रचना अत्यंत आश्चर्यकारक होती असा भाव. २ यज्ञभूमि ३ पूजा सामग्री ४ मुनिजन.सिद्ध ५ संसारात ६ भवसागर ७ मंगलद्रव्यें ८ फुलें ९ बेल

पुष्पें गुफुनि साजिरीं करुनियां वेणी फणी नेटकी
कंठीं हार तसेच शुभ्र गजरे घालोनिया हस्तकीं
कर्णी घालुनिया शिरीषकुसुमें नेसोनिया पातळां
येती गौरनितंबिनी[1] हळुहळू ज्या कोमळा, सोज्वळा १३

म्हाणोनी प्रभुलागिं कोमल करीं वाहोनि गंधाक्षता
पूजा सारुनि शुद्धभाव धरुनी आतिक्य ओंवाळितां
ऐकोनी करकिंकिणीरवचि[2] तो होय प्रसन्न प्रभू
सोळावा उपचार त्यांसि नलगे[3] सौंदर्य ज्यां दे विभू १४

अद्रीच्या[4] गुहगव्हरीं[5] वुमन ये विस्तीर्ण ती नर्मदा
होतां चूर्ण तरी इथें, उसळुनी लाटा सदा सर्वदा
वेगें निम्नजळीं सदा गरगरा तें भोंवरे फीरती
घेरे घेउनि वृक्ष[6] ते वरिवरी अंभीं बुडू लागती १५

वाहे शुभ्र विशाल रम्य पुलिनामाझारि तेथोनि ती
एकामागुनि एक ये, वरिवरी, नाहीं तरंगां मिती
भेटे वाहत येउनी खळखळां ती बाणगंगा तिला
रेवासैकतभाग रम्यचि ! दिसे जो संगमीं भेदिला ! १६

येई धावत डोंगरावरुनिया श्रीबाणगंगा जवें
रेवा वाहतसे जवेंचि, सरिता ती, तज्जलीं कालवे
अन्योन्यावरि आपटोनि करिती कल्होळ नानापरी
फेणें, धौत सुरम्य संगम असा आनंदवृत्ती करी १७

---

१ नितंबभारामुळें २ बांगड्यांचा शब्द ३ षोडशोपचार पूजेपैकीं प्रार्थना हा १६ वा उपचार कांकिणीच तें काम करितात असा भाव ४ पर्वताच्या ५ गुहेमध्ये ६ नौका ७ नदींत उन्मळून पडलेलीं झाडें

नाना मीनें[1] तशाच पीनें[2] सुसरी पाण्यामधें पोंहती
प्राणी ओढुनि नेउनी गिळुनिया ज्या तत्क्षणीं टाकिती !
पक्ष्याचे फिरती नदीवरुनि जे नाना थवे अंबरीं[3]
घेती तत्प्रतिबिंब[4] ओढुनि वृथा आशा खरी बावरी १८

ढोळे लावुनिया असंख्य बगळे तीरावरी बैसती
आले सन्निध देखुनी गिळुनिया मीनासि ते टाकिती
हें[5] आमिष मच्छ तेविं गिळितां कठीं शिरे हा गळ !
साधूचा जरि वेष दुर्जन धरी, तो साधु कैंचा ? खळ ! १९

झाडी, गर्द, तशीच उच्च दुथडी, लागोनि, त्रिवेणी जळीं
जाणों नेसुनि पैठणीच हिरवी ये नर्मदा माउली
गाती सुस्वर सारिका, पिक, तसा, चंडोल झाडींतुनी.
बोले, तो स्तुतिपाठक क्षण गमे श्रीच्या मनोरंजनीं २०

चांदीचा जणु चूर हो उधळिला साम्या प्रदेशावरी
ऐशा थोर सतेज शुभ्र पुलिनीं यात्रा भरे साजिरी
गर्दी होय, विशाळ पात्र विलसे सेनासमुद्रापरी
होई एकचि गर्जना, सुर तयें, हेलावती अंबरीं[6] २१

लीले काढुनियां शिळावरि करीं रंगावली साजिरी
माडोनी शिवलिंग पूजिति तया गौडस्त्रिया सुंदरी
शंभूतें[7] करिती प्रसन्न ह्मणुनी गाणीं मृगाकानना
नारींची मधुरा गिराच मग ती याची न कां तन्मनी २२

स्वच्छंदें फिरती असंख्य तरणी या रम्य पात्रातुनी
आनंदें तरणीविहार[8] करिती नाथासवें साजणी

---

१ मासे २ पुष्ठ ३ आकाशांत ४ पक्ष्याचें प्रतिबिंब ५ देह ६ आकाशात ७ शंभुमनास ८ नौकाविहार

शा भा ४५/६



सौंदर्यें भरला प्रदेश अवघा आनंद येथें किती !
जो तो भाग दिसे मनोरम, अहा ! गुंगोनि गेली मति २३

ऐसा रम्य नदीप्रदेश बघत श्रीच्या तटाकावरी
हिंडे सुंदर विप्र एक भरला आल्हाद ज्याच्या उरीं
भाळीं शोभतसे त्रिपुंड रुळत वक्षःस्थळा जानवें
दोर्दंडांसह भव्य काय विलसे, तारुण्य ज्या ये नवें २४

शोभे लाल दुशाल सुंदर शिरीं, माळा गळां साजिरी
गौरांगावरि अंगराग विलसे, रुद्राक्षमाळा करीं
झालीं मग्न जयामधेंचि वळुनी पौरांगना लोचनें
जिंकावा सकलंक चंद्र न कसा ऐशा प्रसन्नाननें २५

रत्नें दोन जणों विशाळ जडिलीं कारागिरें कोंदणीं
ऐशा त्या नयनां बघोनि दिपुनी गेल्या झणी साजणी.
मौर्वी; भृंगततीपरी सुवदनीं ती वालरोमावली
कामें भ्रूधनुलागिं नासिकशरा जोडावया लाविली २६

ऐसा सुंदर आणि दिव्य पुतळा, पाहे जळाभीतरी
स्वच्छंदें करितां विहार सुभगा पौरांगना सुंदरी
त्याचीं ती बघुनी प्रसन्न वदनें श्रीनर्मदेच्या जलीं
वाटे, भृंगततीसवें हळुहळू तीं पंकजें चाललीं २७

गाणीं गात परस्परां धरुनिया येवोनि घाटावरी
जाणों त्या जलदेवताचि शिरती रेवाजळीं सुंदरी

---

१ नर्मदेच्या २ हृदयांत ३ ज्या देहास ४ स्त्रिया ५ वालरोमावली (मिष) हीच धनुष्याची दोरी ६ भवई हेंच धनु ७ नाशिक हा शर ८ कमलें ज्यांचीं भृंगमाला, मुख कमळें ९ नर्मदेच्या जळांत

जाती यांद, झणत्कृती परिसुनी रेवेसि सांगावया
आल्या गे ! जननी सख्या तुजसवें क्रीडासुखें घ्यावया २८
जेथें मेघतती, तमालरचना; विद्युल्लता, कामिनी;
मेघध्वानें, मृदंगनादचि जिथें; केका, झणत् किंकिणी;
जेथें सुंदर इंद्रगोप दिसती ते कुंकुमाचे सडे;
कामाची रसवृष्टि, पुष्परचना; दृष्टीस तेथें पडे २९
गेलें चंदन अंगराग न उरे, पत्रावली ही स्तनीं
गेलें काजळ, चक्षु; रक्तकमलां लज्जाचि देती झणीं
अंगीं सोज्ज्वळ कांति मात्र विलसे तारुण्य तेजासवें
सोन्याच्या पुतळ्याचि चारु तनु त्या केल्या जणों त्या भवें ३०
कोणी ताडुनिया जला घुमविती, कोणी जळीं बैसती
लाजोनी च डेला झणी स्तनतटीं सारोनि चैलाप्रती
स्पर्शे, मीन पदासि, तैं दचकुनी, धांवोनि कोणी तटीं
येई घाबरुनी, हसोनि सखिच्या कंठांत घाली मिठी ३१
अन्योन्यावरि कौतुकें उडविती पाणी, झणी हांसती
तत्काळीं जलबिंदु थेट करिती मुक्तावलीची कृती
गेले हार तुटोनिया विखुरलीं पुष्पें सुरम्यें जलीं
रेवा रंजित जाहली प्रथम, ती यांहीं बहू शोभली ३२
आनंदें रमतां जलांत अवघ्या भूलोकिंच्या चारुंग्या
अन्योन्यावरि लागुनी झळकती त्या पाटल्या कंगण्या

१ जलजंतु २ मेघमाला ३ तमालवृक्षांची झाडें ( आहे अध्याहृत. ) तमालरचना हीच मेघतती होय. ४ स्त्रिया ह्याच विजा होत. ५ मेघनिर्घोष ६ मृदंगनाद हेच मेघनिर्घोष आहेत ७ मयूराचा टाहो ८ वाजणाऱ्या घागऱ्या- ह्याच केका होत. ९ पावसाळ्यांत लाल किडे असतात ते. १० कुंकुमाचे सडे हेच इंद्रगोप ११ कामवृष्टि-पक्षीं पावसाळ्याची वृष्टि: १२ विलासिनींच्या गळ्यातून गळालेली पुष्पें यांची रचना १३ न उरे असा भाव. १४ स्त्रिया

कोणी गोंडस हास दावुनि वदे " हीं काय गे येवढी—
थट्टा बाइ तुझी, फुटोनि पडली माझी नवी बांगडी " २३
झाल्या श्रांत, सकंप, कुंदरदना, येती निघोनी वरी
धारा वाहति अंगलग्नवसनांपासोनि भूमीवरी
न्हाणीती कैच तोयबिंदुनिकरीं दीर्घा नितंबा, स्तना,
पाण्याच्या कणिका म्हणी खुलविती त्याच्या प्रसन्नानना २४
वस्त्रें नेसुनि रम्य हार गजरे घालोनि नानापरी
झाल्या सज्ज शिरीषपुष्पयुगलें घालोनि कर्णांतरीं
भाळीं लावुनि कुंकुमा निजकरीं घेऊनि पुष्पांजली
रेवापूजनिं मंजु मंजु वचनीं गाती पदें चांगली २५

दिंड्या

एक होती लावण्यवती धन्या
तयामाजी सुंदरी विप्रकन्या
बाल्य गेलें नुकतेंच निघोनीया
कोमलांगीं तारुण्य धरी छाया २६
बाळपणचें चापल्य जाय मागें
वयासंगें मुग्धत्व तेंहि वाढे
कांति सोज्वळ सर्वत्र दिसे अंगीं
केतकीची चारुता जागजागीं २७
केशपाशीं एकची पुष्प राहे-
जणों आकाशीं चंद्रखंड आहे-

---

१ शीतबाधेमुळें २ कुंदरदनी ३ तटकावर ४ ताठ्यापासून ५ ओले वेश ६ कण ७ स्त्रिया सज्ज झाल्या ८ कबरींतून गळत गळत राहिले तें फूल ९ आकाश निळें वेणी निळी

कुंकुमाचा लघु तिलक असे भाळीं
ध्वज प्रणयाचा[१] हाचि सर्व काळीं ३८

रक्तनयनीं भोंवया हालताती
जणूं डोले पंकजीं भृंग-पंक्ति
लालगालीं जलबिंदु शोभताती
येइ अधरावरि रम्य रक्तकांति ३९

हास्यवदनीं झळकती दंतपंक्ति
तीळ शोभे हनुवरी नीलकांति
वामकर्णीं नथ सुंदरीची साजे
सरळ नासिक तैसेंचि तें विराजे ४०

रम्य कटीं गळसरी एक राहे
दिव्यतेजें ती दुरुनि झळकताहे
मोतियाचा नव हार गळां शोभे
करी गुंजारव भृंग जिथें लोभें ४१

चालतांना, रंभोरु, झणत्कार—
होय जाणों जय शब्द करी मार
द्विजें ऐशी पाहोनि रूपखाणी
होय तन्मय तद्वृत्ति त्याठिकाणीं ४२

उभी राहे सुंदरी बायकांत
रक्तकुसुमें घेवोनि अंजलींत
सहज पुलिनामाझारि वळुनि पाहे
दिव्य पुतळा साश्चर्य उभा राहे ४३

---

१ प्रेम

श्लोक.

लज्जावती हळुच त्या तरुणासि पाहे
लावण्य चारुतनुमाजि भरोनि राहे
गेलीं उडोनि हृदयेंचि परस्पराच्या--
देहीं; क्षणैक ठरल्या तनुवृत्ति साऱ्या ४४

पुष्पांजली धरुनि तेथ उभीच होती
त्या अर्पिलें हृदय, हें सुचवी तया ती
सौंदर्यसागर, तया सरितासुखाची--
शोभे, न हा रुचिर--संगम कोण वांछी [१] ४५

चित्रें उभींच जणु सुंदरदंपतीचीं
किंवा अशोक नव पुष्पित केतकीचीं
झालीं मनें सहज आतुर दृष्टिमात्रें
प्रेमार्थ योजियलिं हीं मदनें सुपात्रें ४६

हा काव्यनायक महेश्वर ओळखावा
जो सुंदरीस अति दुर्लभ रम्य ठेवा
ही नायिका सुरतरंगिणि ओळखावी
सौंदर्यसिंधुलहरी न कशी ह्मणावी ? ४७

होतांचि दर्शन तया पुरसुंदरीचें
गेलेंचि मोहुनि असें मन त्या द्विजाचें
तो पंचबाण मग संधरुनी शरीरीं
त्या प्रेमरक्तहृदयांवरि बाण मरी ४८

प्रेमोद्गमें तनुसि त्या हृदयीं धरावें
रम्याधरासि ह्मणि भेटुनि धन्य व्हावें

---

१ नायिकेचें

ऐसें गमे; परि विवेक बळेंचि ओढी
त्या लागल्या दृढ अशा हृदयासि ओढी ४९

धाले जरी नयन, देखुनि रम्यवेशा
प्रेमासवें उपजली हृदयांत आशा
कोठील कोण कुळशीळ कळे न कांहीं
बोलावया, परिचयाविण, मार्ग नाहीं ५०

अस्तु. स्त्रिया सकळ साहुनि आपुलाल्या
पूजा, क्षणीं निजगृहाप्रति त्या निघाल्या
त्यांच्यासवें सुरतरंगिणिही निघाली
कष्टें; पदें उचलितां जड फार झालीं ५१

चाले, पुढें अडखळे घळुनी बघे ते
रेवेकडे हृदय गुंतुनि जाय जेथें
तें प्रेमसूत्र धरि ओढुनि बावडी ते
लज्जाच ती शृंखळ ओढि बळेंचि तीतें ५२

कस्तूरिका त्यजुनि जाय जणों मृगातें
विद्युल्लताचि जणु सोडुनिया घनातें
शक्तीच ती निघुनि जाय तनूमधोनी
कष्टेंचि जाय तशि तेथुनि रूपखाणी ५३

पाहे महेश्वर तया पुरसुंदरीतें
लावोनिया नयन दूरवरी परी ते
गेलीच; ये गहिंवरें नयनांसि वैरी
झालें असें सुभग दर्शन खेदकारी ५४

१ त्या नायकाच्या हृदयास २ रम्य वेष जिचा ३ ती ४ वान्चाची शुळुक ५ खाणी

पाहे तिथें टकमकां न कुठेंचि कांहीं
राहे न भान, तनुची ह्मणि होय लाही
ती मोहिनी पडुनि, मोहुनि मात्र गेले-
अतीं निराश मन या परि दीन झालें ५९

पहिला प्रसंग समाप्त.

विठ्ठल भगवंत लेंभे.

## काळ* व दुष्काळ.

श्लोक.

ये राष्ट्रावर ह्या महाव्यसन तें, जें नाशुनी शांतते
झालें कीं करिलें क्षणांतचि यमप्राली जना पांथ ते
भक्षी ग्रथिकताप तापद जना भेकां जसा साप तो
झाल्या निर्जन घोर थोर नगरी, हा लोक त्या कांपतो १
त्रैलोक्यप्रलयीं प्रचंड लहरी हेलावुनी सागरीं
सीमा लंघुनि तो जसा सकळही विश्व क्षणें संहरी
तैसा हा प्रभुकोप ताप अदयें ने अल्पकालीं जना
झालें दुःख असह्य तें, कवण हो! वर्णील त्या यातना २
भक्षी तक्षक लक्ष लक्ष जन जो, तो रोग भासे बरा
हा! हा! दुःसह अन्य संकट परी ये संप्रती हें घरा
कोठें सौख्य न, दैन्य मात्र जमलें कैसें अहा भोंवतें
केलें काय असे असें अघ अह्मीं जें हें असें भोंवतें ३

---

* शकें १८२१ विकारी संवत्सर—सन १८९९—१९०० सालीं जो भयंकर दुष्काळ पडला त्याचें हें वर्णन आहे.

ध्वसी सर्व विकारि—वर्ष सुख हें, आणी जनीं दीनता
तोडोनी उदकान्न पीडित असे आह्मास दु:खें नता
झाली सस्यविहीन कांचनमही, आली स्थिती ती तिला
जी ये अंतिमतैलबिंदु सरता दीपीं ज्वलज्ज्योतिला
आधीं वर्षुनि कांहिं, ऐन समयीं पर्जन्य देई दगा
नेई ओढुनि हाय ! निर्घृणपणें घासास तो हस्तगा
क्षेत्रीं वारि नसे उभीच ह्मणुनी शेतें अहा ! वाळती
झालीं आर्द्र जळें कृषीवलमुखें जें लोचनें गाळती ५

हा दुष्काळ कराळ काळ अहिसा आला जनां खावया
हाणी सतत तो अनंत मनुजां, पाही न वशा वया
झाला जर्जर हाय ! आर्य अवघा. आली मृतीची कळा
देवा ! विस्मरसी दयाजलनिधे ! बाळास कां दुर्बळा ? ६

गेलें पीक मरून, भीक कुदशा पाठीं बया लागली
दु:खाद्रीसह सर्वदा झगडतां धैर्ये तनू भागली
गाडी, नागर, कोयती, कुदळही, जी घोंगडी पाघरी
तीही हा विकितो कृषीवल अशी, राहे न कांहीं घरीं ७

येता ही कुदशा न राजपुरुषां येई दया हो ? तिळ
अस्मद्दैव फिरे तरी न उलटे कां सर्वही होतिल ?
सारा सर्व वसूल हे करुनिया, दु:खावरी डागिणी
देती, ही धनलालसा भयकरा आहे खरी नागिणी ८

नाहीं अन्न–रति; विपन्न करिती मृत्यप्रतीक्षा जन
घेती जीवित-घात-पात करुनी जें प्रीतिचें भाजन
पाहोनी उपवासि लोक भरती अश्रू अती लोचनीं
देवा ? धांव विपन्न-रक्षण-परा ? दीनाचिया मोचनी ९

अंगीं वस्त्र नसे, क्षुधाकुल असे, मालिन्य सारें वसे
गात्रीं त्राण सुटे, विटे मुखकळा, मृत्यू स्वरूपीं दिसे
आहे काय सुदामसा, यतिपरी पिंजारले केश हे
नाहीं हो सुख लेश हंत ! सहसी कैसें ? त्रिलोकेश हे १०

देहीं मांस नसे, शिरा सुरकुत्या होतात दृग्गोचरा
गेलें खोलचि पोट, बीत दिसतो पाठीं कणा हा खरा
नाहीं अन्न-लव, क्षुधा भडकते ह्या घाळल्या आंतड्या
शक्ती आटुनि, हातपाय गमती काड्या खऱ्या रोकड्या ११

दुष्काळार्थ जनार्थ सार्थ असती कामें जरी काढिलीं
तत्प्राप्तधनें न अल्पहि शमे लोकक्षुधा ही बळी
बाळें हीं मरती अन्नरहितीं पोशी न त्या चाकरी
व्याधिग्रस्त वयस्क जे जन न त्या खाया मिळे भाकरी १२

नाहीं पेजहि, सर्व तेज विझलें प्राणात आला खरा
डोळे जाउनि खोल खोल; तनु ही हो अस्थिचा पिंजरा
प्रेतें हाय सजीव ? काय दिसती; झाली स्थिती भीतिदा
पोटाची खळगी यदा न भरते सौंदर्य कैचें तदा १३

नाहीं अन्न मुळीं स्फुरे तळमळीं क्षुद्व्याकुळें लेंकरें
दुःखत्रस्तमना कितीक वधिती माता तयातें करें
बाळाची जननीस जोड विरळा लोकीं जरी भासते
वाटे मृत्यु बराच दुःसह परी होती शिशुक्लेश ते १४

जीचा हस्त धरूनि लग्नसमयीं जायास सौख्यांगणीं
जो गंभीरपणें भलें वचन दे सद्ब्राह्मणांच्या गणीं
तोही सत्पति तत्क्षणिच सहसा सोडी सती रुग्मती
आली दुःखद ही स्थिती जरि करी पापा न आजन्म ती १५

नाहीं अन्न, विपन्न दुःस्थिति जनां येतां पहा सादर
नीचत्वें जन हे कितेक करिती स्वार्थास बाहादर !
किंवा येउनि राष्ट्रसंकट जधीं चाले भलें कदन
तेव्हां मांसकणप्रलोलुप करी का गृध्र आनद न ? १६

नाहीं धार गुरांस, घांस न मिळे, पाणी नसे निर्मळ
प्राणातें त्यजती पटापट गुरें हीं कोवळीं दुर्बळ
शेती होति अती मतिव्यथित हे ही पाहुनी आपदा
आला काळ अहा ! महा बिकट हा; जागा न धैर्या तदा १७

प्रेमानें अतुल स्वबालकपरी जी सर्वदा पाळलीं
होती ज्यावरती सदैव सगळी तद्वृत्ति ही चालली
तींही व्याकुळचित्त हाय ! विकिती शेती तशीं तीं गुरें
नाहीं पोट भरे, पुरें गरज ना, कांहीं न गेहीं उरें १८

शेट्यानीं विकितां गुरें निजकरें, ये पीळुनी आंतडीं
आनंदे परि नष्ट खाटिक; चढे त्याची वरी ही कडी
धंदा उत्तम चालला, फिरलसे अत्यंत तो तांतडी
पैशाचा कुणगा करी विकुनिया रक्तात्त हीं कातडीं ! ! १९

चिंता–व्याकुळ जाहले, तिळ नसे ज्यां भान तें राहिलें
दुःखाग्नीमधिं काहले, नयन जे जे अश्रुनें नाहले
ऐशा भ्रांत मना जनांस सजती वंचावया यन्मनें
त्याची धन्य ! न अन्य त्यांसम कुणी, धिक् धिक् तयांचें जिणें २०

——————— बाळकृष्ण अनंत भिडे बी ए.

फेब्रुवारी १९०४ वर्ष १६ वें.

# काव्यरत्नावलि.

अंक २ रा.

## सुरतरंगिणी काव्य.

### प्रसंग २ रा.*

यांत सुरतरंगिणीची विरहावस्था. सखीचा बोध. व सखी चित्रें काढण्यास आरंभ करित आहे. येथपर्यंत संदर्भ आहे.

श्लोक.

शीतासवें शिशिर, सोडुनि विश्व जाई
शौर्यें वसंतनृप सर्वहि राज्य घेई
पर्णें गळूनि, नव कोमल पल्लवांच्या
वृक्षीं ध्वजा फडकल्या मधुराज यांच्या १
आधीं फुले बकुल, नंतर मोतियाही
त्याच क्रमें कनकचंपक फुल्ल होई
तो पारिजात करि मौक्तिक पोवळ्याचा—
वर्षाव, दे, फुलुनि गंध, गुलाब साचा २
हे दोहदाविण अशोकहि फुल्ल झाले
जाणो वसंतयश निर्मळ तें उदेले

* हा सर्ग ११८ श्लोकाचा मोठा असल्यामुळें यांत ५२ श्लोक घेतले आहेत पुढच्या अंकांत हा सर्ग समाप्त होईल १ थडीमह

झाले पलाशतरु रक्तचि कुड्मलांहीं.
पुष्पोद्भवें नटुनि सज्ज वसंत होई ३

वायु स्वयें शिरुनिया वनवंश—रंध्रीं
वाद्यें सुमंगलचि वाजवि मोदकारीं
गुंजारवें भ्रमर गुंगुनि त्यासवें ते.
झाले विशाक नृपवाद्यकें मोददाते ४

मंजुस्वनें पिक न, भाटचि या नृपाचे
स्वारीमधें फिरति गात यशासि साचे
ही सारिका मधुर गान करूं निघाली
झाले मयूर नट नर्तक यांचि काळीं ५

पुष्पान्विता नवलता जणु पौरनारी
पुष्पांजली उधळिती क्षणि भद्रकारी
जो कोकिला सुरभि दिव्य पराग त्यांहीं
तेणेंचि राजपथ रंजित होय पाहीं ६

ऐसा वसंत, तरुणी—प्रिय—मित्र आला
रेवा—प्रदेश अवघा रमणीय झाला
आरक्त—कोमल—दलान्वित वृक्षमाला
शोभे बहू धवल पर्वतमालिकेला ७

शृंगें सतेज दिसती गिरिचीं करांहीं
शाखा जयां सहज नीलचि मेघ पाहीं

---

१ वायूच्या छिद्रांत २ वसंत राजाचे वाजंत्रे भृंग ३ लता त्याच्या नारी ४ लतांनीं ५ वसंत राजाचा मार्ग ६ नर्मदा प्रदेश ७ पर्वताची रांग ८ सूर्यकिरणांनीं

वाटे, सुरम्य धरणी--रमणीस्तनाचें
वाहेचि दुग्ध, नच हें जळ निर्झराचें ८

एकीकडे हरितवर्ण धरा विराजे !
एकीकडे धवळ–पर्वत–पंक्ति साजे !
एकीकडे क्षितिज, भव्य नभोङ्गणान्तीं !
एकीकडे सुरनदी परि नर्मदा, ती ! ९

तें तीर दूरवर जें हिरवें विराजे
त्याच्यावरी चमकुनी दव फार साजे
छायाचि पैल विलसे नव पल्लवाची
वाहे अगाध, मधुनी सरिता सुखाची १०

एकीकडे झुळझुळा कुरणांत वाहे
ओढा; जिथें हरित शैवल शोभताहे
एकीकडे विलसते घन आम्रराई
वारोनि ताप, पथिका बहु सौख्य देई ११

वत्सासवें तरुतळीं बसल्याचि गाई
हें देखुनी निज सख्यांसह गोप गाई
आनंदल्या प्रियसख्यीं मुरलीरवानें
होई, न कोण ? वश, मंजुळ भाषणानें १२

एकीकडे वरिवरी स्मरसारिका ते
उच्चस्वरें करुनि मंजुळ गान गाते
त्याच स्वरें मधुर कुकुंदकुभ गाई
नीलांबरामधुनि सोडुनि नाद देई १३

१ नदींत पडलेली छाया २ मित्रांसह ३ गाई ४ मदनसारिका ५ भारद्वाज पक्षी आकाशांत गात फिरतो. यास सुर देणारी मदनसारिका होय

एकीकडे सहज वाहुनि मंदमंद
देहास दे सुरभि दक्षिणवात मोद
एकीकडे रव मनोहर मक्षिकांचे[१]
भोक्त्यांसि या बघुनिया मकरंद नाचे १४

रंगेल माधव, फुलांप्रति रंग नाना--
दे; तत्सुगंध करि लोल पुरांगनांना
त्या चित्रवर्णकुसुमान्वितमंडपान्तीं
संकेतकेलि करिते वनदेवता ती १५

घ्याया मरंद, फिरती फुलपांखरें तीं
ते चित्रवर्ण वपु देखुनि नेत्र धाती
पुष्पांजलीच जणु अर्पियला वसंतें
प्रेमोद्गमेंकरुनि हा वनदेवतेतें १६

जो दे पिकां मधुरकूजित मोदकारी
जें ऐकतां मदनबाण[२] शिरे शरीरीं
जो सौरभें सुचवि, होय वसंत भेटी
नांदे असा रुचिर मोहर आम्रवाटीं १७

जों जों दिसे अरुणता नव पल्लवांची
तों तोंचि चंचल मति प्रणयी जनांची
जों जों फुटे नविन अंकुर मोहराचा
तों तों चढे असमबाणें विलासिनींचा १८

जों जों रसाळरसें[३] सेवुनि कोकिळा तें
'कूहूंकुहू' वदुनि उत्तर दे स्त्रियांतें

---

१ मधुमक्षिका २ पंचबाण मदन ३ आम्राच्या मोहराचा रस.

‘ कुहूकुहू ’ वदुनि त्यां[1] अति कौतुकानें
तों तों बळें कवळिती दयिता[2] मदानें १९
प्रेमोद्गमे करुनिया नव हेमवल्ली[3]
आलिंगुनी बकुलनायक[4], धन्य झाली
गुंजारवें[5], मधुर मंगल कूजितानें[6]
हे दंपती हितगुजा करितीच जाणे २०
रेवाजळीं[7] गज, करेणुसवें रमोनी
भार्येसि दे रुचिर पल्लव तो खुडोनी
कांतेसवें विहरती मृग, चक्रवाक–
कामोद्भवें करिल माधव विश्व एक २१
ऐशा वसंतसमयीं सरिता–प्रदेशीं
ती बैसली सुरतरंगिणि खिन्न ऐशी
ये पांडुरी तनुवरी, विरहव्यथा ही
बाधे; अहा ! तळमळे, न सुचेचि कांहीं २२
बैसे सचिंत नयनें मिटुनी, कृशांगी
घोळे सदा भुवनसुंदर अंतरंगीं
रोमांच ये तनुवरी अधरोष्ठ कांपे
ये अश्रुपूर-नयनीं विरह--प्रतापें २३
रेवेकडे अचळ लावुनि दृष्टि, पाहे
वाटे पुन्हां दयित तेथेंचि येत आहे
लागे बहू प्रियचि तेथिल पांखरूंही
पूर्वी[8] जिथें दयितदर्शनलाभ होई २४

१ स्त्रिया २ पतीस ३ हेमवल्ली ही नायिका ४ बकुल हा नायक ५ गुंजारव हा मल्लिकेचा शब्द ६ कूजित हा बकुलाचा शब्द ७ रेवातटीं ८ पूर्वी जथें भेट झाली तेथील

नाहींच भान, तनुचीं जरि होय लाही
नाथाविना विषय अन्य जियांत नाहीं
यावें तयें, निजकरीं परिरंभणातें
द्यावें; गमे, सतत आतुर-मानसातें २५

चिंतोनिया दयितसुंदर अंतरंगीं
झाली महेश्वरमय क्षण ती कुरंगी
वाटे, सुहास्यमुखचंद्र पुन्हां उदेला
कीं आम्र घे कवळुनी नवमल्लिकेला २६

घाली, गमे, कर गळां, पति; मंजु वाचें--
बोले मुखाब्ज कुरवाळुनि वल्लभेचें
" प्राणेश्वरी क्षण धरीं अनुराग चित्तीं;
येतील सुंदर फळें सुमनोरथा तीं " २७

ऐकोनि मंजुळ अशी प्रियनाथवाणी
प्रेमें तयासि हृदयीं धरि रूपखाणी
नेत्राम्बुजें उघडुनी बघतां तयाशीं
तों देखिली प्रियसखी निजबाहुपाशीं २८

लाजे; झणी गहिंवरे, नयनासि पाणी
आणोनि होय अति विव्हळ रूपखाणी
स्कंधीं, धरोनि सखिच्या, शिर, त्यासि न्हाणी--
ती अश्रुनीं; वरिवरी, अति दीन वाणी २९

डोळे पुसोनि सखिच्या मुखपुंडरीका
प्रेमोद्गमेंचि कुरवाळुनि चंद्रलेखा

---

१ तनूत २ तिला हा भ्रम होणा ३ सुरतांगणाचें ४ सखीच्या स्कंधीं शिर धरून त्याशीं ( दुःखास ) न्हाणी असा अन्वय ५ नायिकेची सखी.

सारोनिया कुरळ केश मृणालमाला
बोले सुमंजुवचनें प्रियमैत्रिणीला। २०

" हे मत्सखे मज सुचे न उपाय कांहीं
कैसें करूं, धडधडे उर आजि पाहीं
गंभीर, धीर, परि आकुल चित्त झालें
कैसें तुझें; विरह दुर्धर होय बाले ! २१

हे अश्रुपूर करिती नयनांसि ढाळ
दाटे स्वयं अडखळे, न फुटेचि बोल
गे आवरीं गहिंवर, क्षण चंद्रिके तूं
शोधूं कसा वदें तुझा प्रियसौख्यहेतु २२

आधीं वसंत ! कुसुमोद्गम त्यांत आहे !
चूतांकुरीं मलयवातहि त्यांत वाहे !
रेवातुषारहि तयांवरि तापदाते !
देती सखे वरिवरी तुज आपदा ते. २३

आलाचि जों बहर त्या नवयौवनाचा
तों लाभ होय सहजें प्रियदर्शनाचा
मारूनि बाण तुज आकुल मात्र केलें
कामें; परंतु तव--जीवन दूर नेलें २४

चक्रापरी असुखें सौख्य फिरूनि येतें
व्हावें कशास कष्टणें तुज सुंदरी तें
आतां विवेकशर सोडुनि, संकटा या
पाडीं हणोनि; तुज हे नलगे कथाया " २५

---

१ पति २ दुःख.

ऐसें वदोनि बवता प्रियमैत्रिणीला
मूर्च्छागतःचि तव ती पडली धरेला
ती धावरे; नयनिं आणुनि अश्रु पाही--
त्या थडगार तनूमाजि उरे न काही ३६

वेगें पवित्र जल शिंचुनि नर्मदेचें
घालूनि तीर्थ वदनात महानदीचें
घालूनिया वरिवरी पवन स्वहस्तें
कष्टे करी झटुनि सावध ती सखीतें ३७

डोळे जरा उघडुनी बवता, वदे ती
" हे कष्ट, हाय, तुजलागि, असह्य होती
माझे सखे ! मजशिं एकचि शब्द बोल
ज्याचें न या क्षितितळीं करवेल मोल " ३८

बोले सती, " सुदति " अस्फुट भाषणानें
" दुर्दैव हें मम, तुझ्याविण कोण जाणे ?
वेदीमध्यें धगधगे अनळ प्रतापें
तैसा छळी विरह या हृदयास तापें ३९

सोसे उठी न, मज शीतळ चदनाची
शय्या जणों धगधगे, नलिनी--दलांची
गे हा सुगध ! मलयानिल हा तसाची !
.. मोहर ! प्रियसखे, पिक हाहि जाची. ४०

युग्में पहा ! सुचरिते तरुवल्लरींचीं[1]
हीं हेंसती सुमविकासमिषें मलाची

---

१ वृक्षवेलीचे जोडे.

भृगांगना पतिसवें मकरंद सेवी
गुंजारवें वरिवरी मज, गर्व दावी ४१

या सुंदरी विहरती, मम सन्निधानीं--
नाथांसवें; अमित कर्कश गात गाणीं
नाहीं दया, विनय, लाज, मदोद्धतातें
दीनछळें परम कौतुक दुर्जनातें ४२

गे आजि मी बहकल्यें मम जीव कांपे
सोडोनि लाज, विनय, प्रणयप्रकोपें
मत्तेपरी बडबडे करिं तूं क्षमा गे !
वाटे, मला वडिल ते भरतील रागें ४३

हें स्वैरचित्त रंतलें चरणीं तयाच्या
झाल्या सखे ! सहज तन्मय वृत्ति साच्या
गे नाथचित्र हृदयांतुनि तें निघेना
ठावें, न हें गुरुसि येति विकल्प नाना ४४

एकीकडे करितसे प्रियवल्लभाचें
हें प्रेम, लोल मजला, गृह जें सुखांचें
एकीकडे भय मनीं प्रिय तात याचें !
देवोत भद्र रज तच्चरणाम्बुजांचे ४५

ठावें असे तुजसि, निर्मळ वंशजाता
ही, सोडुनी विनय होइल काय मत्ता
होईल देह विरहाग्नित दग्ध; होवो
लोकीं पुनीत गुरुचें परि नाव राहो ४६

---

१ भय २ वडिलाचा धाक ३ प्रेम

आशा न लेश उरली प्रियदर्शनाची
रक्षा क्षणात बव होइल या तनूची
आल्यें तुला शरण, वंदन घे सखीचें
माझे प्रणाम गुरुतें वद शेंवटीचे ". ४७

ऐकोनि यापरि तिची अति दीन वाणी
आणोनि ती प्रियसखी नयनींसि पाणी
तीतें धरोनि हृदयीं वदली " नको गे—
ऐसें करूं; वचन हें हृदयासि लागे ४८

लावण्यपूर्णसरिते गुरुचा तुला गे
चित्तांत धाक धरणें नलगे शुभांगे
वृत्तांत तो, निपट सागर जो दयेचा
इच्छील घात, न कधीं प्रियकन्यकेचा ४९

जोडा सुरम्य बघुनी रतिमन्मथाचा
होईल गे मुदित तो तव तात साचा
त्या श्यामसुंदरघनाविण सोज्वळा ते
विद्युल्लता वरिल जाउनि का दुजातें ५०

नेलें तुझें हृदय चोरुनि गे जयानें
तो चोर दावि विमले ! लिहुनी कराने [1]
ते प्रेमपाश पडले असतील कंठीं
त्याच्या; असेल भरला विरहाग्नि पोटीं ५१

ऐसा तुझा दयित आणिन ओळखूनी
दे नाथचित्र मजला सखये ! लिहूनी "

---

१ माझे

बोले सती " सजल दृष्टि न ही बघों दे
मेला छळी कर्रहि कापुनि हट्टवादें " ९२
बोले सखी " सकल विप्रकुमारचित्रें
मी दाविलीं तुजसि काढुनि चारुगात्रें !
त्यांमाजि ओळखुनि वल्लभ आपुला घे "
काढी, असें वदुनि सुंदर चित्र-वेगें ९३

विठ्ठल भगवत लेंभे.

अपूर्ण.

## स्वामी कोण तुझा ?

श्लोक.

स्वामी कोण तुझा ? पुनः परिसिलें, स्वामी तुझा कोणता ?
कोणाचा ध्वनि ? कोठुन प्रसवला ? कांहीं न ये जाणतां
वारंवार असा घुमे स्वन. जरी चोंहीकडे पाहिलें,
कोणीही न दिसे करूं तरि कसें ? मच्चित्त साशंकलें. १
" शंका लेश धरीं मनीं न सखया ! प्रश्नोत्तरें द्यावया.
दृष्टीतें पडतों तुझ्या न, ह्मणुनी पावूं नको तूं भया.
कोणीही असलों, तरी न तुज मी देईन कांहीं इजा.
प्रश्नांचा करुनी विचार पुरता, तूं उत्तरें देत जा " २
कोणी काय कथूं ? मलाच न कळे, आश्वासिलें यापरी.
गेली भीति मनांतली, मग पटे विश्वास, दे खातरी.
' आहे सेवकभाव सर्व जगतीं व्यापून ह्या राहिला;
स्वामी कोण तुझा ह्मणून पुसतों, ' ऐसे ध्वनी बोलला. ३

प्रश्नाचें कळलां रहस्य न खरें, द्यावें कसें उत्तर ?
चिंताही पडली समुत्सुक मनें द्याया जरी सादर.
कोणाची करिशी न काय उदरासाठी ' वदे ' चाकरी '
' हो, हो, हो ! करितों. खरोखरच तो स्वामी न माझा तरी.— ४

झाले जे तुज विश्वदर्शन घडायाला स्वयें कारण,
केलें बाळपणीं दयार्द्रहृदयें ज्यानीं तुझें पोषण;
ज्याहूनी जगतीं न दैवत दुजें, ससेव्य मातापिता,
स्वामी काय तुझे नव्हेत वद ते. ' ' नाहींत बा तत्वता. ' ५

शिक्षा देउन मानवत्व तुजला ज्यानें असें आणिलें,
ज्ञानाच्या तुजला हितप्रद तसें मार्गा जयें लाविलें,
पूज्याहूनहि पूज्य तो गुरु नव्हे, स्वामी तुझा सांग हें '
' मी त्याचा असलों ऋणी किति जरी, स्वामी तरी तो नव्हे- ६

' निर्बंधीं तुज वर्तवी, परि तुझ्या राहे न जें बंधनीं,
सर्वां आकळुनी धरी प्रबल जें संमोहनेच्छागुणीं,
ज्याचा विक्रमदर्प पाहुनि बली निर्वीर्यता पावतो,
स्वामी तें मन कां नव्हे तव ? ' ' न तें स्वामी खरें सांगतों. ७

' प्राणाधार जयास सुज्ञ ह्मणती, जें चित्स्वरूप स्वयें,
ज्याच्या मानवजीवसृष्टि सगळी व्यापून गेली जयें,
श्रेष्ठश्रेष्ठ कवींस बोध पुरता चैतन्य ज्याचा न हो,
तें स्वामी तव कां नव्हे ? ' ' मम खरें स्वामित्व त्याला न हो, ८

' ज्याचें तेज अपूर्व कोण ? न तसें अयल्प ही भास्करीं,
स्वर्गारोहणमार्ग दुर्घट, परी सोपा प्रभावें करी,
आहे भाजन याचयाप मनुजा दुष्प्राप्य जें सद्गति,
स्वामी ज्ञान न तें तुझें ? ' ' न गणिते स्वामी तया सन्मति. ९

' ते राहोत समस्त अन्य, परि जो आहे जगन्नायक,
सृष्टीच्या बहुचित्र आत्मविभवें चक्रास जो चालक,
तो स्वामी सकलास होय, ह्मणुनी त्या पाहिजे मानिला. '
' सूक्ष्मत्वें करिता विचार पुरता, वाटे न तोही मला. ' १०

' स्वामी कोण तुझा तरी ?- न कळतें; किंवा न कोणी तुला ? '
' मी सर्वांतर हेतुकार्य अवघें, स्वामी नसे वेगळा.
माझा मीच धनी; ' असो, मज कथी जाणूं तुला साधनीं
मी कोण्या ? ' भ्रमरी, कळे तुज न का ? ' ' मी जाण अंतर्ध्वनि ' ११

बळवंत.

---

## संध्याकाळ.

### श्लोक.

                         काळ असे; रवी उतरतो आहे समुद्रावरी,
      बिम्ब सुरेख चुम्बिल पहा लाटास या लौकरी;
            मिळुनी गळूनि पडलें तें पुष्प जाई जसें,
लोपला लहरींत मण्डलहि हें जाईल आता तसें. १

आक            हे पहा विखुरले, त्याचेवरी सुन्दर
रंगाच्या खुलती छटा, बघुनि त्या येतें स्वचित्तावर
कीं, मृत्युंगत होतसे दिवस, तन्मस्तिष्क[1] पिण्डावरी ६
येती अक्षयमोक्षसिन्धुलहरी तेजोयुता यापरी.

पक्षी हे घरट्याकडे परतुनी जातात कीं आपुले,
त्यालागीं किलकील शद्ब करुनी आनन्द देती पिलें; ७

---

१ मस्तिष्क – मगजा, मेंदू.

गाई या कुरणांतुनी परतता हम्बारवा फोडिती,
त्यांचे उत्सुक वत्स त्यास अपुल्या दीनस्वर बाहता. ३
आनन्दी दिसती शुके, फिरक्ती जे या किनाऱ्यावरी,
ध्याती ते निज सुन्दरीस,-गमतें, उल्हासुनी अन्तरीं;
जी ही मन्दिरराजि पैल दिसते, तीच्या गवाक्षांतुनी
झाल्या त्या असतील हृष्ट युवती, चित्तीं असें आणुनी – ४
" अस्तालागुनि जातसे दिनमणी, रात्री अहा येतसे !
रात्री ! जादु किती विलक्षण तुझे नामामधें गे वसे !
प्रेमाचे हृदयीं उरीं कुमुद जें संकोच गे पावलें,
देसी त्यास विकास !–चित्त ह्मणुनी नाथाकडे लागलें ! " ५
सन्ध्येला प्रणयी तुम्ही जन सुखें घ्या हो दुवा, मी करीं
हेवा तो न मुळीं; नसे प्रणय तो माझ्याहि का अन्तरीं ?
आहें मी घर सोडुनी पण दुरी; चित्तीं ह्मणूनी असें
मी सायंसमयीं उदास !–अथवा व्हावें तरी मी कसें ? ६

केशवसुत.

## ईशस्तुति

( आषाढमास. )

श्लोक.

जणु प्रळय-वायुची मिरवुनी अजीं थोरवी
झटे प्रबळ दक्षिणानिळ सहेल सोसें रवीं-
स्वर्गारोहक करि गर्जना जळनिधी, भया हेतु जो
आहे आजि–बळ तू प्रभो ! सकळ हीं स्वरूपें तुझीं
स्वामी ज्ञान १

भयप्रद पयोद हे अतिगभीरघोर--स्वन
नभीं विचरती, क्षितीं विखरिती तमातें घन
परि प्रभुवरा ! जनावन--परा ! करी त्वद्दया
अशाहि समयांत या त्रिजगदन्न--बीजोदया २

विपन्न जनता ळवे, धृति--महा--गिरी खाळवे
भ्रमांत मन काळवे, प्रखर तेजही माळवे
परी तव कृपा--ळवें तरु विशुष्कही पाळवे
सुधा--गुण हलाहलीं त्वदितरां कुणा घाळवे ? ३

कला--कुसरि लोपली, गुण--विशालता झोंपली
रमा अदय कोपली, चतुरताहि आटोपली
जनांस तरि जागृती, क्षितिपतींस दे सन्मती
सुशिक्षण मिळो प्रभो ! बहुगुणी जयें जन्मती ४

मतैक्य न दिसे कुठें, नव नवे किती पक्ष ते
ऋजुत्व जन--वर्तन स्थितिंत या कसें रक्षतें
ह्मणून सुगुणप्रभो ! हृदय सभ्रमें गांगरे
चिदृश वितरीं तरीं, पथ बरा खरा सांग रे ! ५

कितीक जन भासती घन रसाळ शुद्धांतर
गभीर--रव गर्जती, चपळधी स्फुरे भास्वर
परि भ्रमवितो तयां स्वहित--वात कीं घातकी
तया स्थिर करी प्रभो ! भरत--भूमि होऊ सुखी ६

निबद्ध जन रूढिच्या असति नाग--पाशाकरीं
समाजहित--साधनीं स्थिति अशी निराशा करी
तरी गरुड--वाहना ! विकळ--मोचना ! धांव गा !
अशा स्थितिंत तू सगा; तुजविणे न दीना ळगा ७

मनीं धरुनि हौस हें तव लहानसें लेंकरू
धजे करिबशीच सप्रणय काव्य--सेवा करूं
मिळेल यश, भो प्रभो ! मज; असोनि अज्ञान मी
जरी तुज चिदुद्भवा ! करुणपूर्ण--सुज्ञा नमीं ८

———————— बाळकृष्ण अनंत भिडे बी. ए.

## निद्राह्वान

साकी.

निद्रे ! भद्रे ! शांतिदेवते ! विश्रामकरे ! धात्रि !
तव प्रसाद--प्रभाव देई शक्ती विगलितगात्रीं १
समदृष्टी तू असती निर्धन--धनिकीं कीं नृपरंकीं
माते ! सुमते ! ममतेनें तू घेसी सर्वां अंकीं २
त्रस्त मनातें स्वस्थ कराया समस्त जगिं तूं एक
मातृप्रकृतिहि त्वदुपकृतीशीं साम्य न पावे, देख ३
तुझ्या जादुनें स्वादु नेहमीं विश्रामा जन भोगी
दु:खविस्मृती पडुनी, होई रोगी, तोहि निरोगी ४
ऐसें असता, माते ! कां तें माझें दु:ख न कळतें !
तेजोज्योती विझे; कशी तव करुणादृष्टि न वळते ? ५
विश्राती मज देई, येई, आई ! त्वं अविलंब
जगताचे हे घाय सोसण्या क्षम काय करीं; अंब ! ६
परी दयावति ! अदया होसी; ये तरि शाश्वत--रूपें
बसलों मी ह्या घेण्याला तव चुंबन अंब ! हुरूपें ७

———————— बाळकृष्ण अनंत भिडे बी. ए.

# काव्यरत्नावलि.

अंक २ रा.

## सुरतरंगिणी काव्य.

### प्रसंग २ रा.*

सुरतरंगिणीची सखी चंद्रलेखा ही चित्रदर्शनद्वारें महेश्वराची ओळख करून देत आहे. सखीचें आश्वासन. व ती सखी नायकाकडे जात आहे. वगैरे प्रसंग ह्यात दाखविले आहेत.

श्लोक.

बोले, कुमार, सुभगे बघ दक्षिणेचा
रूपें खराच पुतळा जणुं मन्मथाचा
हें स्थान पौररमणी सुमनोरथाचे
भाळेल चित्त बघुनी सुरसुंदरीचे[1] ५४

आहे स्तुतिप्रिय, तयें हलक्या जनातें
आधार; आश्रय मिळे जरि आळसातें
बोधामुळें चतुरशी वळवील जाया
विद्युत्घनापरि वदू प्रियसंगमा या ५५

लक्ष्मी वसे, सकलधान्यसमृद्धि आहे.
त्रिया, रमेस सवतें[2] क्षण ती न साहे

---

* ह्या प्रसंगाचे ५३ श्लोक मागील अंकांत आलेले असून ह्या काव्यांत हा प्रसंग समाप्त झाला आहे. १ अप्सरेचे. २ विद्या लक्ष्मीची सवत ( हा मूर्ख होता

लक्ष्मीमुळें सतत मान मिळेचि लोकीं—
यातें; वदे प्रियसखा तव-होय हा कीं ? ५६

नाहीं ? कुमार दुसरा बघ पश्चिमेचा
शौर्यें कृतान्त दुसराचि रणांत साचा
हा दानशूर, उधळ्या ह्मणुनी त्रिलोकीं
गेली रुसोनि निघुनी शुचिकीर्ति लोकीं ५७

आहे उदार, करुणाघन, सुस्वभावें
हा वागवील दयितेप्रति मित्रभावें
कोपे जधीं, परिजनां बहु धाक याचा
शोभेल संगम, इथें रविपद्मिनीचा ५८

गच्चीवरी बसुनि सुंदर नर्मदेचा
संध्याप्रदेश बघुनी सुख घ्यावयाचा
उद्देश तूं धरुनि भीम[1] दुजाचि लोकीं—
जो; चिंतिला निजमनीं वद तोचि हा, कीं ? ५९

नाहीं ? कुमार तिसरा बघ उत्तरेचा
हा श्यामसुंदर, मनोहर शब्द याचा
व्यापार हा करितसे; करुनी प्रवास
हा जाहला चतुर आणि धनाढ्य खास ६०

गंगातरंगनिकरीं तनु पूत व्हाया
गंभीरसा जलनिधिध्वनि आयकाया
नाना अगाधरचना जगतीं बघाया
गे साधतील सरितार्णवसंगमें[2] या ६१

---

१ दुसरा भीम ( रुद्र ) २ नदी व समुद्र याचा संगम

लक्ष्मी जिथें झळकते निज-दिव्य-तेजें
ऐसाचि रत्नगिरिसा द्विज हा विराजे
नारी जशी विरहपांडुर होय येथें[1]
नहीं उणें परि जरा धनसंपदेतें ६२

हा होय कीं सुचरितें तव जीव पाहीं
बोले सती विकळ होउनि " बाइ नाहीं "
" गे होत बांधवचि केवळ सर्वही ते
माझे प्रणाम विनयेंचि असोत त्यांतें " ६३

बोले सखी तिजसि दावुनि चित्र वेगें
" अश्वपतिनाथ, बघ रम्यकुमार हा गे
रूपें बराच असुनी, बहुदैवशाली
लक्ष्मी गृहीं शिरुनि याप्रति माळ घाली ६४

स्वातंत्र्य गे परिजनां जरि फार नाहीं
स्वामीस दास बहु हा प्रिय होय पाहीं
स्वारीमधें निपट जीवचि हा नृपाचा
गे, चालतो, हरिरूपें, बघ, काळ याचा ६५

वाडे विशाळ, नव मंगळ चंद्रशाला
नाना महाल आंत सुंदर चित्रशाला
उद्यान-रम्य-रचना, जलमंदिरें हीं
दिव्याङ्गना[3], ललितकेलिनिकुंज तेहीं ६६

वैताशिवाय नृपवैभव हें बघावा
साधे स्त्रियेस अनलाऽनिल[6] सगमें या

१ कारण हा नेहमींचा फिरस्ता. २ चालता काळ ३ सुंदर स्त्रिया ४ क्रीडा मंदिर. ५ दासी होऊन ६ अग्नि व वायु

झालें तुझें हृदय कोदण गे विलोकीं—
ज्यामें; हिरा, सुचरिते, तव होय हा कीं ? " ६७

नाहीं ! कुमार अति सुंदर हा विलोकीं
नैर्ऋत्यनायक यया वदतात लोकीं
येणें प्रसन्न गिरिजारमणासि केलें
पुण्यप्रसादविभवें जड उद्धरीलें ६८

आनंदकंद, अथवा ध्वज लौकिकाचा
सच्चित्पदाब्जरत[1] हा नवभृंग साचा
अहाहा हो ! गुरुचि वेदविशारदाचा
कीं नाल[2] हा सकळ पुण्यपदाम्बुजाचा[3] ६९

हा योग्य संगमचि चंदनमल्लिकेचा
बाहल शांतिसह, शांततरंग साचा
विश्वास पादनत तू करण्या विलोकी
जो चिंतिला वर मनीं वद तोचि हा कीं " ७०

" नाहीं ! कुमार बघ आश्रित नर्मदेचा
वायव्यनाथ बरवा दिसण्यांत साचा
हा लोकवंद्य मुनिपालक[4] थोर आहे
रूपें गुणें निवळ शंकरसाचि पाहे ७१

लक्ष्मीविना, वदति, मान जगांत नाहीं
श्रीमत्त, तुच्छ गणि निर्धन नित्य पाहीं[5]
दारा मुलें मुरडिती अणि नाक डोळे
त्यांसि दे परम सूख— धनाढ्य, टोले ७२

---

१ सच्चिदानंद—पदकमळाचा भृंग. २ कमळ नाळ ३ पुण्यपदकमळाचा.
४ नर्मदाश्रित मुनिपालक. ५ श्रीमत्त निर्धनास तुच्छ गणितो.

श्रीमत्त मूर्ख ! परि पंडित मानिताती !
" हाजी " ह्मणोनि कर सर्वहि जोडिताती
द्रव्येंचि थोरपण गे जरि सत्य येतें
जातांचि तें, वदति नीच कसें तयातें ७३

श्रीमत्त दे न, कवडी कत्रणा कधींही
त्या निर्धनेंहि लुटिलें कवणासि नाहीं
सर्वज्ञ, धीर रसिक, प्रियनिर्धनाची
कुत्सा जगीं करिति ! गाजरपारखेची ७४

श्री नेइ शुद्ध सुखद व्यवहारनीति[1]
श्रीनेंचि होय जगतात मदांध वृत्ति
चिंता, अनर्थचि धनें, मनिं चोरभीती
लोकीं धनें परम सौख्य वृथा गणीती[2] ७५

पोळी मिळे; परि गिळेनचि, पोट चोळी !
हाले न दोंद खिळिलें वपु सर्व काळीं
श्रीमत्त हारवुनि शक्ति अहा ! पदांची
यानीं बसोनि वरि आपण आपदाची ७६

श्रीजन्य हीं बघ अशींच सुखें बिचारीं
जीं ईशदत्त बळशौर्यविनाशकारी
येथें नसे विनय आणि परोपकार !
श्रीमत्त गे ह्मणवितो परि बाइ थोर ! ७७

---

१ द्रव्यवान नीतीकडे पहात नसतो. २ याप्रमाणें चंद्रलेखा धननिंदा करित आहे कारण चंद्र कुमार निर्धन आहे. तो तर तिला नायिकेच्या मनात भरवावयाचा आहे कदाचित् हा तिचा वल्लभ नसेल कशावरून ?

गे या कुमारसदनीं धन अल्प नाहीं !
लोकीं न यास अपमान परंतु पाही !
गंभीर थोर हृदयांत दया असोनी
प्रेमार्द्रता असलिया, धन कोण मानी ? ७८

गोडी उणी प्रियतमे परमामृताची
ऐशीं फळें मधुर, येथ अनंत साचीं
शांतीसवें सुख इथें भरलेंचि आहे
चिंताचि ती न, मग दुःख कशास राहे ७९

ते रत्न ! कांचनहि ! येथ कशास व्हावें
त्या गंधयुक्तसुमनांसि तिहीं नमावें
शोभा, तशी मृदुलता सुमभूषणांची
कैंची ! वृथाचि बहु किम्मत त्या जडाची ८०

हा स्नेह–दीप–सम संगम होय पाहीं
सिद्धाश्रमीं सुखचि बाइ अखंड राही
गे, क्रोध, लोभ, मद, मत्सर ते न येथें
आनंद दे स्वगुण त्या विमला जलातें ८१

कर्णीं शिरीषकुसुमें, गजरे करांत
घालोनि रम्य सुमहार तसे गळ्यांत
पुष्पेंचि सज्ज करुनी कबरी, विलोकीं
सिद्धाश्रमा दिपविण्यां वरिलासि हा कीं " ८२

" नाहीं ? कुमार, बघ नंदन गायकांचा
ईशान्यनाथ, जणुं जीवचि बायकांचा

१ लक्षायनाची. २ निर्मल जलास आनंद आपला [illegible] देता झाला. ३ वेणीचा. स्वा. रा.

लक्ष्मी वसे, परि वियोग तिचा न साहे
श्रीतात हा ह्मणवितो क्षितिमाजिं पाहे
रूपें बराचि; सखये अति मंजुगीतें
हा लुब्ध गे करितसे सकला नृपातें
या वारिबिंदुनलिनीदलसंगमालें
इच्छील जी स्थल तिला बरवेंचि गे तें ८४

अंकीं असे सतत सुंदर मंजु वीणा
अंकीं तुझ्या बसुनि ती सहमंजुगाना—
भेदें करोनि, तिस देउनि लाज; लोकीं—
व्हायासि धन्य; धरिला हृदयांत हा कीं ? ” ८५

बोले सती विकळ होउनि “ बाइ नाहीं ” !
“ हे तात बंधु सखये अवघेहि पाही
माझे प्रणाम विनयेंचि असोत त्यांतें
होवोत भद्रकर तत्पदपंकज मातें ” ८६

काढोनि चित्र मग सुंदर एक रेखा
दावूनि तें निजसखीप्रति चंद्रलेखा
बोले “ कुमार सखये बघ पूर्वपासी
लोकीं महेश्वर असें वदतात यासी ८७

तारुण्य तेज विलसेचि मनोज्ञ—देहीं
लावण्यसागर असा जगतांत नाहीं
गंभीर धीर करुणाकर सुस्वभावें
हा धन्य गे कवण ठेविल यासि नावें ८८

---

१ लक्ष्मीचा पिता ( समुद्र नव्हे हो ) कदर्यु २ पूर्व दिशेचा

आल्हाद दे चतुर दास सरस्वतीचा
कीं नाथ रम्य मधुरा कवितावधूचा
नानाकलाकुशल त्यापरि शास्त्रवेत्ता
सर्वज्ञ हा त्रिभुवनासहि होय किती ८९

आहे स्वरूप; कुळ निर्मळ तेंहि आहे!
तें शील उत्तम; असे धन तेंहि पाहे!
आहे सदैव सखये गुणराशि; पाहीं
एका स्त्रियेविण उणें नच येथ कांहीं ९०

त्रिधेपुढें नच इथें नखरा रमेचा
ठेवा, सदैव बघ येथ खऱ्या सुखाचा
आनंद—मंदिर असें न मिळे कदाही
हा क्षीर—नीर—समसंगम होय पाहीं! ९१

आनंदसागरतरंग वदूं जयांसी
काव्यें सुरम्य रसपूरित मंजु पेशीं
गाऊनि नित्य रिझवूं म्हणुनी विलोकी
जो ने तुझें हृदय चोरुनि तोचि हा कीं * " ९२

दृष्टीस चित्र पडतां प्रियवल्लभाचें
आनंदलें हृदय दैव—तरंगिणीचें
घेऊनि; चुंबुनि तया हृदयीं धरी ती
प्रेमोद्गमें विसरली क्षण लोकरीती ९३

पाहे प्रसन्ननयनीं प्रियवल्लभातें
चित्रस्थ नाथाचि; मनीं परि हर्ष दाटे

---

* सुरतरंगिणी

रोमांचिता तनुलता क्षण होय तेव्हां
ठेवा मिळे हृदयिंच्या अतिशुद्ध भावा ९४
मीतूपण क्षणभरीं विसरूनि गेली
प्रेमाम्बुधीवरि जणों भरतींच आली !
बोले सती, " प्रियसखे, मम चन्द्रलेखे,
हा तोचि गे अदय ! जो, हरि चित्त देखे ९५
येणेंचि गे प्रणयरूप सुधारसानें
केलें प्रसन्न, सखि आतुर चित्त जाणें
येणें, वसंत, पिक, पल्लव, दूत केले
मित्राकडे मन तिहीं भुलवूनि नेलें ९६
येणेंचि गे निजकथारस मन्त्रनीया
ओतूनि कीर्तिकरवीं श्रवणांत वाया
पाहे सखे, भ्रमविलें मज, मींच जाणें
स्वप्नीहि हा खुणविलो करपल्लवानें ९७
या माझिया तनुवरी नच पाडुरी ती
याचीं यशेंच सखये अवतार घेती
माझे, सये, प्रणय–रंजित–पाद बाई !
येणेंचि गे करुनि; हा विरहास देई ! ९८
गे, प्रेमपाश मम टाकुनि त्यावरी ते
आणील कोण मम तो अनुरागी येथें
मित्रासवें रुचिर संगम पद्मिनीचा
एक्या उषेविणें करील न अन्य साचा " ९९

---

१ नायकाकडे २ प्रेमारक्त असे पद ३ ते पाश ४ प्रेमा ( नायक ) ५ सूर्यासवें पक्षीं मित्र नायक त्याच्याकडे ६ कमलिनीचा पक्षीं नायिकेचा ७ पहाट पक्षीं चरलेखा ( चित्रलेखेनें उषेची व तीच्या पतीची भेट करविली होती )

बोले सखी, " मुदित तू मम देह केला
योग्य स्थळीं उदित हा अनुराग झाला
चंद्रास का अनुसरेल न चंद्रिका ती
रत्नासि कां त्यजिल सोज्वळ हेमकांति १००

काढोनिया सकळ सुंदर वस्तुचें गे
तें सार; नाथवपुतें घडिलें वरांगे
त्याशीं तुझा सुखद--संगम आजि होवो
हो,[1] प्रेमवृष्टि सखये वरि; ताप जावो १०१

आता सखे, करुनि सत्वर रम्य वेषा
गे ! होइ सिद्ध भजण्या दयिता द्विजेशा
दे मंगल, प्रणय--रंजित--पत्र मातें
नेऊनि देइन तया विबुधोत्तमातें १०२

हा कामदेव, सखये, तुज साह्य आहे
याचा वसंतसख, सन्निध तोहि पाहे
गे निर्मिला तव मनीं अनुराग ज्यानें
होईल तो मुदित, या, प्रियसंगमानें १०३

आधींच बाणे[2] शिरले असतील त्याचे[3]
देहीं; कटाक्ष विषदिग्धचि मत्सखीचे
याचें सहाय्य असल्यावरि, मी न कां गे
आणीन तो भुलवुनी तव नाथ सांगे " १०४

बोले सती " धडधडे उर[4] हें सखे गे !
आई नको ! भय पहा हृदयात वागे !

---

१ होवो २ माझ्या सखीचे कटाक्ष हेच बाण. ३ मदनाचे बाण सखीचे कटाक्ष हेच होत ४ हृदय

धि:कारुनी हृदय बाइ ! विदारितांची
मी दाखवूं वदन केविं, सये, जगासी १०५
बाळो ! तर्यांत मृदुल प्रकृति स्त्रियांची
सौजन्य आणि विनयें गति कुंठिताची
देऊनि पत्र, वद, साहसकर्म ऐसें
लज्जावती, करिल आपण सांग कैसें ? १०६
आतां लिहूं प्रणयलेख, सखे परालें
कामोद्धता, गणुनि शापिल तोंचि मातें
प्रेमानुरक्तहृदयें लिहितां दशा ही
निंदील, वारवनितेपरि जाण बाई १०७
विश्वास काय ? उलटा पुरुषस्वभाव !
जाणेल कीं न, मम हा अतिशुद्ध भाव !
सागूं पराप्रति कशी विरह--व्यथा ही !
ज्याचें मला हृदय माहित बाइ ! नाहीं ! " १०८
बोले सखी, " प्रियतमे त्यज सर्व किंतु
पाहे, दयाघनें वळेलचि निश्चयें; तू
गे भीरु भी त्यजुनिया लिहि पत्रिकेतें
शंके जरी हृदय ! सांग निरोप त्यातें " १०९
बोले सती; " प्रथम वंदन शुद्धभावें--
माझें कथोनि विनयें, मग सुखभावें !
मर्जी बघोनि अति मंजुळ भाषणें गे
विज्ञप्ति यापरि सखे विबुधासि सांगे " ११०

---

१ तो अपराहत. २ आधींच मी बाला. ३ प्रेमपत्रिका. ४ पारसगुणः ५ नायक ६ हे सुखभावें सखे !

" रेवातटीं सहज दर्शन होय मार्गे
सौजन्य देखुनि मनीं क्षण धीर वागे
अर्पावया, द्विज सुपात्र बघोनि, त्याला
तातें दिली ममकरांत मधूकमाला ११

ती अर्पिली प्रियसखीकरवीं; तयेतें
सखोनि धन्य करणें त्रिजगांत होतें '
" आतां सुचे न मज यावरि चंद्रलेखे
संकोच, मूढ मन, हें वरि बाइ ! देखे " ११२

" वेडे असें करिशि काय?" वदे सखी ती
" बोले[2] जरा धरुनि धीरचि कुंददती "
" पूर्वार्णवासि वरि देव--तरंगिणी ती
ठावी असे बुधजनां अशि लोकरीती ११३

पूर्वीं स्वयंवर, वधू, करुनी मिळाल्या
प्रेमेंच नाथचरणीं, आणि धन्य झाल्या
आम्रा वरी नवलता--रमणी स्वयें ती
ठावी असे बुधजनां अशि लोकरीती ११४

श्रीकाम--देवचि उपायन रम्य आणी
घ्याया, पुढें करिल कां न सुपात्र, पाणी
ज्वाळा, शिखी; कनक, कांति; सुरत्न, दीप्ती;
ही वेगळीं, बुधवरा, न कदापि होती ११५

१ मोहाची माळ २ मी सांगतें असें बोल असें सखी नायिकेस शिकवीत आहे ३ पूर्व समुद्रास. ४ भागीरथी पक्षीं सुरतरंगिणी ५ नवीन वेली हीच रमणी ६ मन ( नायिकेची ) ७ सत्पात्र असा नायक हात पुढें कां न करील

मागेंचि ये कळु। चुके त्रास, पीडा. तरी सौख्य का तें ? १४
दैवें परस्पर वसे का ? । न वाटे खरी कल्पना ही विवेका.
यत्नें मिळोत, मिळतसे मूळ कोठें ? कळे गूढ कोणा ? १५

कल्पद्रुमासि नव कल्प॰ गधर्व.
वर्णोनिया सुयश निर्मळ ॰ चें गाणें.
धन्या; करी हृदयरंजन रज॰
तेणेंचि धीर धरुनी क्षण ही,
वाहे महेश्वरपदीं नव बिल्वपत्रें " ॰ क्षण ॰ ११७

बोले सती, " तुज सुचेल तसें वदोनी
ये छोकरी सुचरिते ! सुयशा वरोनी "
ऐसें वदोनि अतिरम्य मधूकमाळा
दे; पाठवी प्रियसखी दयिताळयाला ११८

———————— विठ्ठल भगवंत लेंभे.

प्रसंग दुसरा समाप्त.

## स्वसंवेदमाला.

श्लोक. ( भुजंगप्रयात )

तुला प्राप्त हो मानवा ! जन्म झाला । कशाला, तुवां पाहिजे शोध केला.
तुझें या जगीं काय कर्तव्य आहे ? । सुटेना सुटावें तसें गूढ कीं हें. १

कळू लागता पोट पाठीस लागे. । न का भूक ती थोडक्यानेंच भागे ?
कशाला तरी हे खटाटोप नाना ? । पुरेसें न वाटे, किती का मिळेना. २

---

१ तुमचें यश २ मी [ नायिका. ] ३ नायकाच्या पदीं पक्षीं शंकराच्या पदीं ४ कोंवळें असें बेलाचें पान पक्षीं माझा देह.

" रेवातटीं सहज दर्शन होय मागें
सौजन्य देखुनि मनीं क्षण धीर वागे
अर्पावया, द्विज सुपात्र बघोनि, त्याला
तातें दिली मम करांत मधूकमाला[1] ॥ १११ ॥

ती अर्पिली प्रियसखीकरवीं; तयेतें
सेवोनि धन्य करणें त्रिजगांस हीतें "
" आतां सुचे न मज यावरि चंद्रलेखे
संकोच, मूढ मन, हें वरि बाइ ! देखे " ॥ ११२ ॥

" वेडे असें करिशि काय?" वदे सखी ती
" बोले[2] जरा धरुनि धीरचि कुद्‌दती "
" पूर्वार्णवासि[3] वरि देव--तॅरंगिणी[4] ती
ठावी असे बुधजनां अशि लोकरीती ॥ ११३ ॥

पूर्वी स्वयंवर, वधू, करुनी मिळाल्या
प्रेमेंचि नाथचरणीं, म्हणि धन्य झाल्या
आम्हा घरीं नवलता--रमणी[5] स्वयें ती
ठावी असे बुधजना अशि लोकरीती ॥ ११४ ॥

श्रीकाम--देवचि उपायन[6] रम्य आणी
घ्याया, पुढें करिल कां न सुपात्रें, पाणी[7]
ज्वाला, शिखी; कनक, कांति; सुरत्न, दीप्ती;
हीं वेगळीं, बुधवरा, न कदापि होती ॥ ११५ ॥

---

१ मोहाची माळ २ मी सांगतें असें बोल असें सखी नायिकेस शिकवीत आहे ३ पूर्व समुद्रास. ४ भागीरथी पक्षीं सुरतरंगिणी. ५ नवीन वेली हीच रमणी ६ भट. ( नायिकेची ) ७ सत्पात्र भर्ता नायक हात पुढें कां न करील

मार्गेचि ये क[illegible]
दैवें परस्पर वरो[illegible]
यत्नें मिळोत, मिळत[illegible]
कल्पद्रुमासि नव कल्प[illegible]
म्हणोनिया सुयश[1] निर्मळ [illegible]
धन्या; करी हृदयरंजन रंज[illegible]
तेणेंचि धीर धरुनी क्षण ही, [illegible]
वाहे महेश्वरपदीं नव बिल्वपत्रें " [illegible] ११७

बोले सती, " तुज सुचेल तसें वदोनी
मी[2] लौकरी सुचरिते ! सुयशा वरोनी "
ऐसें वदोनि अतिरम्य मधूकमाळा
दे, पाठवी प्रियसखी दयिताढ्याला ११८

——————— विठ्ठल भगवंत लेंभे.

प्रसंग दुसरा समाप्त.

## स्वसंवेदमाला.

श्लोक. ( भुजंगप्रयात )

तुला प्राप्त हो मानवा ! जन्म [illegible]ाला । कशाला, तुवां पाहिजे शोध केला.
तुझें या जगीं काय कर्तव्य [illegible]हे ? । सुटेना सुटावें तसें गूढ की हें. १
कळू लागतो पोट पाठीस [illegible]ागे. । न का भूक ती थोडक्यानेंच भागे[4]
कशाला तरी हे खटाटोप नाना ? । पुरेसें न वाटे, किती का मिळेना. २

---

१ तुमचें यश. २ मी [ नायिका. ] ३ नायकाच्या पर्दी पक्षीं शंकराच्या पर्दी. ४ कोंवळें असें बेलाचें पान पक्षीं माझा देह.

[illegible]हतें, कष्टवी तें तनूस.
[illegible]तांचा अहा ! लाभ कांहीं घडेना ३
[illegible]प्राप्तिचा यत्न हें शुद्ध खूळ.
[illegible] । प्रयत्नें तया तो निवारीत जातो. ४
[illegible]होय । खरें, अन्यथा सिद्ध होईल काय ?
[illegible]खोटी । खरी मानिता तीच दु:खांत लोटी ५
[illegible]य येतें. । कळेना सुखावाचुनी दु:ख कां तें
स्वयें व्यक्त हे [illegible] तस न सौख्य । प्रणामीं धसवी अशी गोष्ट मुख्य ६
गळू काय तें ! दु:ख त्याचें शरीरीं । भरें ; सर्वथा वाटतो जीव भारी.
सुखस्वास्थ्य सारेंच जातें लयाला. । मुळीं गोड लागे न कांहीं जिवाला ७
जसें चिंतिलें सर्व आलें घडून; । मनासारखें एक झालें परी न.
कितीही, कशीही असो क्षुद्र गोष्ट । सदा क्षोभवी चित्त, दे थोर कष्ट ८
असे काय हा बीज दु:खद्रुमाचें ? । कसें, कोठुनी उद्भवे कार्य त्याचें ?
असे मूल दु:खास इच्छेस रोध । ठसो हा मनीं सत्य सत्य प्रबोध. ९
असे कारणीभूत दु:खास इच्छा. । अभावीं कसें उद्भवे तें तियेच्या !
तिला रोधिलें, छेदिले ज्या महंते, । कसें दु:ख व्हावें, कळेना, तयातें. १०
गमे हर्ष उल्हास, आनंद ज्यांत, । न मानी कधीं प्राज्ञ सत्सौख्य त्यांत.
विकारीं घडे ह्या पुढें कीं विषाद; । कराया तयें लागतो फार खेद. ११
अशा नष्ट खोट्या सुखाला भुलावें ? । [illegible]हीं न सुझे. वृथा कां फसावें ?
विकार, स्वरूपें सुखाच्या, मनाला । स्वयें [illegible]ती, मोह घालावयाला. १२
मुळीं ह्या जगीं सौख्य ही वस्तु नाहीं. । मिळावी कशी ? ‘ तूच शोधून पाहीं ’
असे सौख्य जाणे अभावस्वरूपी. । परी दु:ख तें मात्र हो भावरूपी. १३
इथें ना तिथें, ह्यात ना त्यांत कोठें । तरी, सौख्य लागेल, हें शुद्ध खोटें.

श्रमें मात्र ये दु:ख टाळावयातें। चुके त्रास, पीडा. तरी सौख्य का तें? १४
खरें सौख्य नाहीं. जगीं सावली कां? । न वाटे खरी कल्पना ही विवेका.
मुळावाचुनी सावली संभवेना. । असे मूळ कोठें? कळे गूढ कोणा? १५

अपूर्ण. गंधर्व.

## थकलेल्या भटकणाराचें गाणें.

पद.

किती रहावें तुजविण आतां! धीर न मजला क्षण धरवे!
गेलें गेलें वय हें वाया!—मरणहि तें वाटे बरवें!
काय करावें मज न सुचे,
मुळीं न मजला किमपि रुचे,
हृदयीं सगळें धैर्य खचे;
भणभण वणवण करित अधिक मज आतांहि जगीं न च फिरवे!
किती रहावें तुजविण आतां! धीर न मजला क्षण धरवे! १

कितिक योजिले यत्न यावया तुजशीं मी उत्सुकतेनें!
आणि गेले अवघे! दुर्धर कसें न व्हावें मग जगणें?
पुष्पांनो! तर दूर सरा!
कण्टक हो! मार्गीं पसरा!
प्रकाश नलगे—तिमिर बरा!
सर्व चांगलें व्हावें होतें तुजसाठीं—पण लभ्य नव्हे!
किती रहावें तुजविण आता! धीर न मजला क्षण धरवे! २

शूळ कपाळीं, कण्डण हृदयीं, कम्प शरीरीं भरलासे,
सलिल लोचनीं, शीण अवयवीं; उदासीनता मनीं वसे!
तरि, माझी ती भेटेल का?

पांग जिवींचा फिटेल का ?
आलिंगू ती झटेल का ?
क्षमा करिल का मला चुक्याची ? --पुसतों मी माझें बरवें !
किती रहावें तुजविण आतां ! धीर न मजला क्षण धरवे ! ३

केशवसुत.

---

## कविता आणि प्रीति.

श्लोक.

फिरायास मी मित्र घेऊन गेलों, । बघूनी सुरम्य स्थळा एक, ठेलों;
किती हारिनें वृक्ष ते दाट होते, । जलाचे तळीं पाट होते वहाते. १
तृणाच्या मधीं राखिल्या रुन्द जागा; । कडेनें तयाच्या लतांच्याहि रांगा
फुलांच्या बहारांत त्या शोभताती; । अलींचे थवे त्यावरी धाव घेती. २
मधूनी किती पक्षि ते गोड गाती; । मृगें त्या स्थळीं स्वैर तीं क्रीडताती;
शिखी चित्र ते दाखवीती पिसारे । बघूनी मना तोष होई अहा रे ! ३
सुखी भामिनी, स्पृष्ट ज्या यौवनानें, । निजाऽव्याजरूपास साध्या मदानें
इथूनी तिथें चंचला नाचवीती, । पदालंकृती झंकृती तें करीती ! ४
मुलें खेळती नाचतीही मजेनें, । तयाचा अहो कोण उल्हास वानें ?
फुलें, तारका, ते दवाचे तुषार, । तशीं मुग्ध हीं बालकें दिव्य फार ! ५
अशी तेथली पाहुनी रम्य लीला, । मुखीं घालुनी ठाकलों अंगुलीला;
वदे मित्र मातें--" पुढें चालणें ना?" । परी पाय तेथूनिया काढवेना ! ६
बोले सखा " गढुनि कां इतुका मनीं तूं ?"
मी बोलिलों " बघ मनांत विचारुनी तूं "
तेव्हां पुसे " अडविते कविता ?"--"नव्हे रे,
प्रीती मला भुलविते; नच हालवे रे ! " ७

---

केशवसुत.

# काव्यरत्नावलि.

अंक ४ था.

## सुरतरंगिणी काव्य.

### प्रसंग तिसरा*.

या सर्गांत महेश्वराचे नायिकेच्या प्रणयासंबंधी विचार. सखी चंद्रलेखेचे दर्शन व नायिकेची भेट करवून देण्याविषयीं वचन इत्यादि प्रसंग दाखविले आहेत.

श्लोक.

जधीं देखिली सुंदरी त्यों महेशें । बळें ओढिलें चित्त त्या प्रेमपाशें
उरीं रोविले बाण त्या पंचे-बाणें । सदा अंतरीं सुंदरी एक बाणे १
उटी लाविली शीतला चंदनाची । लतामंडपीं शेज ही पल्लवाची
सदा गंधवाही असा मंद वारा । झटे, सिंचुनी नर्मदेच्या तुषारा २
सुरम्य स्वरूपें नटे नर्मदा ही । करी लोल चित्ता सदा तोषदाई
परी बिंबली ज्या स्थळीं सुंदरी ती । कशाची तिच्यावाचुनी तेथ शांति ३
जणों टाकुनी मंत्र, त्यों मोहियेलें । बळें कामदेवें तया स्तब्ध केलें
मुख म्लान झालें गळे देह सारा । सुनेत्रांतुनी वाहती अंबुधारा ४
कृशागात्रीं दीर्घ रोमांच थारे । तसा पाटलोष्ट स्ववेगें थरारे
मनीं खिन्नता ये, सदा होय लाही । स्मरे आतुरा मानसा तीचें पाही ५

---

* गेल्या ३ ऱ्या अंकांत दुसरा प्रसंग समाप्त झाला आहे. १ नायकानें २ मदनानें ३ होती अध्याहृत ४ ज्या मंडपांत ५ नायकास ६ फिक्कट ओंठ ७ नायिका

असा धीर, गंभीर हा ज्ञानराशी । क्षणामाजि हो गोंविला प्रेमपाशी
अहो ! कामदेवा विषारी शराचा । पुरे मार; हा तापदाताचि साचा ६
वृथा तीं मृणालें, वृथा पत्रशय्या । वृथा गार वारा, मना ताप द्याया
वृथा शीत वाळा, वृथा अंगराग ! । न, जों, ती वदे या सख्या सानुराग ७
अहा ! जाहले कष्ट दीनासि वाया । तिच्याव्हाचुनी कोण ये शांतवाया
अहो ! दैव खोटें, दिसे ती न कोठें । वृथा आस लागे, पुन्हा धीर वाटे ८
हरी सुंदरी ती मनातें विलोकी । उरे शून्य देहांत लावण्य; बाकी
कथा त्या सखींच्या बहू रंजवीती । वृथा आवल्या भासती लोकरीती ९
मनोनिग्रहाची कथा काय तेथें ? । "सखे भेट गे" हेंचि हो ज्ञान जेथें
कशाला वृथा चार गोष्टी जनांच्या । कथा बिंबल्या अंतरीं सुंदरीच्या १०
असो. कोमलें कंकणें, पुष्पमाला । झणीं सावरी, टेकुनी मंडपाला—
बसे; चिंतुनी सुंदरी चित्तदेशीं । वदे; होउनी खिन्न तो आपणाशीं. ११
"अहा ! सुंदरी, कोमला ! रूपखाणी ! । सुखानंददात्री, सखी प्राणराणी !
सती ! सोज्ज्वळा ! चारुनेत्री ! कृशांगी ! । वसे सर्वदा माझिया अंतरंगीं १२
अहो ! केशमाला, जणों भृंगराजी ! । मुखेन्दूवरी सर्वदा चित्त राजी !
अहो ! भ्रूविलासें उरीं बाण मारी । तुळावी वृथा, हेमवल्ली बिचारी १३
अहो ! ती न नासा, कळी चंपकाची ! । रुचे, माधुरी पक्व बिंबाधराची
अहा ! मंजुवाचें, मना रंजवाया— । तिच्याव्हाचुनी कामिनी अन्य, वाया १४
भुजा कोमळा जिंकिती पद्मनाला । तसे हस्तही जिंकिती पंकजाला
इथे कंकणाच्या रवें, भृंगमाला । जणों, ती करी, मंजुगुंजारवाला १५

---

१ कवि कामदेवास म्हणत आहे ही नायकाची उक्ति नव्हे २ व्यवहार ३ उपदेश परगोष्टी ४ नायिकेच्या ५ कमलनालवन्य ६ लतामंडपास टेकून बसे ७ तुलना करण्यास ८ कमलनालास ९ कमळास १० या स्थळीं वर भुजा आणि हात यांची उपमेयें पद्मनाल आणि पंकजें वर्णिलीं आहेत तेव्हां या ठिकाणीं गुंजारव पाहिजे तो कंकणाचा शब्द होय. भृंग काळे, बांगड्या काळ्या दोघेही शब्द करितात

अहो ! नूपुराचे झणत्कार कानीं । पडोनी मला रजनीं ती अझोनी
अशी पुष्पिता, कोमला मल्लिका ती । कुठें मी बघूं सुंदरी स्वर्ण–कांति १६
सुशीला ! ध्वजा सोज्वळा सद्यशाची । जणों पूर्ण शोभा द्विजाच्या कुळाची
अहा ! माझिया मानसाची मैराळी " । उरीं मारुनी बाण, झाली निराळी १७
चकाके क्षणामाजि तर्वार हो ती । सळाळे जणों नागिणी हेमकांति
लखाखोनि चापल्य शंपांचि दावी । दिसेना, पुन्हा व्यर्थ हा लोभ लावी १८
अहो ! कोवळें चित्त आहे स्त्रियांचें । असे ठाउकें प्रेम, त्यातें प्रियाचें
कसा दोष लावूं ? अहा ! प्राणराणी– । दयेची असे सुंदरी पूर्ण खाणी १९
स्तुति व्यर्थ, वा ती असो लोकनिंदा । तिचा छंद लागे मना, देइ मोदा !
अरे इंद्रियांच्या नृपाळा, मना, तूं । भजे सुंदरी ती, त्यजी सर्व किंतु २०
अहो ! रत्न तें देखिलें मात्र डोळां । कसें दैव खोटें तयें घात केला
सुधा पूर्णपात्रीं, करीं जों न आली ! । अहा ! तोंचि दैवें कशी दूर नेली ! २१
अहो ! कोणत्या मंदिरीं तीस पाहूं ? । कसा भव्य विश्वीं तिचा शोध लावूं ?
अहो ! पक्ष, मातें जरी दैव देतें । उडोनी अहा ! भेट तों सुंदरीतें २२
अहो, लागलें वेड मातें ह्मणातें । मनोभाव तीचे मला काय ठावे ?
अहा रे, मना व्यर्थ शंका कशाला । स्वयें पाहिल्याना ? तिच्या रम्य लीला २३
अहा ! दर्शनें पूर्णचंद्रानना ती । मना ध्यास लावी वृथा कुंददंती
अहो स्वप्नवत् देखिली एक वेळा । वियोगानळें दग्ध, हा देह झाला २४
जणों अप्सरा येउनी गुप्त झाली । सरे पुण्य माझें तयें ती निघाली
अहो ! शून्य, मातें मला विश्व भासे । प्रियेवाचुनी सौख्य येथें कशाचें २५
वृथा ज्ञान जेथें, वृथा तर्क जेथें । वृथा शौर्य तेंही न कामासि येतें
वृथा द्रव्य, ज्याची गती कुंठिता ती । असावी अशी ती कुठें कुंददंती २६

---

१ फुललेले पक्षीं तारुण्याने मुसमुसलेली २ हसी. ३ वीज ४ प्रसंग पडेल पहा ५ जगांत ६ शोधच नाहीं तेथें द्रव्य काय कामाचें.

जरी भेटली ती, तरी काय त्याचें [1] । पराच्यांचि हस्ती जिणें या स्त्रियाचें
गळा कापिता तात, त्या मानें देती । तरंगे [2] स्त्रियांचे मनीं चूर होती २७
किती आडकाठ्या, किती यासि विघ्नें । पुरी घेतली पाठ दैवें, कृतघ्नें
अहा ! चक्रवाकी झुरे पैलभागीं । रडे हा तिचा नाथ येथें अभागी २८
जगाचे वृथा त्यागुनीया उपाधी । तिला चिंतितां लावुनीया समाधी
मनीं संचरे तत्क्षणीं सुंदरी ती । नसे लेश संकोच वा लोकभीती २९
अकस्मात ये दिव्य देवांगनेशी [4] । प्रसन्नानना दे अहा ! दर्शनासी
कधीं हास्य गालीं करोनी जरा, दे– । सुखा; घालुनीया गळा हात, मोदें ३०
कधीं मागुनी येउनी नेत्र झांकी । क्षणीं हांसुनी देइ आलिंगना कीं
अहा ! स्पर्श तो गार, आनंद देई । विनोदें तिच्या, हर्ष चित्तासि होई ३१
" गडे काय ही मौज रानीं ! " वदावें । कधीं घट्ट मानें मयें आवळावें
कसावें कधीं सानुरागें बघावें । हंसावें, क्षणीं चुंबितां कीं हटावें ३२
अहा ! रम्य लीला अशा सुंदरीच्या । जणों जालमालाचि त्या मन्मथाच्या
बघोनी, जरा, चित्त माझें त्रिसावे । स्मरेनाचि मी तूपण प्रेमभावें ३३
मनोराज्य [6] संपोनिया, हाय ! ऐसें ! । पुन्हा शून्य भासे, अहा ! स्वप्न जैसें
कशाची [7] प्रिया ! ती ! ! न कोठेंचि काहीं । वियोगें तनूची वृथा होय लाही ! ३४
किती अंतरंगीं झुरूं, आकळोनी । कशी निर्दया जातसे ही पळोनी !
अशा कोमलांगीं कठोर स्वभाव– । कसा ? निर्मितो हा ! चुके, ब्रह्मदेव ३५
अहो ! मूढ झालों, मला मंत्र सांगा । कसेंही करा, भेटवा ती वरांगा
असे पुण्यशाली जगीं कोण हो; ते [8] – । जयाच्या वरें माळ घालील मातें ३६
अरे मन्मथा, ही रती सत्य नाहीं । विचारी रती येथ कैशी लगाही ?

१ तियाच्या हातीं. २ मान पुढें करितात. ३ इच्छित पतीच्या प्रेमाचे तरंग ४ देवांगने प्रमाणे. ५ वर जी समाधी लागली तीचे ३३ श्लोकापर्यंत वर्णन झालें ६ मनोराज्य संपल्यानंतरचे हे विचार ७ प्रियेच्या भेटीची मुदत. ८ अशा प्रकारचे. ९ ती नायिका.

सख्या वैर सोडी, धरी साधुरीती । मिळो ती[1] सुधा[2] या कळे माधुरी ती[3] ३७
नभोमंडळीं हिंडशी नित्य सूर्या । असावी तुला ठाउकी सत्य[4] भार्या[5]
तिची सोज्वळा कांति मित्रा हरोनी । फुका बोलशीही न, जाशी दुरोनी ३८
मिळे सर्व शोभा तिच्या पल्लवांची-- । तुला; भेटली मल्लिके तीच साची
न कां बोलशी गे ? सुखी ऐस रानीं । दिलें दान आह्मी न घेऊं हिरोनी[6] ३९
अरे ! तेच डोळे, मृगा, ओळखीले । अहो ! तेंचि[7] सौंदर्य पद्मांत आलें !
अगे, मंजुवाणी तिची कोकिळे ही ! । कुठें ती ? दया, हाय ! एकासि नाहीं ४०
खरे दैवशाली तुह्मी सर्व आहां । तिच्या दर्शनें धन्य झालां, अहाहा !
न, बोलेचि कोणी[8] वने मात्र जो तो । अहो, संकटीं कोण कामास येतो ? ४१
वये नर्मदे माउली पाव आतां । तुझ्यावांचुनी कोण या साह्यकर्ता
हजारों जनां संकटीं तारियेलें । जगीं निर्मळा सद्यशा गाजवीलें ४२
जसें नारसिंहापुढें भूत कांपे । तशी कांपवीशी अघा[9] तू प्रतापें
असंख्यात जे माउली उद्धरीले । सुखें जाउनी नंदनीं[10] दंग झाले ४३
जरी पापराशी तुला काळ[11] मानी । खळांतें जरीं टाकिलें त्वां वधोनी[12]
असे साधुवृंदीं दया, पुण्य--[13]शीले । प्रतापेंचि लोकीं तुवां नाव केलें ४४
तुझ्या ज्या तटींच्या शिळा, त्या जडाही । प्रतापें तुवां उद्धरील्याचि पाहीं
अशी माउली तूं न मातें उपेक्षी । वये भेटवी ती[14] मला सौरसाक्षी[15] ४५
असे प्रेम कैसें ? विचारी मनाला । जधीं वाहिला देह तू सागराला
तुझ्या प्रेममार्गांत ज्या, माय आल्या । शिळा चंड वेगेंचि त्या चूर्ण झाल्या[16] ४६

---

१ ती नायिका. २ मला. ३ प्रिया जी सुधा तीची माधुरी. ४ सख्या एशा सूर्या. ५ पद्मांची ६ प्रियेनें आमच्या पल्लवाची शोभा तुला दिली तस्मात् दिलेलें दान आह्मी परत घेत नाहीं ७ सुदरीचे. ८ कारण एक देखील नायकास उत्तर देत नसे. ९ पातकास. १० नंदन वनांत. ११ काळ अशी मानी. १२ बुडविले १३ तुही अध्याहृत. १४ नायिका. १५ हे माते. १६ तू धांवेनें जात असतां मार्गांतील शिळा तडक्यासरशीं चूर्ण झाल्या.

अशा प्रेमवेगा नये आंवराया । गमे, त्या प्रियेनेंचि यावें वराया।
तुझी कन्यका ती तुझा दोस मीही । स्वदासा तिला अर्पुनी पुण्य घेई ४७
तुझ्या त्या कथा वर्णितां शेष भागे । तयाचा न या पामरा थाग लागे
गिरीच्याचि अंकावरी खेळतां गे । तुझी बाललीला बहू गोड लागे ४८
मिळाल्यों[2] पुढें मैत्रिणी[3] चार तूतें । तुझे खेळ गे देति ते कौतुकातें
अहा ! राजकन्याचि गे शोभमाना । सख्यामाजि तू भासशी हिंडतांना ४९
असो. बोलतां चालतां थोरें होतां । पित्यालें तुझी लागली नित्य चिंता
तुला सागरा अर्पुनी धन्य होई । तदा सर्व विश्वीं, न आनंद माई ५०
जधीं जावया लागलें सासऱ्याला । रडोनी तुवां थोर कल्होळ[8] केला
असो सुस्थळीं वत्सला कन्यका ती । प्रयाणीं अहा ! अश्रु नेत्रांसि येती ५१
लपूनी. दरींतूनि, झाडींमधूनी । हळू चोरुनी दूर जाशी निघूनी
गुरूंच्या भयें स्त्रीस्वभावेंचि ऐशा । वज्या युक्ति संकेत केल्यर्थ साच्या ५२
अशीं रम्य रूपें, अशा रम्य लीला । बहू शोभती गे तुला चांगलीला
तुझी कीर्ति गाया न ये मूढ गे मी । तुझ्या[11], पुण्यशीले असे लीन नामीं ५३
अहा ! पूर्व पुण्यें तुझ्या दर्शनाचा । घडे लाभ, हा थोर आनंद साचा
कृपेची करी साउली माउली गे । प्रिया सुंदरी भेटवी हेंचि मागें ५४
‘ सती दर्शना काय देईल मातें ? ” । असें जो पुसे तो[12] तिलें, खिन्नचित्तें
निघे तोचि गंभीर वाणी वनान्तीं । अरे होय[14] राजी तुला कुंददंती ५५
असें बोलुनी चंद्रलेखा चकाके । जणों नर्मदा सुंदरी तीच ! देखे

---

१ नर्मदा पर्वतावरून येताना तीच्या बाळ स्वरूपाचें हे वर्णन आहे. २ भेटल्या पक्षीं संगम झाला ३ नद्या ४ वाढतां. ५ गिरिराजास ६ धुवाधार या नावाचा जो धबधबा आहे तेथील नर्मदास्वरूपाचें हें वर्णन आहे ७ असली तरी. ८ कन्या सासरीं जाऊं लागली म्हणजे जो करुणरस उद्भवतो तो ९ नर्मदा अभिसारिकेप्रमाणें लपत छपत जात आहे १० संकेत केलीस जातांना वडिलांचें भय स्त्रिया धरितात ११ तुझ्या नामीं १२ नायक. १३ नर्मदेस. १४ सती--मीत याचें उत्तर ओ होय १५ आहे अध्याहृत.

उभी राहिली ती स्वसौ सन्निधानीं । खरी मन्मथाचीच दूती शहाणी ५६
वदे ती " गिरा ही तुझी बंधुराया । जणों नाव त्या सुंदरीतें तराया
मनीं इक्षुच्या वांछिलें जों रसाला । सुधाकुंभ हातीं अकस्मात आला ५७
तुझ्या भाषणें मीं अहा ! दंग झाल्यें । तुझ्या सुस्वभावास म्यां ओळखीलें
तुझ्या कोवळ्या मानसा, ती मराळी । अभो; कोमलांगा न होवो निराळी ५८
स्त्रिया भीरु जात्या मनीं लाज भारी । उरीं प्रेम टोची, गमे खेदकारी
वियोगानळें भाजली ही बिचारी । सखीवाचुनी कोण तैं साह्यकारी ५९
झुरे अंतरीं सुंदरी ती बिचारी । तुझ्या संगमाची मनीं आस भारी
यशा घ्यावयां दूतभावेंचि आल्यें । अहा ! आयतें कार्य बा आजि झालें ६०
सुदैवें तुझी थोर वशात आलों । असें रूप कैचें रतीमन्मथाला
उमे प्रेम, तारुण्यही नांदताहे । सुखें संगमा पाहणें मात्र राहे ! ६१
दयासागरा तू वरीं त्या नदीतें । सदा प्रेमभावेंचि नांदूनि मातें—
यशा दे; तुला सांगणें हें कशाला । त्यजी कोण ? येता करीं, पुण्यशीला ६२
दयाब्धा तुझ्या देखुनी सुस्वभावा । पुसोनी मनींच्या दृढ प्रेमभावा
तिनें सानुरागें दिली रम्य माला । सख्या आदरें ही तुला अर्पिण्याला ६३
असें बोलुनी ती गळां माळ घाली । कथी सुंदरीच्या निरोपासि—बोली
तया ऐकतां थोर आनंद झाला । प्रियेनें अहा ! जीव तल्लीन केला ६४
वदे तो, " अहो ! ही सुधावृष्टि झाली ! । अहा ! पल्वला आजि गंगा मिळाली !
जणों चंदनाच्या रसें सारवीलें । वपु, श्रांत, माले तुवां गार केलें ! ६५
तिचा हात लागे तुला ! धन्य माले ! । तुला चुंबितां गे मला सौख्य झालें
दयेनें ऋणी आजि आम्हांसि केलें । खरी तू सती या जगीं भद्रशीले ६६
अहो ! वापिका प्रीतिच्या ही रसाची ! । अहा ! पूर्णपात्रीच सौख्यामृताची !
जणों आजि आनंदखाणी मिळे या ! । खरी ईप्सिता ही सुखानंद शय्या ! ६७

---

१ नायकानें वहाण मानली. २ वाणी. ३ नौका. ४ हंसी. ५ तूं यश देशील असें जाणून. ६ आहे ७ हसी. ८ इच्छित सुख व आनंद यांची शय्याच.

ह्मणे राजलक्ष्मी, वरूं पामराला ! । बळें कामधेनूचि येई घराला !
ह्मणे कल्पवल्ली दरिद्री बरा हा ! । खरा धन्य मी आजि लोकीं अहाहा ! ६८
स्वसे उत्तरा त्यां तिला काय द्यावें ? । मनोभाव माझे तुला सर्व ठावे
भरे प्रेम, मार्गेचि अन्योन्य देहीं ! । कथी जें रुचे, घे यशालागि बाई ! " ६९
वदे ती, " सदा येथ आनद राहो । तुह्मा, सगमे या, बहू सौख्य होवो "
असें बोलुनी जाय दूती निघोनी । यशाची ध्वजा हो जिच्या सन्निधानीं ७०

[ सर्ग २ रा समाप्त. ] विठ्ठल भगवंत लेंभे.

## श्रीसुदामदेवचरित्र.

### सर्ग १ ला.

( गुरुगृहनिवास )

आर्या.

गज--वदना अघ--दहना रिपु--कदना मन्मथा--रि--तनय--वरा
अर्पूनि बुद्धि माते गण--राया लब्ध--दास--पदवि करा १
अवतार शंकराचा पूज्य असे जो सदा हनूमान
त--चरण--पंकजीं मम नमन सदा वाकवोनिया मान २
गायास स--चरित्रें दे बुद्धि श्री--वरा रमा--नाथा !
झालों नम्र पदा--बुजीं ठेवुनिया सर्वकाल मम माथा ३
दासास शक्ति द्यावी लघाया त्या स्व--कीर्ति--हिम--गिरिला
हरला दश--शत--मुख जरि या पार्थि, मम बुद्धिनेंचि हा वरिला ४
छंद:शास्त्र न जाणें, काव्या--लंकार तेहि मी नेणें
यास्तव याचा तव पदिं कार्या--र्णव--पर--तटाप्रती नेणें ५
द्वापर--युगांत झाला सांदीपनि थोर भक्त देवाचा
होता गुरु बाल--पणीं तो कृष्णाचा सुदामदेवाचा ६

त्या सांदीपनि–सदनीं शिष्य–द्वय हें वसे गुरू तो कीं
पढवुनी निगमां, त्यातें प्रीति करी त्यांवरी जशी तोकीं ७
ज्या श्री–कृष्णाज्ञा स्तव ज्यां वेदामाजि त्याच वेदास
पढण्यास तोचि कृष्ण स्वीकारी गुरु–गृहा–न्तरीं वास ८
ज्याच्या पद–प्रसादें होत शिला कामिनी क्षणामाजी
तो निज–पादें जाउनि तोडि समि–त्काष्ठही वनामाजीं ९
देवी रमा जयाचे पद रगडी कृष्ण तो रमा–कान्त
गुरु–पद अनुग्रहास्तव हस्तें रगडोनि होतसे क्लान्त १०
ज्याच्या वदना–लोका लोकीं या तपहि तें करी क्षम न
गुरु–वदना–लोकास्तव लुब्ध सदा होतसे तदीय मन ११
जो निजइच्छा–मात्रें वर्षवि सलिलास तो घन–श्याम
आचार्य–कृपा व्हाया भरुनी वारी करीतसे काम १२
त्रि–जगत् पावन जीनें गंगा ती चरण–तीर्थ ज्या हरिचें
तो हरि गुरु–पद–तीर्थास्तव याची गुरुसि बहुत नम्र–वचें १३
हुत–भुक् सृष्टि जयाची त्या हुत–भुक्–सिद्धिसाठिं गुरुभुवनीं
राहुनिया तत्सदनीं तोचि हरी वेंचि इंधनासि वनीं १४
ब्रह्मां–डहि भस्म करी जो निज–संक्रुद्ध–नेत्र–तापानें
त्या कृष्णा भीति मनीं गुरु मजसी दग्ध करिल शापानें १५
ऐसा गुरु–प्रसाद–प्राप्तीचा दाउनी हरी सु–फल
महिमा वदे जना जणु ' या पथें या, भवें न व्हा विकल ' १६
असतां गुरु–गृह–वासी होता गुरु–बन्धु एक या हरिला
नामें सुदामदेव ब्रह्म–रसाचा घडा जयें हरिला १७
सौमित्रि–श्री–राम श्वेता–श्व–श्री–हरीच ते गमती
याहुनि उपमा कैची असल्या ती लभ्य या नसे जगतीं १८
देखुनि हरि–मुख त–त्सख आनंदें मानसीं उडे हासे

हरि--मुख राका--शशिसें त--त्सख--मानस समुद्रसें भासें १९
दु:खें शुष्क वदन जरि, देखुनि हरिसी प्र--फुल्लता पावे
मित्रा--दयास देखुनि जेविं तमः--शुष्क--पद्म उमलावें २०
जिकडे श्री--हरि तिकडे दाम, तयाविण न पळहि दूर वसे
ते धूम--वन्हिसे कीं छाया--काया मरीचि--दिन ऐसें २१
वर्तति बन्धू ऐसें परस्परें ते सुदामदेव--हरी
त--द्वर्तन--जन्य सुखा थोटी त्याला स--देव पाकारी २२
जें सुख भोगिति मुनि--वर मोक्षा जाऊनिया स्व--रूपांत
हरि--सख भोगी भुवि तें कवणा त्याचा कळेल हो अन्त २३
दृष्टि--कटाक्ष प्रभुचा महा--तपेंही न लभ्य यद्यपि, तो
नयना--रविंद--मधुसी हरिचें होउनि मिलिंद दाम पितो २४
ज्याशीं भाषण कैचें मुख दावायाच पुण्य मागतसे
त--द्वाक्--सुधेसि मटमट मिटक्या मारूनि दाम झोडितसे २५
त--त्प्रेमा किति वर्णूं ज्याशीं तुळितां समुद्रही अपरा
हा लवण--वारि तो मधु, या असती त्या न त्या कडा अपरा २६
ऐसें द्वादश--वर्षें मित्रत्वानें वसूनि गुरु--सदनीं
साङ्गोन वेदा--ध्ययना पूर्ण जहाले मह--त्कृपेंकरुनी २७
सांदीपनिनें केले आत्म--सदृश शिष्य हे कुठें न उणें
दीपा दुजा उजळुनी दीप जसा करितसे समान गुणें २८
जाणुनि पूर्ण तयांना दे आज्ञा तो गुरू, गृहीं जाया.
आशीर्वादहि अर्पी नांदा मोदें वरूनिया जाया २९
पूर्ण गुरु--दया जाणुनि वंदिति ते चरण--कमळ निज--गुरुचें
घेती आज्ञा त्याची सदना जाया अतीव नम्र--वचें ३०
मद--मोह--मत्सरा--द्रिक रिपु तन्नाशन धरूनिया नियम
नियता निजा--लयाशीं कैशी त्यांची करील हानि यम ३१

स्व--गुरु--प्रीती आणिक मृत--पुत्र--प्राणे ही तया गुरुला
गुरु--दक्षिणा समर्पुनि आचार्य पुनःपुन्हां शिरें नमिला ३१

श्लोक.

‘ कर्तव्यीं निज दक्षता रति तशी धर्मी असावी सदा
खर्चोंनी निज--बान्धवो--न्नति--पथीं काया निजा सर्वदा
टाकूनी अ--चिरा--यु हें वपु यशा संपादणें भूतलीं
होणें ब्रह्मचि ही प्रसाद समजा म--च्चारु--शद्धा--वली ’ ३३
ऐसा अर्पुनिया प्रसाद गुरु तो शिष्यासवें चालला
वेवोनी करिं त्यांप्रती हळुहळू मार्गावरी पातला
शोभे चन्द्र जसा पुनर्वसुमुळें हता तमा अबरीं
तैसा हा गुरु शोभला भव--तमा जो अजसा संहरी ३४

सर्ग पहिला समाप्त.

गणेश सु० गुणे.

---

## स्वसंवेदमाला[2]

( बोधपर कविता. )

श्लोक. ( भुजगप्रयात )

नमे सावली, भास होई सुखाचा. । फुटे भोंपळा शेवटीं हा भ्रमाचा.
भ्रमापासुनी दूर होशील जेव्हा, । सुखाचें खऱ्या ज्ञान होईल तेव्हा. १६
सुखाचें भरे वेड चित्तांत जेव्हां, । करूं जे नये चार होतात तेव्हा.
असे चार होतील कां सौख्यकारी ? । शिरावें कशाला अशा नष्ट चारीं ? १७
नको दुःख दे जें फुका हर्ष मोठा. । असे शेवटीं त्यात सर्वस्व तोटा

---

१ श्रीकृष्णानें गुरूस गुरुदक्षिणा मागा असें म्हटल्यावरून मृत झालेले पुत्र परत आणून द्या असें ते म्हणाले. त्याप्रमाणें त्यानें पुत्र आणून दिले हीच गुरु दक्षिणा
२ गेल्या अंकात १५ कविता प्रसिद्ध झाल्या आहेत

हिरा टाकुनी गार हातीं धरावी ! । बळें दृष्टि कां अंध ऐशी करावी ? १८
अनिष्टास टाळावया सुज्ञ पाही. । सुखाशेंतची मूर्ख गुंगून राही.
बरा कोणता यातला मार्ग आहे ? । टळे दुःखपीडा कशानें पहा हें. १९
जगाचें दिसे पेटलें रान सारें. । भवाचें मधें चालतें घोर वारें.
अशा पेटल्या काननीं मानवास । कसा दाहिल्यावीण राहील वास ? २०
तरी त्यातल्या त्यांत लागेल जेणें । कमी दाह, तें सर्वथा ग्राह्य जाणें.
न लागो कधीं दाह तो लेशमात्र. । असंभाव्य तैसें नव्हे कां विचित्र ? २१
नसे दुःख तेव्हां सुखाच्या मनांत । अनेकापरी कल्पना खेळतात.
सुखाचें कसें दाविती चित्र रम्य ! । पडे मोह; लीला तयाची अगम्य. २२
जया मूल नाहीं, अशा चित्रमूला । भुलूनी असे का कधीं लाभ झाला
भुले कल्पनेला अशा नष्ट दुष्ट, । तयाच्या कपाळीं सदा दुःखकष्ट. २३
असे नष्ट चांडाळ ही कल्पनाच ! । मनीं तान मारी; करी काय नाच !
कशी ओढिते ती बळें दुर्विकारीं ? । नसावा तिचा संग तो घातकारी. २४
महा घातकी दुष्ट ही चेटकीण. । हिची मंत्रविद्या असे कीं कठीण.
हिच्या मोहजालीं पडे तो सुटेना. । सुखाचा कधीं लाभ त्याला घडेना. २५
दिसे काव्यकादंबरीनाटकांत, । सुखाचें नसे रेखिलें चित्र सत्य.
अशा वाचनानें मतिभ्रंश पावे । सुखाचें पिसें लागतें, त्या जपावें. २६
समुद्रोदकीं क्षारता धर्म त्याचा, । तसा दुःख ह्या धर्म आहे जगाचा.
नये माधुरी आणितां क्षारतोया; । सुखाचा तसा या जगीं यत्न वाया. २७
जशी भव्य इच्छा, तसें भव्य दुःख. । परी अल्प इच्छा, तसें थोर सौख्य
सुखाचें जसें, आपदेचें तसेंच । असे मूल इच्छेंत, हें जाण साच. २८
ह्मणूनी करावी बरी अल्प इच्छा. । खरा मार्ग सोपा असे हा सुखाचा.
उडी उच्च घेता पडे फार लागे. । सुखी पादचारी बिचारा न भागे. २९
दिला जन्म माझा मला मी न सत्य. । बरें, मृत्यु तोही नसे मत्करात.
मनी इच्छिलें कार्य तें वर्तवीन, । असें निश्चयानें जरी सांगवे न. ३०

हवें तें मिळेना, नको तें टळेना, । हवें तें घडेना, नको तें चुकेना.
पराधीनता यापरी सर्वथैव. । सुटेना तरीही अहंमन्यभाव. २१

——————— कै. बळवंत जनार्दन करंदीकर

## मनोहारिणी

पद.

तीच मनोहारिणी—जी—ठसलीसे मन्मनीं ! ॥ ध्रु० ॥
सृष्टिलतेची कलिका फुलली
अनुपम, माधुर्यानें भरली;
जिच्या दर्शनीं तटस्थ वृत्ति
भान सर्वही विसरुनि जाती;
ती युवती पद्मिनी—जी--ठसलीसे मन्मनीं ! १
निज गौरत्वें शशिकान्तीला
लज्जा आणीलचि ती बाला,
तल्लावण्यप्रभा चमकते
विजेहूनिही नेत्र दिपविते !
रूपाची ती खनी--जी--ठसलीसे मन्मनीं ! २
" इच्या कुन्तलावरणाखालीं
तारका कुणी काय पहुडली ?
उज्ज्वलता ही तरीच विलसे
भाळीं ! ' हा उद्गार निघतसे
ती तरणी पाहुनी--जी--ठसलीसे मन्मनीं ! ३
" शीर्षी निजल्या त्या तारेचे
किरण आगळे या रमणीचे

नत्रांशटे काय फाकती !"
उद्धारविते प्रेक्षकास ती
निजदृष्टिप्रेषणीं--जी--ठसलीसे मन्मनीं ! ४

गुलाब गालीं अहा ! विकसले
आणि तेथ जे खुलुनि राहिले,
विलक्षणचि ते--कण्टक त्याचे
सलती हृदयीं कामिजनाचे !
ऐशी ती कामिनी--जी--ठसलीसे मन्मनीं ! ५

मृदु हसता ती मधुर बोलता,
प्रगट होय जी हृदयगमता,
तीच्या म्हणा नयनें श्रवणें
सुरांचींहि वळतिल लुब्धपणें !
ऐशी ती भामिनी -जी--ठसलीसे मन्मनी ! ६

वक्षस्थल पीनत्व पावलें,
गुरुत्वहि नितम्बीं तें आलें;
तेणें सिंहकटित्व स्त्रियेचें
अधिकचि चित्ताकर्षक साचें !
विकल करी मोहिनी--जी--ठसलीसे मन्मनीं ! ७

बहराला नव यौवन आलें,
ओथबुनि तें देहीं गेलें;
म्हणुनि पळाली बाल्यचपलता,
गतिनें धरिली रुचिर मन्दता;
गजगमनें शोभिनी--जी--ठसलीसे मन्मनीं ! ८

सौन्दर्यें शालीन्यें पुतळी

ती रामायण मूर्तचि गमली;
उदात्त मुद्रा, गंभीर चर्या,
यांहीं भारतखचिता वर्या
ती रमणी सद्गुणी--जी--ठसलीसे मन्मनीं ! ९

तिच्या दर्शनें मन उल्हासे,
तिजविण सगळें शून्यचि भासे;
ह्मणुनी करुनी ध्यानधारणा
अन्तर्यामीं बघतों ललना
तीच मनोहारिणी--जी--ठसलीसे मन्मनीं ! १०

केशवसुत.

---

## सौख्यनिर्णय.

### श्लोक.

पराचळवीं मति ती चळेना । वा धीर जो नीतिपथा ढळेना
सच्छील ज्याचें कवचप्रमाण । सत्यव्रताचें धरिलें निशाण १
मनोविकारा वश जाहला न । होई जया पाहुनि काळ दीन
सिद्ध स्वयें जो मरणास नित्य । संपादुनी लौकिक सर्व कृत्य २
जो सोडुनी मोह विमुक्त झाला । चिंताग्नि ज्याच्या हृदयीं विझाला
कीर्ती जगीं वा स्वजनप्रशंसा । ह्यांची जयाची उरली न आशा ३
यत्नें स्वयें जो उदयास आला । हेवा धनाचा न कधीं जयाला
कधीं न दुर्वर्तन ज्यास ठावें । त्याचें किती सौख्य ह्मणून गावें ? ४
संपत्ति सत्पुस्तकसंग्रहाची । ज्याची; जना ज्ञानचि दान वेंची;
सत्संग, सद्भाषण, धर्मवाद, । वाटे जया यातचि फार मोद ५
करीत रात्रंदिन ईशसेवा । की त्या गमे तो चिरसौख्यठेवा
तेणें जरी हो प्रभु सुप्रसन्न । मागे कृपेवांचुनि अन्य जो न ६

देवें दिली जी स्थिति तीस राहे । जो मानुनी; तींतचि सौख्य पाहे
संतोष ज्याच्या हृदयात नांदे । त्यातें कधीं दुःख न यातना दे ७
आशा, जगाचें सुखदुःखमूळ, । जेणें मनीं नष्टविली समूळ
प्रासाद वा पर्णकुटी समान । मानी, तया काय सुखास वाण ? ८
रुचे जया स्वस्तुति अल्पही न । कीं ती करी सद्गुण मोलहीन,
सत्कीर्ति लोकीं विलया तशी ने; । जो नीतिनेमाविण अन्य नेणे ९
सुज्ञानदीपें हृदयीं प्रकाश । पाडोनि, अज्ञानतिमीरनाश
केला; तय आळखुनी स्वतांला । जो आत्मचिंतेंत निमग्न झाला १०
मी कोण ? देवें मज घातलें या । जन्मास कां ? ही दिधली नृकाया ?
कर्तव्य आहे मज काय येथें ? । मनीं विचारोनि करीत तें तें ११
तो धन्य लोकीं नर दुःखमुक्त । त्या लाधलें सौख्य खरें जगात
साफल्य जन्मोनि तयेंच केलें आले तसे अन्य मरोनि गेले. १२

ना. म. देशमुख.

## सुभाषित.

### श्लोक.

वर्षाकाल लयास जाइ मग त्या वधव्य दुःखे महा
झाल्या दिग्वधु तद्विया सकळही निस्तेज कशी पहा
त्याचे पीन पयोधर प्रचुर ते म्लानत्व की पावती
देई ती कृशता तयास अधिका शोभा जणूं आयती १
झाले मंद मयूर संप्रति पहा, अश्राव्य वाणी तशी
झाली ती ह्मणुनी न शोक करिती पत्नी तिची फारशी
हंसांचें रुत डोकण्या श्रुति तदा तल्लीन झाल्या, तसें
वाढे प्रेमचि सद्गुणी सहज हें, ना संस्तती फारसें २

कोणी एक कवि.

# काव्यरत्नावलि.

अंक ५ वा.

## सुरतरंगिणी काव्य.

### प्रसंग चवथा.*

या सर्गांत चांदण्या रात्रीची बहार. नायिकेचें सखीसह प्रयाण. उभयतांची भेट व आनंद इत्यादि प्रसंग दाखविले आहेत.

श्लोक.

ती चंद्रलेखा स्वसखीस सांगे । महेश्वराचें शुभ वृत्त आंगें
बोले " खरी तूंचि जगांत धन्या । न लाधल्या, हें यश, देवकन्या १
प्रेमामृताचा विमलौघ वाहे । त्यातें मिळे सुंदर निर्झरी हे
योग्यस्थळीं संगम हा विराजे । आनंदलें सुंदरि चित्त माझें २
कल्पद्रु¹ तो, तूं नवहेमवल्ली² । गे तत्सुखा सुंदरि तूंचि किल्ली
घे आजि या रत्नकरंडकातें । सौख्यार्थ गे तूं अनुरक्तचित्तें ३
प्रेमामृताचा भर जेथ आला ! । कैंचें उणें तेथ अहा ! सुखाला !
रत्नावली ही धरण्यास कंठीं । नांदे तयाच्या, अनुराग पोटीं ४
आहे दया, कोमल अंतरंगीं । प्रेमामृताच्या विमला तरंगीं
आर्यें तुझ्यावांचुनि अन्य नाहीं ! । आहे सुखाचा निधि हाचि बाई ! ५
पुण्यें तुझीं आजि फळासि आलीं ! । त्यासारिखा अन्य न दैवशाली !
कल्याणकारी कुलदैवतें तीं । झालीं प्रसन्नें तुज, कुंददंती ६

* गेल्या अंकांत तिसरा प्रसंग आला आहे. १ कल्पतरु २ नवीन सुवर्णलता.

आतां सुभावें नमुनी रमेशा । घेई सुखें रम्य विवाहवेषा[1]
गे लाजवी तू अभिसारिकेतें । आनंद दे, भेटुनि वल्लभातें ७
अन्योन्यचित्तें प्रणयानुकूल्यें । झालीं प्रसन्नें द्विजराज बोले
प्रेमाङ्कुरें सुंदर दोन देहीं । आहे जणों एकचि जीव पाहीं ! ८
प्रेमाङ्कुरीं पल्लव जे उदेले । उत्फुल्ल ते सुंदरि आजि झाले
आतां फळें सुंदर त्यांसि यावीं । तेणें सखी ही मम धन्य व्हावी ९
जेथें सदा त्वन्मय चित्तवृत्ति । तेथें कशाची अवधीरणी[2] ती
लज्जावति स्वैरमनेंचि आतां । होई प्रसन्न प्रिय जीवनाथा १०
चाले सखे तू दयितालयाला । निःशंक दे दर्शन त्या प्रियाला
त्या तप्त देहावरि तू कृपेची । छाया करी, सुंदरि शीत ऐशी ११
लावण्य नाचे अति कोमलाङ्गीं ! । तारुण्यही मोहक जागजागीं !
शोभाचि तू सुंदर मंडनाची ! । प्राणेश्वरी हो प्रियवल्लभाची १२
ऐशा तुझ्या कोमल रम्य देहा । शोभेचि हा सुंदर नाथ पाहा
लावण्य दैवें दिधलें ! वृथा तें— । कां वाळवावें ! न कळेचि मातें १३
पुष्पास सौंदर्य सुगंध आहे । तैसाच गे गोड मरंद पाहे
भोक्ता सखा भृंग न ये जरी, तो । गळोनि तन्नाश वृथाचि होतो १४
लीलावति स्वप्रियनाथचित्तीं— । आनंद द्याया जणु मोहिनी ती—
वाणी अशी मंजुळ रंजयंती । ही कां दिली[3] गे तुज ! शोध चित्तीं १५
समृद्धि जेथें अधरामृताची— । ऐशा प्रसन्ना मुख चंद्रम्याची—
शोभा, अशा सुंदर वल्लभासी— । दावोनि कां धन्य न आजि होसी ? १६
आहेस गे तू चतुरे सुशीला । तत्प्रेम तूतें कथणें कशाला ?
चिन्ती तुला जो, परि,[4] सर्व काळीं । ऐशा सख्या, सुंदरि माळ घालीं १७

---

१ नायिकामय. २ अपमान. ३ अगे सुरतरंगिणी तुला जी गोड वाणी देवानें दिली आहे तिचा उद्देश पतिमनरंजन करावें हा होय म्हणून तुला लग्न केलें पाहिजे, हा ईश्वरी संकेत आहे. ४ तुला सांगणें नको परंतु.

घालीन मी नील भुजग वेणी । गुफीन पुष्पें रुचिरें, करांनीं
लावीन मी सुंदर कुंकुमाचा– । भाळीं टिळा, जो अनुराग साचा १८
घालीन मी कज्जल सारसाक्षीं । तल्लीन, तो, होइल, या कटाक्षीं
घालीन भावें नव–रत्न–कांति । कर्णीं तुझ्या सुंदर ताटकें ती १९
नक्षत्रमालेसह चंद्र जैसा । शोभे नथेचा तुज गुच्छ तैसा
साधे जयेनें अनुरागलीला । कंठीं अशी घालिन पुष्पमाला २०
प्रेमोद्गमें मी वलयें करोनी । हस्तीं तुझ्या घालिन रूपखाणि
लाक्षारसें कोमल पाउलें हीं । मी सिद्ध गे रंगविण्यास पाही ! २१
शालू स्वयें सुंदरि, सावराया । तूतें कशाला चतुरे कथाया
पाहीन तूतें वनदेवतेशी । आनंद तैं येइल गे शिगेसी २२
बाई न होवो तुज दृष्टिबाधा ! । देवो तुला मंगल, नित्य वेधा
अन्योन्य चित्तीं दृढ लोभ राहो । हें तूमचें प्रेम फळासि येवो " २३
बोले सखीतें मग सुंदरी ती । " वर्णू किती मी तव साधुरीती ?
ब्रह्मांड सारें मज मोदकारी । झाले सखीचे उपकार भारी २४
जी स्नेहभावें निरपेक्षबुद्धि– । चित्तीं धरोनी करि कार्यसिद्धि
सौजन्य, माया, हृदयांत भारी । जी घे सदा झीज परोपकारीं २५
श्रीनर्मदेच्या परि, निर्मळा जी । धन्या सखी ती त्रिजगांत माझी !
कल्याणकारी, प्रियवल्लभातें । दासू ह्मणे, वंदिन मी तयेतें २६
प्रेमामृताची लहरी खरी तू । वाणी तुझी ही मज सौख्यहेतु
कल्याणकारी वच सज्जनाचें । पुण्यप्रभावें ह्मणि होय साचें २७
माया उणी त्या प्रियमाउलीची । ऐशा तुझ्या निर्मळ मानसाची–
गे हौस आर्यें मज भद्रदाती । आज्ञा तुझी वंदिन कुंददति २८

---

१ कमल नेत्रांत २ वदन हा चंद्र व नथ हीं नक्षत्रें ३ ज्या मालेनें प्रेमसाधनाची क्रीडा होते. ४ कमळनाल वलयें. ५ काठास. ६ सखीचा आशिर्वाद ७ पद्यें १८–२३ पहा.

वंदूनिया मी तुज भद्र–शीले । आज्ञेप्रमाणें जरि सज्ज झाल्यें
धिक्कारिली ही जरि दीन दासी । अर्पील गे हें शिर, त्यां पदासी[1] ” २९
बोले सखी “ संशय सोड वेडे । गे त्वत्सुखाचीं उघडीं कवाडें
आनंदकारी, प्रियजीवनाथा । भेटावया सुंदरि चाल आतां ” ३०
बोलोनि ऐसें, अति रम्य वेषा । देवोनि; तीतें प्रिय जीवितेशा–
भेटावयातें प्रिय मैत्रिणी ती । नादे, जयेच्या, अनुराग, चित्तीं ३१
आनंद साक्षात् सकलां जनांचा ! । कीं पुंज सान्या विमला यशांचा
किंवा विलास प्रिय दिग्वधूचा । तो चंद्रमा ये वरि, पौर्णिमेचा ३२
प्रेमानुरक्ता रजनीमुखोतें[2] । शशी करांनें[3] कुरवाळण्यातें
ये; देखतां चोर घनांधकारें[4] । करप्रहारें[5] करि त्यास चूर ३३
देखोनि शौर्य, प्रियवल्लभाचें[6] । झाली प्रसन्ना रजनी सती ते[7]
नीलाम्बरा[8] नेसुनि सज्ज झाली । नक्षत्रमुक्तावलि, शीघ्र, त्याली ३४
घालूनिया सुंदर जागजागीं । सुगंधशाली कुसुमें शुभांगी
गुंजारवें[9] मंगल गात गाणीं । नटोनि आली पतिसन्निधानीं ३५
ये गार वारा तरुपल्लवांचा । ठेवा सुखाचा, प्रणयीजनांचा
आनंद द्याया प्रियदंपतीतें । गाती प्रमोदें द्विज, मंजुगीतें ३६
पुष्पांजली ती[10] प्रियवल्लभातें । अर्पी शुभांगी अनुरक्तचित्तें
आलिंगितां तो[11] रमणी करांनीं[12] । झाली प्रसन्ना झणि रूपखाणी[13] ३७
वृक्षान्तरीं मर्मर शब्द होती । चाले प्रियांची गुज गोष्ट हो ती
तो सुप्रसन्न द्विजराज ऐसा । त्रिधीं न आल्हाद भरील कैसा[14] ३८

---

१ पतिचरणीं. २ प्रेमानें आरक्त अशा रात्रीच्या मुखास. ३ किरणानें पक्षीं हातानें. ४ अंधकार हा चोर ५ किरणप्रहारानें पक्षीं हातानें. ६ चंद्राचे. ७ ती नायिका. ८ नील वस्त्र पक्षीं नीलाकाश. ९ गुंजारवाच्या मिषानें गायन. १० रात्र. ११ चंद्र १२ हातांनीं पक्षीं किरणांनीं. १३ रात्रीं प्रकाश पडतो असा भाव. १४ मर्मर शब्द हीच गुज गोष्ट रात्र व चंद्र यांची.

सुरत्न[१]–कूटीं, उदयाचलाचे । चकाकती ते शुचि[२] रश्मि[३] ज्याचे
करूनिया दुग्धविलेपनातें । सतेज, मोदें, करि, जो वनातें– ३९
रेवा करी जो धवला, करानें[४] । चकाकती शुभ्रशिळा जयानें
कुमुद्वतीतें झणिं देइ भद्र[५] । तो दे सुखा, मंगलदीपचंद्र ४०
प्रसन्न झालें जग चंद्रिकेनें । जणों सतीच्या भरलें यशानें
प्रफुल्लवल्ली, तरुवल्लभांतें । स्वपल्लवीं दाविति कौतुकातें ४१
विचित्रपुष्पान्वितपल्लवाची । वृक्षान्तरीं लोंबति तोरणेंची
आम्रावरी सुंदर मोहराची । शोभा दिसे खूण सुमंगलांची[६] ४२
शोभे जणों झालर मोतियाची । नक्षत्रमाला विमला जयांसी[७]
नभोवितानं[८] प्रियसंगमा[९] तें । योजी प्रभू मंगलमंडपातें[१०] ४३
चंडोल, तारस्वर तो कराया– । लागे; सुखें कोकिळ तोहि गाया
त्या वंशरंध्रान्तरिं[११] वायु मोदें । आनंद दे मंगलवाद्यनादें ४४
उत्फुल्ल ऐशा नवकुंजभागीं । दे, गंध, आनंदचि, जागजागीं
ते भृंग मोदें मकरंद नेती । गुंजारवें मंगल नाम गाती ४५
वृंदारकांहीं[१२] शुभमंगलातें । मुक्ताफळें[१३] हीं भगणेंचि[१४] हातें–
सानंदचित्तें उधळावयातें । आकाशपात्रीं भरिलीं ! पहा तें ४६
सर्वत्र वैवाहिकमंगलाची–[१५] । झाली तयारी; प्रियसंगमाची
या दंपतीचीं हृदयें अहा ! तीं– । टाकूनि मागें तनु, धांव घेती ४७
न धीर त्यां[१६] आतुरमानसातें । यावी गमे, ती[१७] करुनी त्वरेतें

१ उदयाचलाचे रत्नकूटावर–शिखरावर ज्याचे. २ शुभ्र. ३ किरण पडून चकाकतात. ( उदय पर्वताचीं शिखरें रत्नाच्या शिखरासारखीं दिसतात ) ४ किरणांनीं. ५ कुमुदिनी फुलवून. ६ भावी मंगल कार्याची. ७ ज्या वितानास. ८ आकाशरूप चादवा. ९ वर्ण्य नायकाच्या संगमाला. १० आकाशमंडप ११ वांबूच्या छिद्रांत. १२ देवांना. १३ मोत्यें. १४ नक्षत्रें. १५ श्लोक ४२–४६ शुभ मंगलाची तयारी होय. १६ नायकाच्या. १७ नायिका.

तीतें गमें, आउनि वायुवेगें । नाथा बघावें झणि सानुरागें ४८
बोले सती " हें मन बाइ वेडें । चिंतासुखाचे करण्या निवाडे
आहे प्रियाच्या बघ आजि हातीं । आशा सुखाची, परि माणसा ती ४९
आज्ञे तुझ्या, तीं चरणारविंदें । म्या वंदिलीं गे सखये प्रमोदें
निंदू[1] नको, तो हृदयीं ठसावे । माझें असो वदन शुद्धभावें ५०
माझ्या, सखे, आतुरमानसातें । वाटे, वधावें प्रियजीवनातें
कटाळ वाणी मज वाट साची । या मद पायीं सर ते कशाची ? ५१
झाल्यें जरी मी बहु आकुळा गे । पदीं प्रियाचा अनुरागे[2] लागे
हा चंद्रमा दूत बळें करानें[3] । धरूनि ओढी मम चित्त, जाणें " ५२
बोले सखी " ही दयितालयाची । सीमा बघे, सुंदरि, मंगलाची
शांतप्रदेशीं बघ नर्मदा हे[4] । झाडींतुनी वाहत येत आहे ५३
चंद्रप्रभेनें जणु चंदनाची । ल्याली उटी हीं शिखरें गिरीचीं
छिद्रीं तरूंच्या कर[5] देख सारे । कामध्वजाचे जणु हे फरारे ५४
हे साग जाती घनमंडलातें[6]– । भेटावया; जे,[7] तरु–जीव–दाते
या नारळीच्या बहु पंक्ति देखा । ज्या मंडपाच्या हिरव्या पताका ५५
अशोक, आम्रादिक वृक्ष सारे । फुलोनि देती सुख, गंधभारें
प्रफुल्ल झालीं मखरें लताचीं । सखे तयारी बघ मंगलाची ! ५६
क्रीडास्थळें जीं वनदेवतांचीं । त्या ह्या लतांच्या नवमंडपांचीं
शोभा सुखातें बहु देइ जेथें । पाहे तिथें सुंदर मंदिरातें " ५७
अस्तु. प्रियाच्या गृहसन्निधानीं । येई सखीच्यासह रूपखाणी
त्या पल्लवांहीं वनदेवता ते । आलिंगना, दे, प्रियकन्यकेतें[8] ५८
ती प्रेमदृष्टि, क्षण, पुष्पजन्यां । टांकोनि, कन्येवरि, होय धन्या
मंदानिलें मंगलदा परागा– । कल्याण व्हाया उधळी वरागा ५९

---

१ ह्याचें कारण पुढील श्लोकांत २ प्रेमाचा रंग लाल ३ हातानें पक्षीं किरणानें. ४ ही ५ किरणें ६ घनमंडळास. ७ घन. ८ नायिकेस. ९ पुष्परूप प्रेम.

ऐशी प्रसन्ना बघुनी शुभांगी । आनंदला तो द्विज[1], अंतरंगीं
आलें फळा, जें बहु पुण्य केलें । सान्या सुखाचें, नवपात्र[2] आलें ६०
प्राणेश्वरीच्या मुखचंद्रम्यातें । तो देखतां, त्या हृदयाम्बुधीतें—
लाटा सुखाच्या बहुसाल आल्या । प्रेमोद्गमें तन्मय वृत्ति झाल्या ६१
ती सुंदरी पाहति चारुनेत्रें[3] । झालीं वृथा सस्पृह अन्यगात्रें
पुण्यें अगण्यें नयनींच केलीं । याकारणें धन्यें, म्हणि तींच झालीं ६२
देखे प्रिया, ती नव–काम–यष्टि । झाल्या क्रमें दोन्हिहि एक, दृष्टि
लज्जावती ती अति कोमलांगी । रोमांचिता कंपित होय अंगीं ६३
ऐसें सखी देखुनि ती शहाणी । त्याच्या सुखाचीच जिला शिराणी
बोले " सखे सोडुनि लाज आतां । तू माळ घालीं प्रिय जीवनाथा ६४
पाहे कसा हा सरलस्वभाव ! । सान्या गुणा हा अति रम्य ठाव !
आनंद साक्षात् तव चक्षुंचा हा ! । दैवें मिळाला वर योग्य पाहा ६५
ओवाळुनी मंगल आरता हे । पुष्पांजली या दयितासि वाहे
निःशंक आतां सखये करातें । अर्पीं सुखें या करुणाकरातें " ६६
ऐसें सखीचें वच आयकोनी । प्रेमें अपांगें पतिला बघोनी
हर्षें, भरे तो अनुराग पोटीं । संकोच वाटे, मनिं लाज मोठी ६७
अत्याग्रहें ती मग भीत भीत । पाहे सखीतें, स्मरुनी स्वतात
वंदूनि भावें मग तीहि आली । प्राणेश्वरातें म्हणि माळ घाली ६८
ती मंगला सुंदर रम्यमाला– । लागे प्रियेचा करकंज[4] जीला
देखोनि कंठीं बहु हर्ष झाला । महेश्वरा, पार न त्या सुखाला ६९
चंद्रासि जैसी प्रिय रोहिणी ते । विद्युल्लता ती जलदप्रियातें
विष्णूस लक्ष्मी प्रणयें भजे ती । तैशीच या ती वरि कुंददंती ७०
महेश्वर प्राणसखीसवेंची । वंदी पदें ती कुलदेवतेंचीं

---

१ नायक २ नायिका. ३ डोळे मात्र त्या सुंदरीस पहाते झाले.
४ कर दे ( वर )

वंदूनि भावें मग नर्मदेतें । सानंद चित्तें वदला स्वसेतें[1] ७१
“ गे पंच भूतें स्मरुनी महा[2] हीं । वंदूनि भावें कुलदैवतेंही
वंदूनिया त्यापरि नर्मदेतें । प्राणेश्वरीच्या धरितों करातें ७२
तीर्थें पवित्रें अवघीं स्मरोनी । झाली असे ही मम धर्मपत्नी
धर्मार्थकामीं सहधर्मिणी ही । माझी अशी मी ह्मणवीन पाहीं ७३
प्राणेश्वरी दुर्धर संकटीं ही । गे मी स्वसे ही त्यजणार नाहीं
श्रीनर्मदेची मज आण पाहीं । हें प्रेम आतां ढळणार नाहीं ७४
गे नर्मदा ही, वनदेवता ही । या तारका, सोज्वळ चंद्रमाही
साक्षी असो, या प्रियसुंदरीनें । महेश्वरा या, वरिलें सुखानें ७५
वत्से तुझी देखुनि चातुरी ती । तैशीच आर्ये तव साधुरीती
आनंदलों; प्रेम अखंड ऐसें । अन्यस्थळीं सांग मिळेल कैसें ७६
गे कोवळें मानस सज्जनांचें । लोकोपकारीं झिजणार, साचें
वर्णूं किती निर्मळ मानसाला । आलीस गे तू चतुरे कसाला ७७
धन्या खरी गे प्रियसुंदरी ही । धन्या सखी जीवरि लोभ ठेवी
गे धन्य मीही तुझिया कृपेनें । धन्यत्व ये सज्जनसंगमानें ” ७८
बोले सखी “ ही अवघी दयाळा । कृपा तुझी सत्यचि पुण्यशीला
पुण्यें सतींचीं अवघीं फळातें-- । आलीं; वरी बा प्रणयें तुला तें ७९
देखोनि ऐशा प्रियसंगमातें । आनंद झाला बहु आजि मातें
जोडा असा हा, रतिमन्मथाचा । नांदोनि, होवो सुत रम्य साचा ८०
गंगेपरी निर्मळ सुंदरी ही । बघो जरा कैतव येथ नाहीं !
मुग्धा वधू प्रेमचि एक जाणें । ही रक्षिली आजवरी पित्यानें ८१
आतां, जशी पश्चिमसागरातें । ही नर्मदा त्या गिरिराजतातें
सानंद चित्तें ह्मणि अर्पियेली । तैशी तुझ्या तों पदरात घाली ८२
सुटे तिच्या आजि ऋणामधोनी । ही जाहली बा तव आजि राणी

---

१ चंद्रलेखेस. २ पंचमहाभूतें.

खाणी सुखाची धरि शुद्ध भावें । अंगीकृतातें सुजने जपावें ८३
शोभा गृहाची प्रियमैत्रिणी ही । संसार धैर्ये करि मोद देई
आनंदकारी प्रियपुत्रलाभें । लक्ष्मीपरी स्त्री सदनांत शोभे ८४
धर्मार्थकामीं रमणी खरी ही । पतिव्रता दे परमार्थ पाही
सतीच लक्ष्मी ह्मणि पुण्यकीर्ति । प्रेमामृताची सरिता सती ती ८५
आधार जी संकटिं धीर द्याया । भाग्योदयीं ही मन रंजवाया
प्राणेश्वरातें सदयें जपाया । दासी स्वयें होइल एक जाया ८६
आजन्मदासी, चरणारविंदां । सेवील, आर्या, धरुनी प्रमोदा
बघो, सखी ही मम, रक्षिण्याला । तूतें दयाळा कथणें कशाला ८७
तूतेंहि आर्ये कथणें न लागे । हा स्नेह बाई, बदली परी गे
पतीच हा ईश्वर सुंदरीचा । आधार आहेच खऱ्या सुखाचा ८८
प्रसन्नचित्तें रमवी पतीतें । न रोष यावा पतिचा सतीतें
सौंदर्यखाणी ! परि ती बजांगी[1] । निंदूनि घे सुंदरि जागजागीं ८९
प्राणेश्वराचें मन तू शुभागे । कठोर शब्दें मळवू नको, गे
आनंद देई विनयें तयाला । बाई ह्मटे तू पतिच्या सुखाला ९०
सौख्या तुझ्या, डोंगर घे उरीं तो । कष्टें, सखे, जो धन मेळवी तो
रानीं वनीं हिंडुनि ताप सोशी । तो गोड वाणी तव मात्र वांछी ९१
प्रेमामृताचा अति गोड ऐसा-- । वाहे झरा तेथ कशास पैसा !
गेहीं प्रसन्ना बघुनी स्वदारा । जातो पतीचा ह्मणि शीण सारा ९२
सेवा पतीची विनय करावा । संतोष वृत्तीच सदा धरावा
सदा ह्मटावें पतिरंजनातें । घ्यावें सतींच्या[2] विमला व्रतांत ९३
देवा तुह्मां मंगल नित्य देवो । अखंड, गेहीं धनधान्य राहो
अन्योन्यचित्तीं दृढ लोभ राहो । आनंदकंद प्रियपुत्र होवो " ९४

---

१ घाडगी. स्त्री सौंदर्ययुक्त आहे पण कजाग असली तर कवडीमोल होते. सौंदर्यापेक्षां गुणाला किंमत. २ पतिव्रतेच्या.

देवोनि ऐशा रुचिरा वरातें । कल्याण केलें सखिनें पहा तें
या दंपतीच्या विमला यशातें । घे, चंद्रमा, लाजुनि, लाछनातें १९

सर्ग ४ था समाप्त.

विठ्ठल भगवत लेंभे.

## श्रीसुदामदेवचरित्र.

### सर्ग २ रा

### गुरूपदेश. ( आर्या. )

द्वादश--वर्षें ज्याचा संगम ते आजि जाति हे बाळ
देखुनि गहिंवरला गुरु नेत्र जलें भरुनि जाहले लाल १
घेई चुंबन त्याचें गुरु तो अ--सकृत् परी न शम पावे
स्वादिष्टा--न्न--सुभोजी त--द्वासें केवि तृप्तता पावे ? २
धरि हृदयीं, सोडि पुन्हां ढाळी अश्रू ह्मणे ' बरें मरण '
अन्योन्य--विरह--दु:खें रडती अन--सूहि कर्दली--पर्ण ३
हृदय--विघृत--शिष्यांवरि सहस्रशा बाष्प--बिंदु तो गाळी
वाटे सु--मौक्तिकानीं गुरु तो गमनेच्छु शिष्य आघोळी ४
गहिंवर देखुनि गुरुचा सद्गद ते जाहले न शद्ब निघे
चित्र जसें चित्र--पटीं स्तब्ध तसे राहिले तिघेहि उभे ५
तेव्हां येता झाला कंठापर्यंत शद्ब सर्वांचा
परि बाहेरि न पडला कंठ असे व्याप्त गहिंवरें साचा ६
रोमा--चित--तनु होउनि गुरु शिष्यांची सु--गात्र--शक्ति सुटे
स्मृति हरपे वदवेचि न गहिंवर अतां फुटोनि अश्रु सुटे ७
खळखळ वाहे पाणी नेत्रांतुनि तें पडूनिया गालीं
नीलो--त्पल उदका--कित तैशी शोभा तदा तया आली ८
तार--स्वरें गुरु ह्मणे ' होता विश्राम--धाम आजवरी

जाता ना आतां रे, बाळानो मजसि तुष्ट कोण करी ९
कोणां उपदेशू मी कोण मला तोषवील सु--वचानीं
कोण स्व--चेष्टितानीं रमविल मम चित्त नित्य या स्थानीं १०
विधिच असा मम, तेथें माझा तुमचाहि काय अन्याय
सन्याय देव करितो मान्याऽमान्यावरी न तन्नयाय ११
कृष्णा, उगा, रडु नको, दामा तूंही उगा रहा बाळ !
स--स्फूर्ति मनीं स्मरुनी न्याय--पथें वर्तुनी क्रमा काळ १२
पर--धन पर--दारा ही गरलासम मानुनी रहा दूर
ऐसें उपदेशी त्या परि अश्रू लोटती जसा पूर १३
पर--धर्म हा भया--वह, निज--धर्म असे सुखा--वह, स्वर्ग
सत्य--त्व--तपें मिळतो हीं वाक्यें स्मरुनि चालणें मार्ग १४
कर्तव्य नका सोडू, हित--कर मार्गा चुकू नका स्वप्नीं.
अध्ययना विसरूं नका, सत्य--व्रत बाळगा सदा स्व--मनीं. १५
जरि शक्य पर--पुष्टी निज--हानीनें करा न दु:ख वरा;
जैसा वृक्ष स्व--फलें अर्पुनि, करि तुष्ट सर्व--काल नरा. १६
जरि पर--पीडित झाला तरि पीडक--तुष्टतेसि यत्न करा
जरि पक्व परी ओदन देत असे पाचकासि तुष्टि खरा १७
माता पिता निज--गुरू गुरु--जन देवा--समान मानावे
पर--जनदोष त्यजुनी गुण त्याचे ग्रहण करुनि वानावे १८
जें दत्त न वर्णावें श्रद्धेनें देय दान अर्पावें
कर्तृ- त्व आपणासी घेता ईशा न दान तें पावें १९
करुनी उपकारातें व्हावें मनुजें सु--नि--ष्कलंक--मन
जेवी जला समर्पुनि उपकारें नि--ष्कलंक होत घन २०
निज--काया श्रमवुनिया पर--दु:खाचें करा सदा शमन
जैशी सु--वर्तिका करि जाळुनि काया जनां प्रसन्न--मन २१

सुष्टासीं दुष्टासीं वागावें सर्व--काल समतेनें
जेवी धेनु--व्याघ्रां जल दे शांति न कदा वि--षमतेनें २२
ठेवुनि उपदेश मनीं वागा रे सर्व--काळ संसारीं
होईल तुष्ट सुष्टा आचारा देखुनी अनगारी २३
" पाथेय दत्त न पुरे, कथिता बुद्धिहि पुरे न कोणाला "
यास्तव आत्म--ज्ञानें वर्तुनि संतुष्टतोसि द्या मजला ' २४
ऐसें उपदेशुनिया धरि तो गुरु हृदयिं शिष्य बळकटसें
तेव्हा वाटे त्यांना सुख--जल--धीमाजि लोटिले ऐसें २५
श्रम--नोदन करुनि असें, ' जा आता ' ह्मणुनिया निघे परत
करुनी कठोर मानस धन्य गुरू जो असे सु--शिष्यरत २६
पितरापरी गुरु असे, न तिळहि त्याचें उणें असे प्रेम
स--च्छिष्य मात्र व्हावा तनयासम पाळिती असा नेम २७
गुरु माघारी फिरतां टाकिति ते मंद मंद पादातें
गुरु--हार्द--शृंखलेनें होते जणुं बद्ध--चरण मज गमतें २८
चालति पथ पदानें परि मन गुर्वा--श्रमीं तया शिशुचें
बद्ध--प्रीति सु--वस्तू सोडीना मानसासि हें साचें २९
चालति पथा फिरविति दृष्टि पुन्हा आश्रमाकडे गुरुचे
चरण--स्तेनें त्यांच्या वपुचें अप--हरण मांडिलें साचें ३०

मंदाक्रान्ता.

ऐसा मार्ग क्रमित असतां रम्य उद्यान--माला
लागे, जीचे तरु--वर मुखें चुंबिती कीं नभाला
पांथा पाचारिति करुनिया पल्लवां--गुष्ट--संज्ञा
सेवायातें किसलय- करां जोडुनी घेति आज्ञा ३१

सर्ग दुसरा समाप्त.

---

गणेश--सुत गुणे.

## स्वसंवेदमाला*

### ( बोधपर कविता. )

### श्लोक. ( भुजंगप्रयात. )

जगीं दृष्ट वा स्पष्ट सारे पदार्थ, । न का होत ते मानवाच्या सुखार्थ ?
न खावें, न प्यावें, विलास त्यजावे; । कशाला तरी व्यर्थ जन्मास यावें ? ३२
नसे सत्य वा नीति वा पुण्य काहीं; । तसा धर्म या कर्म वा स्वर्ग नाहीं.
पुढें काय होणार कोणा न ठावें, । तरी आजच्या कां सुखाला मुकावें ? ३३
सुखाचा जगीं मांडला खेळ सारा. । तयाचाच विस्ताराला हा पसारा.
कशाला बळें संयमा आदरावें ? । सुखाकारणें सर्व काहीं करावें ३४
टळे दुःख का नीतिनें, सत्यतेनें ? । मिळे का समाधान ऐशा रितीनें ?
सुखाची घडी चालली ती त्यजावी. । कळेना बळें आपदा का वरावी ? ३५
असा व्यर्थ जेव्हां मतिभ्रंश होई, । तुझें तू स्वताला विचारून पाहीं.
'अरे कोण तू ?' 'मीपणा हा कशाचा' ? । फुगारा फुगू दे न हा संभ्रमाचा. ३६
फुटायास त्याला न लागेल वेळ. । पुढें काळ येतां तुला हें कळेल.
सदा सारखें सत्य त्याला न बाधा. । सुखाचा तसा मुक्तिचा तोच रांधा. ३७
असे सत्य, सत्यस्वरूपी जगाचा । नियंता, धरी ध्यास चित्तांत त्याचा.
नको घातकी पंथ हा नास्तिकाचा । न होईल अतीं कधींही सुखाचा. ३८
असा सत्यरूपी जगाचा नियंता, । तयाच्या पुढें सर्व सोडी अहंता.
तयाला स्मरावें, नमावें, भजावें, । तयाचें सदा सर्वदा गीत गावें. ३९
दिली देणगी बुद्धि मोठा प्रसाद, । नको तो नको पातकीं ने प्रमाद.
न का बोंचती आड रानांत कांटे ? । बरें नीतिचें चालणें नीट वाटे. ४०
तुला मोहवी सौख्य तें बेगडाचें. । नसे तें नसे तें नसे कांचनाचें.
खऱ्या कांचनाच्या सुखाला न अंत. । असें सौख्य नाहींच नाहीं जगांत. ४१

---

* गेल्या अंकांत ३१ श्लोक आले आहेत.

चकाके नभीं वीज, तत्तेज पावे। क्षणीं अस्त, आकाश तेव्हांच व्हावें
तमें व्याप्त; आहे तसें सौख्य जाण. । सुखांतीं पुनः दुःख गोष्ट प्रमाण. ४२
सुखाला अशा शाश्वती ती मुळींच. । नसे. प्रत्यया ये कथाया नकोच.
असें सौख्य जें सर्वथा नाशवंत, । पडावे न मोहीं तयाच्या प्रशस्त. ४३
स्वताचें कमी दु:ख व्हाया झटावें. । परालाहि त्या कारणीं साह्य व्हावें.
सुखी अन्य पाहून पावे सुखातें, । तयाच्या सुखाचें खरें तेंच खातें. ४४
खऱ्याचा करावा सदा अंगिकार. । असत्यास द्यावा कधींही न थार.
खरें तेंच सर्वस्व येईल कामा. । खरें तेंच ने शेवटीं सौख्यधामा. ४५
असत्यें जरी लाभ मोठाहि झाला, । भुलावें न त्याच्या तरी आमिषाला,
खरें बोलणें, वागणें, हाच धर्म । नसे भीति सत्यास, तैसे न वर्म. ४६
खरें चालतां दुःख होईल होवो; । धरावा तयाचा तरी नित्य टाहो.
खरें आवडे ईश्वरा तेंच तारी. । खरें निश्चयें तेंच कल्याणकारी. ४७

—— कै. बळवंत जनार्दन करंदीकर.

## राम-मत्स्य-संवाद.

श्लोक.

कापट्यें जनकात्मजा दशमुखें नेता हरोनी बळें
शोकव्याकुळ धैर्यपर्वत ढळे पोळे वियोगानळें
भार्यतें मग दक्षिणेंत जइं तो शोधावया चालला
सौमित्रासह रामचंद्र भगवान् पंपासरा पातला १

शोभे शांत सुरम्य तें सर भलें तोयें सुधेच्या परी
पद्में फुल्ल अहा! किती विलसती तज्जीवनाभ्यंतरीं

ऐसें तें रमणीय सत्सर सुखा सीताधवा फार दे
खेदातें विसरे असें मग तदा तो लक्ष्मणातें वदे २
लक्ष्मणा रुचिर सत्सर हें महा । माझिया सुखवि खिन्न मना पहा
स्वच्छ यज्जल असें अमृतासम । सेवितां करिति कीं विलया श्रम ३
नीरमध्यगम हीं कमळें किती । फुल्ल शोभति जयास नसे मिती
गंधलुब्ध मधुपव्रज सेविती । तन्मधुप्रचुर सत्सुख पावती ४
गंधयुक्त सकलवन कारण । श्रांतपांथजनतापनिवारण
मंद मंद विचरे सुखवू जना । हा हिमानिल सुखप्रद मन्मना ५
कोकिळा करिति मंजुळ गायन । जाय तें परिसुनी मन वेधुन
गान हें न गमतें हृदयांतला, । शुद्धभाव करिती स्फुट आपला ! ६
सन्मनुष्यमन जेंवि सुनिर्मल, । हें प्रसन्न मज तेंवि गमें स्थल
वैरता दिसुनि ये लव ना मला, । येथ शांति वसते परमोज्ज्वला ७
मानिती जन जयास महा ठक, । साधु तो गमतसे मजला बक
खेळतो जलिं सुखें स्वपदें कशीं, । टाकितो करुनि हा बघ चौकशी ८
कीं जलस्थ लघुजीवशिरीं पद, । त्या पडोनि क्षणिं होइल मृत्युद
हा विचार करुनी मनिं वागतो, । नीतिमत बक हा मज वाटतो ! ९
रामचंद्र वदता अनुजा असें, । वर्तलें नवल एक तिथें असें
राघवोक्ति परिसोनि जलीं सुखें, । यापरी वचन मीन वदे मुखें १०
पुर्व पुण्य उदया अजि आलें, । कीं तुझें चरणदर्शन झालें !
तू समर्थ असशी रघुराया । । या जडास भवमुक्त कराया ! ११
राघवा ! असति तू सकलज्ञ, । दीन मीन लघु मी जरि अज्ञ
बोलतों तुजपुढें परि धीट, । ऐक वा धरिं न तू मनिं वीट १२
टाकितो हळहळू स्वपदांतें, । पाहुनी गणिसि साधु बकातें
त्याचिया परि मनांतिल कावा, । केंवि शुद्ध हृदयीं तव यावा ? १३
आपणासमचि सर्व जगात, । शुद्ध धी, गणिसि तू स्वमनात

नीच लोक पण या जगतांत, । फार फार सदया ! बसतात ! १४
साधुता वरति दाखवि मोठी । वासना धरि मनीं बहु खोटी
बाह्यरूप बघुनीच भुलावें । काय सज्जन तयास गणावें ? १५
हा तसाच बक हिंसक नीच । पापभीति नय या न मुळींच
मीन ये न जव दृष्टिपथात । हा बसे कुटिल तोंवरि शांत १६
या बकें टपुनि अष्ट दिनांत । मत्कुलास धरिलें उदरात
एकटाच उरलों बघ आहे । पूर्व पुण्य ह्मणुनी तुज पाहें १७
एक तोच सहवासि गुणासी । जाणतो सकल तत्सहवासी
ज्यास भीति बघता मज दाटे । तोच धार्मिक तुला बक वाटे १८

कपट न तुज ठावें पूर्ण कारुण्यसिंधो
सरल हृदय सर्वां मानिसी दीनबंधो
परि बकसम लोकीं नीच आहेत फार
टपुनि फसविती तें कीं न चित्ता विचार १९

यापरी परिसुनी झषवैखरी । खोंचला रघुकुलोत्तम अंतरीं
काय तो मग तया जलगा वदे । हर्ष भाषण तुझें मज फार दे २०
बोललासि समयोचित तू झषा । मान देइन न मी मग त्या कसा ?
राघवोत्तम असें तइ बोलुनी । आठवी निजसतीप्रत तो मनीं २१
खेद पूर्ण तइ तन्मन जाहलें । लक्ष्मणें सकल कारण जाणिलें
योजुनी सविनयें मृदु वैखरी । बंधुचें सुमति सांत्वन तो करी २२

कर्तव्यातें समजुनि मनीं होउनी सावधान
पंपातीर्थी अनुजसह तो सारुनी स्नानपान
त्या मीनातें सदय हृदयें उद्धरोनी निघाला
कौसल्येचा तनय सतिचा शोध लावावयाला २३

—————— विष्णु बाबाजी कुळकर्णी.

# काव्यरत्नावलि.

अंक ६ वा.

## सुरतरंगिणी काव्य.

### प्रसंग पांचवा.[*]

नायक व नायिका यांचा नर्मदा तटाकीं विहार. वादळाचें वर्णन. नांव बुडणें. वगैरे प्रसंग ह्यांत दाखविले आहेत.

श्लोक.

आली महेश्वर गृहीं नव-यौवना ती
नारी जिच्या अवयवां नवला करीती
आनंद दे गुणवती प्रियवल्लभाते
ह्या सुरम्य कविता रसिकां जशी ते ॥१॥

संकोच तो हळुहळू हृदयासि सोडी
पाहे प्रिया स्मित मुखें, क्षणि कोप, थोडी
त्याच क्रमें बहु संकुचित भाषणीं ती
प्राणेश्वरा, प्रणयसौख्य जाणवीती ॥२॥

लज्जावती हळुच खोलुनि नाथ देखी
प्रेमोद्गमें स्तनपदांबुनि कामराशी

---

* गेल्या अंकात चवथा प्रसंग आला आहे. १ पाहत असें मागें ती आता धीट झाली असा भाव.

आतां गळां भुजलता अति कोमला ती
घालावया स्मितमुखें; नयनांत भीती ३

होतें, अहो, प्रथम जें " पति " हेंचि नातें
आली क्रमें " दयित " ही पदवी तयातें
कालेंचि तो " रमण " हो रमणीय झाला
आतां असे नियळ " जीव "चि सुंदरीला ४

एके दिनीं गिरिवरी प्रिय सुंदरीतें
घेऊनि जाय बुध शंकरदर्शनातें
वंदूनि भद्रकर सुंदर पाउलें तीं[२]
भावें नमी गिरि-सुतौ, नवफुल्ल जाती ५

विश्वाचिया बघत सुंदर वैभवातें
तो ये अशोक तरुच्या हिरव्या वनातें
छाया असे तरुतळीं सुख द्यावयातें
येई सुगंध अणि शीतळ मद वातें ६

तें गार गार जळ निर्मळ टाकियाचें
श्रांतासि ह्या निवळ जीवन होय साचें
नाना शिला सुधवला असती; बसोनी
त्यांच्यावरी क्षणभरी द्विज सौख्य मानी ७

केली जिची तनु जणों नवपल्लवांनीं
होती अशी सुरुचिरा पतिसन्निधानीं
शोभे प्रसन्न वदनावरि धर्मराजी
लावी सुरम्य निटिलीं तिलक स्वयें जी ८

१ नायक २ शंकर पदें ३ पार्वती ४ नवी फुललेली जाई

वेणींतुनी सुकुसमें गळतीं तळीं तीं
तीं कंकणें किणि किणी झणि वाजताती
ती प्रेमदृष्टि पतिच्या अति चारु देहीं—
लागोनिया सुख भरे हृदयांत पाहीं ९

मंजुस्वना, पतिमना जणु मोहिनी जी
लीले न ती करिल कां प्रियनाथ राजी
देखे महेश्वर अशी नवरत्नमाळा
झाल्या क्षणांत अवघ्या तनुवृत्ति लोला १०

प्रेमोद्गमें प्रियतमा हृदयीं धरी ती
बोले " प्रिये सुखविते तव दिव्य कांति
ऐशा सुरम्य तनुतें बघण्यास डोळे
विश्वंभरें करुनि दोनचि काय केले ११

गे, लाभ जेथ सदये तव संगमाचा
आनंदकंदचि तया सदनांत साचा
संसार जे म्हणति होय असार, त्यांतें
गे लागलें खचित वेड गमेचि मातें १२

स्निग्धा उटीच जणु शीतळ चंदनाची
शय्याचि कीं रुचिर कोमल पल्लवांची
कीं, चंद्रकांतमणिमंडित रम्यमाळा
ऐशी प्रिया त्यजुन, रोष, अहो, कशाला १३

तीं मंद मंद वचनें वदुनी प्रियातें
लोले क्षणें, स्मितमुखें, परिरंभणातें—

---

१ नायिका. २ अंग स्पर्शानें चंदनाच्या उटी सारखी शीतळ. ३ कीं कोमल पल्लवाची शेज. ४ कीं चंद्रकांत मण्याची माळ. ५ अंगास लावण्याची.

देवोनिया, हृदय तें अनुरंजवाया,
भार्याचि एक ह्मणि नंदनसौख्य[1] ज्यया। १४

आहे, असी कुटिलता लव केशपाशीं
भृंगावलि प्रियतमे तुळिते जयाशीं।
आहे किती हृदय कोमल ! सद्गुणांस—
देती, असे, सु—मुखि, भूषण, अल्प दोष १५

प्रेमप्रसन्नवदनाम्बुज पाहियेलें
तें, मजु मजु, तव भाषण आयकीलें
गोडी कळे, प्रियतमे, अधरामृताची !
सीमाचि येथ, रुचिरा नव—यौवनाची। १६

झाले तुझे सुखद मुग्धविलास मातें
गे शोभले सुरतरंगिणि नांव तूतें
आनंदलों सुचरिते गुण देखुनीया
गे स्वर्गसौख्य गमतें मजलागि याशीं १७

हें अल्प हास्य, वदना, बहु शोभवीतें
ही प्रेमदृष्टि चपला रिझवी मनातें
ही सूचवी, गजगती, नव—यौवनातें !
हा नूपुरध्वनि अहा ! भ्रमवीच मातें १८

लोकीं बहू रणधुरंधर शस्त्रधारी
त्या, जिंकिती त्यजुनि रम्य कटाक्ष, नारी
हे प्रेमपाश पडल्या—वरि सुंदरीचे
होतें समग्र बळ, कुंठित या मनाचें १९

१ नंदनवनींचें सुख पक्षीं पुत्रसुख.

“ आली प्रिया ” सुचवितो रव नूपुरांचा
चित्तीं प्रकाश पसरे मुखचंद्रम्याचा
नेत्री कटाक्ष, हरुनी मन मोहुनीया,
आनंददाचि अशि अद्भुत रम्य माया[1] २०

गे मोहिनीच दुसरी तव मंजु वाणी,
कामेश्वरें शिकविली तुज गोड गाणीं[2]
पाहे, जणों धरिति ताळचि कंकणें तीं
गुंजारवा, मधुर बोलुनि, वाजवीती २१

गे. चंद्रखंड तुरुनी जणुं लावियेलें
स्पर्शी तुझ्या, बघ असें मन गार झालें
आलिंगिलीच जणुं म्यां नव कल्पवल्ली
आनंदवृत्ति सखये बघ आजि झाली २२

इच्छा मनीं धरियली तव दर्शनाची
ती लालसा पुरविलीस जरी मनाची
गे सोडवे न परि, हें प्रियपात्र[3] मातें
म्यां ठेविलें, ह्मणुनि, या हृदयांत, कांते २३

मूर्ति स्वयें भुवनसुंदरि, मंगलाची
कीं देवताचि हृदयांतिल मंदिराची
प्राणेश्वरी ह्मणवितां तुज, धन्य मी गे
कोणें तुला शिकविला अनुराग सांगे ” २४

बोले सती “ चरण हे मज साह्य[4] झाले
त्यांनीं वरोनि तनु, हें[5] मज धन्य केलें

---

१ मायावी क्रिया. ( स्त्रियांचे मुग्धविलास ) २ स्वरचित गाणीं. ३ तूं प्रिया. ४ पाघास. ५ माझें शरीर.

हें सुप्रसन्न वदनाम्बुज देखियेलें
तेणें बळेंचि मजला अनुरक्त केलें २५

या किंकरीवरि वळे लहरी कृपेची
झाल्यें, स्नुषा सुचरिता विमला कुलाची !
स्वात्यम्बुचीच कणिका, परि शुक्ति[1] देई ! –
मोत्येंपणा; सुजनसंगम थोर, बाई २६

हीं पाउलें निशिदिनीं मज भद्रकारीं
ही शोभवी मजसि सुंदर मूर्ति भारी
या सद्गुणेंचि हरुनी मन, धन्य केलें
साऱ्या सुखांसि गुरु हे प्रियनाथ झाले " २७

बोले सुधी, " किति तरी तव गोड वाणी
जाणों सदैव भरली मधुरा रसांनीं
हे मोहिनी, पतिमना हरण्यास, सांगे
अस्त्रें दिलीं किति तरी विधिनें तुला गे २८

नेत्रासि यां रिझविण्या मुखचंद्र आहे !
वाणी, तशी, रिझविण्या श्रवणासि, पाहे !
सर्वेन्द्रियां, सुखविण्यां, भुजपाश आहे !
मोहावयास, मन, रम्य विलास, पाहे २९

वाणीस या स्वगुण दाविल काय वीणा
हा मोहमंत्र कळला न सुरांगनांना
कर्णांसि मात्र सुख देतिल मंजुगीतें
वाणी तुझी, सुखविते सकलेन्द्रियांतें ३०

---

१ स्वाती नक्षत्राच्या पाण्याचा थेंब असतो पण शिंपेच्या आश्रयानें मोत्यें होते म्हणून सुजन संगम थोर आहे. २ शिंप.

आनंदलों, सुखद, या तव संगमानें
आनद आजि भरला त्रिजगात जाणें
रेवाप्रदेश दिसतो रमणीय पाहें
ही डोंगरातुनि खळाळत येत आहे ! २१

पाहें सुरम्य धवलों सखि पर्वताली
रेवाजळें करुनि, सुदरि भग्न झाली !
गभीर रम्य रचना बघ नर्मदेची
प्रत्यक्ष भूयुवतिची नव मेखलाची २२

ती पाहिं गे सखि भयकर धूम्रधारों
कोलाहलें बसतसे हृदयीं दरारा
पाताळ फाडिल गमे मज नर्मदा ती
कुंडीं जलाशय धरी बघ दुग्धकांति २३

पाहेंचि दूरवरि ही खडकाळ आर्ये
रेवाजळेंचि घडलीं बघ सर्व कार्यें !
शांत प्रदेश दिसतो, परि येथ मार्गे—
झाल्याचि चूर्ण शतधा तरणी शुभांगे ! २४

झाडी असे निबिड, यास्तव या गिरीतें
शोभा असे, निरखुनी सखये पहा तें
शोभाचि कारण सखे तुज रंजवाया
तेणें प्रसन्न मुख हें मिळलें बघाया २५

हें पाहिं अद्रिवरि मंदिर शंकराचें
गे छत्र ज्यावरि असे घनमंडलाचें

१ पादरी. २ पर्वताची ओळ. ३ कमरपट्टा. ४ धुवाधार. ५ कुंडांत.

हे शुभ्र ओघ, सुकले जरि निर्झरांचे
झालेचि हार जणुं हे गिरिराज याचे ३६

गे ही भयानक दरी जरि खोल आहे
येथें किरात फिरती मृगयार्थ पाहें
व्याघ्रप्रतिध्वनि इथें परिसूनि कानीं
शौर्यें शिकार करिती प्रखरा शिरांनीं ३७

झाडें पहा सुमुखि पैलचि चंदनांचीं
ज्याशीं शिरे झगडलीं वृषभादिकांचीं
तेणें सुगंध पसरोनि वनप्रदेशीं
आल्हाद होय बघ शंकरकिंकरांशीं ३८

उत्फुल्ल, ही बघ सुरम्य पलाशराजी
आनंद दे; तत्र जसा अनुराग राजी
हे ताल वृक्ष घनमंडल चुंबिताती
छत्रासि या बघ जणों गुरु दंड होती ३९

आहेत साल तरु, चंदन, बिल्व येथ
दिव्यौषधीसहि, तसें स्थळ हेंच कोतें !
वल्ली, तशा, विषमयी बहु येथ होती
नीचांसही सुमुखि ! आश्रय, थोर, देती ४०

तीं वासुरें तरुतळीं बघ हिंडताती
पुच्छें जयांसि जणु सुंदर चामरें ती
तैशींच हिंडति कड्यांवरि कोकरें तीं
गे बाकुल्याचि बघ मर्कट दाविताती ४१

हीं चित्र-वर्णे, अति सुंदर पांखरें गे !
वृक्षान्तरीं विहरती बघ हे शुभांगे !

व्योमांतुनी उतरती बघ या बलाका[1]
पुष्पांजळीचे[2] हरि[3] हा त्यजितो त्रिलोका" ४२

ऐशी सुरम्य सुषमा द्विज तो त्रिलोकी
मोदें प्रियेसह हळू हळुं ये तटाकीं:
बोले, "करीं नमन सुंदरि नर्मदेतें
ही मंगला, हरुनि पातक, भद्र देतें ४३

अस्ताचळीं अरुणसा पडदा नभाचा
रेवाजळीं सहज बिंबुनि जाय साचा
मध्यें तरंगनिकरीं रविचक्र झाले
सध्यो, पहा, सुदति होइल अल्पकाल ४४

चाले जणू तुरु तुरू सखि, अग्निनी ही
रेवाजळीं बघ तयारचि नाव पाही
चिच्छक्ति ही भवजलीं जणु तारणारी
वेघे वरी, तुजसि हो अति सौख्य-कारी ४५

पाहे प्रदेश अति सुंदर नर्मदेचा
झाला असे रविकरें बघ सोनियाचा
नाना तरंग उठती, फुटती तटाकीं
साडी जणों फडकते, पवनें पहा कीं ! ४६

एकीकडे निबिड, दूरचि दूर झाडी !
एकीकडे डगर आणि विशाळ घोंडी !
एकीकडे गिरिशिरावरि मंदिरें तीं !
एकीकडे लपत ये दुरुनी स्रवती[6] ! ४७

---

१ बगळ्या. २ कल्पतरु पुष्पांचाच अंजली. ३ इंद्र. ४ सायंकाळचे लाल आकाश पाण्यांत प्रतिबिंब पावलें. ५ संध्याकाळ. ६ बाणगंगा.

एकीकडे फडकती, ध्वज वाळवंटीं
एकीकडे झळकती मुखचंद्र घांटीं !
एकीकडे दिसतसे नवमंडपाची—
शोभा ! अपूर्व सुषमाहि दिसे पुराची ४८

हें देख गे ! पुलिन, सुंदरि, नर्मदेचें
गे ! स्थान हें प्रियतमे ! अपुल्या सुखाचें
प्राणेश्वरि, स्मितमुखि, प्रियदर्शनातें
प्रेमें तुवांचि दिधलें मजलागिं येथें ४९

अद्यापि ती स्मरतसे तव लोलदृष्टि
लज्जा असे; जरि भरे अनुराग पोटीं
अद्यापि ते मजसि मुग्ध विश्वास देती—
आनंद; तो समयें धन्यचि कुददति ! ५०

अद्यापि ती स्मरतसे तव अंगलीला
वाणूं किती तरि तथा कुसुमांजलीला !
अद्यापि तोयकणिकान्वित त्या मुखाची—
शोभा स्मरे, निशिदिनीं सुखदायि साची ५१

यावें तुवां मज गमे परिरंभणातें
यावें सुखा, करुनिया प्रिय भाषणातें
दैवें कथा, परि, कशी विपरीत झाली !
प्राणेश्वरी, हृदयिं मारुनि बाण, गेली ! ५२

पूर्वी अहा ! स्थळ, असें रमणीय झालें
तें भासतें बहु उदासचि अल्पकाळें

१ स्त्रिया घाटावर होत्या असें ध्वनित केलें. २ प्रथम दर्शनाचा समय.
३ पाण्याचे बिंदु मुखावर होते.

केल्या बहू युवतिनीं जळ–केळि जेथें
हे डुंबती बघ लुलायचि आजि तेथें ९३

जेथें सुगंध पसरे, सखि, अंगरागें
ये मत्स्यगंधचि, असह्य, तिथें बरागे !
पुष्पें जिथें विखुरलीं पुरसुंदरींचीं
त्या या तटीं कुणपमांसचि काक वेंची ! ९४

पूजास्थळीं, जळत, मंगल–दीप, होते
प्रेतें तिथें जळुनिया, दर देति कांते !
जेथें सदैव गुरु–मंगल–घोष होई
तें स्थान निर्जन, भयानक होय पाहीं ! ९५

ऐशी दशा बघुनि, सुंदरि या स्थळाची !
झाली क्षणैक, तनुवृत्ति, विचित्र, साची !
कांते, परंतु तव दर्शन जेथ झालें
त्या या स्थळें खचित गे बहु पुण्य केलें " ९६

बोले सती, " अति भयंकर या स्थळातें
वाटे, बघोनि भय, हो प्रियनाथ मातें
झालें उदास मन, ती हुरहूर वाटे !
येतें रडें; मज गमे सुखसिंधु आटे " ९७

बोले सुधी " सुमुखि सन्निध नाथ आहे !
काळासही करिल, सुंदरि, दंड, पाहें !
गे ! हा तुझा म्हणवितो पति शौर्यराशी
व्हावें वृथा भय कशास तुझ्या मनाशीं ९८

---

१ रेडे, म्हशी. २ कोल्ह्यानीं टाकलेलें प्रेतांचे मांस ३ भय.

भीरु स्वभाव तुज कां ? रणधीर कान्ते,
जाऊं प्रिये झडकरी अपुल्या गृहातें "
ऐसें ह्मणोनि, वदत्या, मग नाविकातें
" मारी झराझर गड्या अपुल्या वल्ह्यातें " ५९

ऐशा वेळीं सूर्य अस्तासि गेला ! । होतां होतां घोर अंधार झाला
धारा वाहे नावही खैर डोले । लाटा देती खालुनी तीस टोले ६०
आकाशीं त्या दाटल्या मेघमाला । एकाएकीं वीज देई भयाला !
सों सों वाजे, हाळवी वायु, झाडी ! । वेगें मोठे वृक्ष नाना कडाडी ६१
एकाएकीं वीज जैशी चकाके । एकाएकीं विश्व तेणें लखाखे
एकाएकीं दृष्टि जाई दिपोनी । हृत्कजाचें होउनी जाय पाणी ६२
एकाएकीं येउनीया सरारा । वेगें भूतें ठोकिती अंबुधारा
धों धों नादें पर्वतीं नर्मदा ती । गर्जोनी दे सर्व विश्वास भीती ६३
जेथें तेथें तुंबलें अंबु तेणें । झालें सारें अब्धिसें विश्व जाणें
देखोनी हें दीप्त विद्युत्प्रकाशें । अंभीं झालें मग्न हें विश्व भासे ६४
विद्युल्लेखा चड वेगें कडाडे । वेळोवेळीं चित्त धाकें तडाडे
मेघ, व्योमीं वज्रनिर्घोषकारी । गर्जे; त्याचा होय कल्होळ भारी ६५
धारा वाहे त्यासवें अब्भ्रधारा । येती वेगें, ताडिती त्याहि गारा
रेवा गर्जे ढासळी पर्णशाला । वाहो लागे तीरिंची वृक्षमाला ६६
अभीं[1] झाली मग्न तीं वाळवटें । नाहीं " भेडाघाट " हा शब्द कोठें
आहे कोठें नाव ? कांहीं कळेना । पाणी पाणी ! जाहलें तेथ जाणा ! ६७

सर्ग १ ला समाप्त.

विठ्ठल भगवंत लेंभे.

---

१ पाण्यात.

## विरहिणी.

### दिंड्या.

“बहुत झाले दिन जाउनी प्रवासा
गृहीं येई तूं सख्या हृदयबाला!
कसें स्थित्यंतर तुझ्याविण झालें!
पुन्हा पालट येईल किती कालें! १

स्वप्निं बसती तूं जवळ विरहिणीचे
वृत्त सांगसि आपुल्या प्रवासाचें;
नेत्र उघडीता नच कळे कुठें जासी
हृदयमंदिर जरि राहण्यास येसी. २

उभयतांच्या प्रेमास अर्पण्याला
तुवां रचिली जी रम्य गीतमाला;
तिला उठवाया यत्न जई केला,
सतारीचा ध्वनि शोकयुक्त आला! ३

मालतीच्या ताटव्यावरुन येई
मंद वारा जो गंधयुक्त होई;
स्मृतीला तो निमिषांत करी जागी,
उठवि झरझर रोमांच कसा अंगीं! ४

प्रथम एकान्तीं भेट तुझी झाली,
तुवां अबला ही बळें चुंबियेली;
मालतीचें मम शिरीं पुष्प होतें,
तुवां धरिलें स्मितयुक्त त्यास हस्तें. ५

काय वदलासी सांगतें तुला मी--
‘सखे! भूषण हें पुष्प किती नामी!

गंध सुचवी सुप्रेम या हृदाचें,
रंग दावितसे अंग वर्तनाचें.' ६

तसें वर्तन तव विमल जरी होतें,
विरहपंकीं मज लोटिलें कशातें ?
नको शंका ही व्यर्थ मनीं बाई !
हृदय साक्षी हृदयास जगीं होई. ७

पडे सुस्वर कर्णांत गीत जेव्हां,
भरुनि येई हा ऊर झणीं तेव्हां;
दृष्टि जातां सौख्य ना प्रकाशाचें,
दूर असतां तू, सौख्य मला कैचें ! ८

उदधि खवळे निज कोप दाविण्यास
अशा समयीं नौकेंत तुझा वास;
असे झाला प्रियकरा ! काय ? हाय !
कशी चिंता मज होय ही असह्य ! ९

सूर्यतापें तापला वाळवंटीं
व्यर्थ धुंडी उदकास जेथ दृष्टि;
मंद तेथें पातलें तुझीं जाती !
तृषापीडित असशील खिन्न चित्तीं ! १०

प्रवासाचे सोसून कष्ट मोठे
दूर देशीं पडलास सख्या ! कोठें ?
बोलुनीया मधुवचन चरणसेवा
करिल रमणा कोण ? ना कळे दैवा ! ११

मला उठण्याचें त्राण मुळीं नाहीं,
प्राण माझा जाण्यास कसा पाही !

ततु आशेचा धीर जरी देई,
परी काळीं या तोहि नष्ट होई !" १२

शद्ब सरले नच तोंच कांत आला,
दिव्यदेही वाटला विरहिणीला;
हास्य करुनी धरि सती तत्कराला
गेलि नाथासह सोडुनी तनूला ! १३

—————— पांडुरंग बाळकृष्ण दडकर.

## प्रीतीचें गाणें.

Free love free field we love but while we may.
Tennyson.

पद.

उडूं बागडूं नाचूं या
मजा ही न येईल उद्यां !
प्रीतिस बन्ध न रान मोकळें
रमेल मन तों प्रीती केली
वन स्तब्धलें--गाणें गेलें
पालवि मेली--आशा गेली--
उडूं बागडूं नाचूं या
मजा ही न येईल उद्यां ! १

नवी पालवी--नवी टवटवी
थंडीचे ते दिवस उलगले
नवी टवटवी--प्रीति नवी वी
तेणें दिन ते नवे शोभले--

उडूं, बागडूं, नाचूं या
मजा ही न येईल उद्यां ! २
प्रीतिपात्र तें मिळे वेगळें
नवीन गोडी तयांत आली
प्रीतिस बन्ध न--रान मोकळें
रमेल मन तों प्रीती केली
उडूं बागडूं नाचूं या
मजा ही न येईल उद्यां ! ३

—————— नरहर शंकर रहाळकर.

## मूर्खाविषयीं.

### आर्या.

शक्ती असोनि न करी, उद्योगा व्यर्थ काळ जो गमवी
दोषां लपवुनि खोटी, विद्वज्जनिं कीर्ति आपुली मिरवी १
विश्वास पूर्ण ठेवी, वेश्येच्या भाषणावरी नित्य
ढोंगाविषयीं आहे, अनुभव मज सांगतो असें सत्य २
द्यूतापासुनि अपणा मिळावें, वाटतें जया वित्त
करि शत्रु घात अपुला, परि तिकडे देइना कधीं चित्त ३
आहे मतिमंद जरी करिन महत्कार्य जो म्हणे स्वमनीं
द्रव्यार्जनदक्ष असे, परि वागे-नीतिच्या विरुद्ध जनीं ४
ऋण काढुनि दुसऱ्याचें, तद्द्रव्यें घेत भूमिसदनाऽदि
झाला वृद्ध जरी तरि, लागे पाणिग्रहाच्या नादीं ५
निर्भय सुज्ञ जनामधिं, अश्रुतशा ग्रंथवर्णनास करी
जी वस्तु दृष्टिगोचर, नाहिंच ती म्हणुनि आग्रहास धरी ६

—————— धुंडिराज गणेश बापट.

# काव्यरत्नावलि.

अंक ७ वा.

## सुरतरंगिणी काव्य.

### प्रसंग सहावा*.

सूर्योदय. नांव गाळांत फसली आहे. उभयतांची प्रेतें कवीचा विलाप वगैरे विषय यांत आहेत.

श्लोक.

पुनश्च घन—मंडळें जमुनिया नभाभीतरी
बुडे भुवन सर्व हें सहज अंधकारान्तरीं
क्षणोक्षणिं चकाकुनी जलमयी धरा दावि ते
भयाण चपळा, झणी भिववि आपुल्या गर्जितें[1] १

जवेंचि गगनांतुनी सजल मेघ तो कोसळे
जवें पवन वाहुनी तरु—तती जळीं ढासळे
पडे धडधडा तळीं जळ, शिळातुनी डोंगरीं
करूनि गुरु गर्जना भिववि नर्मदा सुंदरी २

महा जवन[3] मारुतें खवळली खरी नर्मदा
धडाधड, जळीं तटीं धडकताति लाटा सदा

---

* गेल्या अंकात ५ वा प्रसंग आलेला असून या अंकांत हें काव्य समाप्त झालें आहे. १ वीज. २ गर्जनेनें. ३ वेगवान्.

उरीं वरिवरी भरे दे्राचे घोर कोलाहलें
प्रवाह बहु तुंबले, सकळ पात्र फेंसाळलें ३

जळें फुगुनि नर्मदा, हटवि ओढियातें जवें
प्रवाह घुसुनी पुरीं[२] सकळ मदिरीं कालवे
समस्त पुर वेढिलें, बघुनि होय कल्होळ तो
" न आजि पुर ढासळों " वदति " घोर दैवें मिटो " ४

प्रचंड पवनें चढे वरिवरी पडे खालती
क्षणात जणु वात हा करिल नर्मदा पालथी
अहो![३] दशदिशान्तरीं, भरुनि वायु, सों सों, रवें
गमे करिल पालथ्या सकल आजि नौका जवें ५

अहो! हृदय हें पहा! धडधडे कसें या क्षणी!
महेश्वर सुखी असो सुरतरंगिणीही क्षणी
भयंकर असें न तें, कधिंहि देखिलें वादळ
गमे गिळिल विश्व हें, खचित नर्मदेचें जळ! ६

भयाण रजनी अशी हळुं हळूं सरूं लागली!
दिसे अरुणशी ध्वजा उदयपर्वताग्रीं[४] भली!
सतेज रविचक्र ये वरि[५], चढे क्रमें अंबरीं[६]
प्रकाश पसरे जगीं कनक[७]—कांति ये भूवरी ७

प्रचंड गिरिचीं शिरें रविकरें बहू शोभलीं
जयांवरुनि धावते धवल निर्झराली भली

---

१ भय. २ गावात ३ या काव्याचा काळ फार जुना आहे. परंतु कवि आपले सर्व काळीं हजर असावयाचेच ही गोष्ट वाचकानीं गृहीत केली पाहिजे. ४ उदय पर्वतावर. ५ वर. ६ आकाशांत. ७ पाऊस सरल्यावर जे ऊन पडते तें पिवळें असते.

जरी कुसुमभार तो झडुनि सर्व गेला असे
नवी टवटवी पहा तरुलतांवरी ती दिसे ८

नदी[1] उतरली असे परम भेसुरा ती दिसे
शिला तरुततीसवें पुलिनें[2] कर्दमीं तें फसे
विशाळ दरडीवरी पडुनि पाळध्या बाभळी
कृतांतवदनापरी दिसति भेसुरा ओघळी ९

भयंकर अशा स्थळीं खचुनि बैसली नाव ती
कशास पुसता मला विबुध हो " असे कोण ती "
जयास बुध हो मनीं बहुत भीत होतों अहा !
पुढेंच तुमच्या कसें असुख वाढिलें हें पहा ! १०

प्रियासुरतरंगिणीसह, महेश्वर क्षीणसा
पडे विवश होउनी अहह ! वाळवटीं असा
अहो रुचिर देह हे ! सुममयीहि शय्या जया--
खुपे ! विधिबळें मिळे स्थळचि कर्दमीं या तया ! ११

सती सुरतरंगिणी कवळुनी धरी त्या प्रिया
महेश्वर, उरीं धरी प्रियतमा, करोनी दया
सुरम्य असला हिरा ! हिरकणी अशी चांगली !
क्षणांत अदयें यमें गिळुनिया कशी टाकिली ! १२

असें रुचिर रूप हें ! गुणवती अशी सुंदरी !
पडे विवश होउनी, भरुनि कर्दमें भूवरी !
जया सुरभि चंदनें हळु हळू दयें मर्दिलें
असे मृदुल देह हे, अहह ! कर्दमीं रोविले १३

---

१ नर्मदा. २ वाळवट.

अहो ! त्यजुनि जीव, या तनुसि वेळ गेला जरी
सुहास्य मुख हें पहा अजुनि मोद देतें तरी !
अहा ! अधम काळ हा हरुनि जीव गेला पहा !
पडेल नच दृष्टिला जगिं पुन्हां असें रूप हा ! १४

उदार हृदयीं असे सतत केवढें प्रेम तें
असेल जगतीं असें रुचिर युग्म हो कोणतें ?
' महेश्वर सुधी ' ' सती सुरतरंगिणी ' या वचें
अहो ! गहिंवरोनि ये, हृदय हें उलें आमुचें १५

अहो ! प्रथम दर्शनीं उभयतांसि जो ओढुनी
करी प्रणयलोल, तो मदन धन्य हो या जनीं
सखा, न वैहिनींहि ती जगिं उरे तुझी मन्मथा
अहा ! प्रिय सख्या तुझे सकल यत्न झाले वृथा १६

होता, अहो ! उभयतांवरि लोभ भारी !
ते स्वप्नवत् दिवस जाउनि मोदकारी
हीं स्नेहशून्य हृदयें पडलीं उताणीं
ज्योती अहा ! हरियल्या यमकिंकरांनी १७

ऐशी स्थिती भयद देखुनि पाखरें हीं
दीर्घ स्वरें करुनिया रडतात पाही
पुष्पाश्रु, शोकविकला, त्यजिती लता या !
दु:खें सुचे न हरिणा तृण तेंहि खाया १८

अत्यन्त देह सुकुमार फुलासमान !
रे कापिली कशि यमा अवचीत मान !

---

१ ओढा. २ महेश्वर. ३ सुरतरंगिणी.

प्रेतें नदीवरि करीं पडलीं बिचारीं !
दाटे, अहो ! गहिवरें[1] मर्म कठ भारी ! १९

वातें जसा हळु हळू कचभार हाले
वाटे अहा ! मजशि जीवित यासि आलें
भ्रांति क्षणैक मजलागि वृथाचि झाली !
रत्नें सुरम्य, जगतातुनि हाय ! गेलीं ! २०

अहा ! खे, खे ! सुगुणसरिते दीनजननी
दयाशीले ऐशी तुजशि रुचली काय करणी !
जपे वात्सल्यें, जी चिरिल तनया काय जननी !
अहा ! यावी कैशी ? कुमति विमला सज्जन-मनीं २१

अहा ! माते होता खचितचि तुझा गे भरंवसा
परी झाला दैवें अवचित कसा घातचि असा !
प्रतापें तारूनी[2] सकळ जन, झालीस विजयी !
दया या दीनाची ! तुजसि नच ये अत-समयीं ! २२

अहा ! मागें झाली सुखद तव जी शीत लहरी !
तयां रक्षूनी तू सदय जननी झालिस खरी
जलक्रीडायोगें तुजशि जननी त्रास दिधला !
ह्मणोनीया रागें हर हर ! कसा प्राण हरिला ! २३

अहा ! लोळे अंकीं तनय; न परी रोष जननी-
करी; चित्तीं त्याचें सदय हृदयें कौतुक गणी
दया जेथें, तेथें, नच कपट, नैष्ठुर्य कधिंही !
सुधापात्री व्हावी अवचित न ऐशी विषमयी २४

---

१ कवि ह्मणतो. २ उद्धरून पक्षीं जळात तारण करून.

लता अंकीं ज्यांच्या, कुसुमित तरू देखुनि असे
सुखी व्हाया आतां हर हर जगीं कोणिहि नसे
विलास प्रेमाचे उपवनलता कुंजनिकरीं—
कशाचे हो आतां? रडतिल तिथें वूक, कुतरीं २५

अहा! बाळा मोरा, तुजसि कुरवाळील कवण
सख्या गेली ती, जी तुजशि शिकवी ताल धरुन
वृथा मैना वाली वरिवरि अहा! साद, सदनीं
अहो! प्रेमें तीच्या कवण फळ घालील वदनीं २६

गुलाबाचीं आता रुचिर कुसुमें व्यर्थ असती
वृथा मोतीयाचीं सुरभि सुमनें हाय गळती,
सती गेली! आतां सुरुचिर करें हार गजरे--
करायातें ऐसें क्षितिवरि अहा! रत्न न उरे २७

कशाला रे आता मधुर करिशी गायन पिका[1]
अहा! गेला गेला, रसिकवर, तो प्रेमळ सखा[2]
अहा! भारद्वाजा विफळ तव हे शब्द असती
सती गेली, आतां श्रवण करितो कोण जगतीं २८

अहा, वीणावाणी मधुरतर, आनंदकर ती
जिच्या संगें गाणीं ह्मणुनि रिझवी प्रेमळ सती
अहो, गाणारी ती श्रवण करिता ही न उरला
सखे वीणे आतां कवण पुसतो सांग तुजला २९

लताकुंजीं गुंजारव करितसां कां भ्रमर हो
अहो! लोकीं आता सुखद वदनाम्भोज[4] नच हो

१ कोकिळा. २ महेश्वर. ३ सुरतरंगिणी. ४ मुखकमळ.

सुगंधा, उद्यानीं पसरिशि, वृथा ! चंदनतरो !
तुझे भोक्ते गेले, न तव भिळणी[1] इंधन करो ३०

अहा ! ती काव्याची मधुरतर गंभीर रचना
मनातें आकर्षी, पुनरपि अशा गोड कवना--
करूनी माधुर्यें रसिकहृदया रंजविलसा
कविश्रीवाग्देवीजवळ उरला हो न सहसा ३१

यमा, ऐशीं रत्नें हरुनि तुजला काय मिळलें
छळावें का दीना ? अदय खळ तूं ! आजि कळलें
अहो आणा आणा ! त्वरित हरुनीं जीवनलता[2]
अशा रत्नांमागें[3] तुजशि करणें काय अमृता[4] ३२

अहो, ते प्रेमाचे वरिवरि जधीं मेघ वळले
तदा अन्योन्याचे हृदयजलधी एकवटले
लया गेली ऐशी, अवचित कशी प्रेमसरणी !
अहा त्या दैवाची अघटित घडे आजि करणी ३३

अहा ! कोठें गेलीं ! प्रणयकुशलें आतुर मनें !
अहो त्या प्रेमाच्या गुरुतरभरा स्वप्नचि ह्मणे
पहा अन्योन्यांच्या हृदयपटलीं एकचि असे
खरा तो जीवात्मा[5] ! सकल जन हो स्पष्टचि दिसे ३४

विकार प्रेमाचे सुखद गमले ते वरिवरी
अहा ! त्याचें होतां स्मरण, खुपती बाणचि उरीं
कशाला तो आला ! घडुनि असला संगम वृथा
जयाच्या अंतीं ही अहह ! लिहिली शोकद कथा ! ३५

---

१ भिल्लिण. २ संजीवनी वेल. ३ हीं रत्नें गेल्यावर. ४ हे अमृता ! ५ एक जीव होता तो जाताच दोघेही मेले. दोघांस एक प्राण होता हा भाव.

मृगांकश्रीलेखे, श्रम तव अहा ! व्यर्थ सुगुणे
तुझ्या दैवीं आलें स्वजननिधनीं दुःख बघणें
अहो ! जों जों यत्नें करुणभर हा शांत करितो
अहा ! तों तों वेगें गहिंवर उरामाजि भरतो ३६

महा यत्नें ऐसा रुचिरतर हा सगम घडे
हिऱ्याला तें जाणा कनकमय हो कोंदण जडे
असा जोडा लोकां क्षितिवरि अहा ! धन्य गमला
परी कैसा दैवा, अहह ! तव नेत्रांत खुपला ! ३७

कशी पुण्यें गेलीं करुनि अवघीं कृष्ण वदनें
न ये धर्मा, चित्तीं कठिणसमयीं साह्य करणें
लया सेवा गेली ! सकळ सुभगे पुण्यसरिते
प्रसगीं कार्यातें कवणहि न ये; स्पष्ट दिसतें ३८

अहा ! अन्योन्याच्या हृदयिं उठल्या प्रेमलहरी
सती, साक्षात् लक्ष्मी ! विबुधवर हा प्रेमल हरी
नसे चिंता; होता, सतत परमानंद सदनीं
कशी अतीं काळें अहह ! भरिली राख वदनीं ! ३९

सतांच्या आचारें सुखवि सुमुखी प्राणरमणा
जगीं या युग्माचें निशिदिनिं असे भूषण जनां
लया गेले आतां, सकल गुण, सौंदर्यहि तसे
अहो माझ्या नेत्रा त्रिभुवन पहा ! शून्यचि दिसे ४०

स्वसौंदर्यें याहीं, वरिवरि बहु गर्व हरिला !
बरा काटा आता रतिमदन हो हा उपटला !

१ चंद्रलेखे २ हे धर्मा. ३ नर्मदे. ४ पातिव्रत्याने.

अहो ! हेवा ऐसा करुनि, तुमचा सुंदरपणा
कमी होतो, लागे, खचित तुमच्या लांछनगुणां[1] ४१

अहा ! उद्यानीं हे कुसुमितलतामंडप पहा !
सुरम्यें हीं गेहें रुचिर कदलीकानन अहा !
लताकुंजीं शय्या, सुमनघटिता हाय ! पडलीं !
परी भोक्त्याचीं तीं हरहर न नामेंहि उरलीं ! ४२

जिथें क्रीडा केल्या वरिवरि तयानीं सुखभरें
असें हें रेवेचें तट गमतसे भेसुर खरें
जिथें झाला पूर्वीं नवपरिणयीं उत्सव महा
तिथें केलें दोघां, अहह ! अनलें दग्धचि पहा ! ४३

यमा, यातें न्याया तुजशि पुरली एक घटिका
परी आह्मा लागे निशिदिनि अहा ! थोर चटका
उरीं मारायातें शर[2], पुरतसे एक पळ तें
बुजे जन्मांतींही क्षत न तुज तें काय कळतें ४४

सती भूलोकीची सुमुखि जगतीं धन्य असशी
सखा निर्वाणीचा प्रियसख खरा तूं ह्मणविसी
सुखासाठीं केले[3] श्रम, परि अहा ! दैव फिरलें
खळें, सौख्याचे तें हरहर कसें मूळ खुडिलें ४५

अहो ! दुर्दैव्यानों तरुतळवटीं जेथ बसला
शिळास्थानीं जेथें बसुनि सुकथाभाग कथिला !
तुह्मां श्रांता जेथें बहु सुखविलें निर्झरजलें
अशीं स्थानें आतां रडति करुनी मुक्तचि गळे ४६

१ लांछनानें. २ बाण. ३ तुह्मी अध्याहृत.

पहा शोकें रानीं वरिवरि रडे ही खगतती
तुझा मागें पक्षी प्रियपशुहि शोकें न जगती
तुझी गेला गेलां त्यजुनि सकळां स्वर्गभुवनीं
वसायातें आता कवणहि नसे शून्यसदनीं ४७

रडें येतें आतां विबुधजन हो काय पुसता
भरे माझ्या काव्यीं हरहर पहा ! शोक नुसता
सुरत्नें तीं गेलीं निघुनि, बुध हो स्वर्गभुवनीं !
उरे बाकी आतां विफळ कविची शोकसरणी ! ४८

सर्ग ६ वा समाप्त.

विठ्ठल भगवत लेंभे.

---

## स्त्रीबोध.

### श्लोक.

प्रभूचें सदा ध्यान चित्तीं धरावें । अघाच्या मळा सत्वरीं संहरावें
सुकालींच सौख्यामधें स्थीर व्हावें । सुकर्में सदा तू जगीं धन्य व्हावें १
धरावी सखे संगती सज्जनाची । करावी तनू पेटिका सद्गुणाची
भवाच्या समुद्रास नेटें तरावें । कुकर्मी जनाच्या भयातें धरावें २
सखे दुर्जनापासुनी दूर राहीं । शिवो ना तुला गे ! कुबुद्धी कदाही
कुली तूझिया नीतिते आदरावी । सदा सन्मतीची तुझ्या वाढ व्हावी ३
दया दाखवीं आर्त जे जीव त्यातें । नको द्वेष वा कोप दावू कुणातें
नसो विस्मृति श्रीहरीची कधींही । मरावें पुरी वासना मारुनी ही ४
कवी सागतां सांगता श्रात झाले । कुणी हें नसे मानिलें मोहजालें
गुरूची कृपा पांडुरगीं सदाही । तयाच्या कृपेनें न हो न्यून कांहीं ५

---

१ पाळीव पशु पक्षी.

जगीं जन्मुनी दुर्गुणा दूर सारीं । सखे ! सद्गुणा ठाव देईं शरीरीं
असे मानुषी–योनि हे दुर्लभा गे । नसे शाश्वती नेम केव्हाहि भगे ६
अमूल्या तनू मानवी जाण, बाई ! । भलें वर्तुनी स्वामिला सौख्य देईं
विचारीं मनीं नित्य कैसें करावें । सुकीर्ती जगीं ठेउनीया मरावें ७
अहंकार पोटीं मुळींही नसावा । कुणाशीं न गे भांडता हर्ष व्हावा
वदे सर्वदा योग्य ऐशीच वाणी । कुळाचार रीति बरी ते पुराणी ८
विनोदामधेंही असत्य त्यजावें । मुखानें तुझ्या सत्यची बोल यावे
न ठेवीं सखे ! कान केव्हाहि काचे । पराची न निंदा निघावी स्व–वाचे ९
न भीती तुझ्या पोटि बाई. नसावी । सुधैर्या घरीं आपदा हे तरावी
पतीच्या मना दु:ख देवू नको गे ! । तदाज्ञेप्रमाणें करीं तू स्वयें गे १०
दुजातें न गे ! काम त्याचें करू दे । अलंकारवस्त्रीं न मोहा वसू दे
सदा लोभ सोडूनि कठी दिनांतें । न कोपास ठेवीं मनीं जाण मातें ११
भजावा पती, ईश्वरीं भाव ठेवीं । अशी वागुनीं संसृती हे तरावी
स्त्रिये ! बोध घे सोडुनी सर्व ढंग । असें सांगतों रामभू पांडुरंग १२

——————— पांडुरंग रामचंद्र नंदुरबारकर.

## औरंगजेबास.

श्लोक

औरंगजेबा ! कुटिला नरेशा । बनूनियां दुर्गतिदा त्वदाशा
तैसा विलोकून चरित्ररंग । माझ्या मनीं हे उठती तरंग १
भुलोनिया भूपतिच्या पदास । झालास जैं निर्दय लोभदास
चित्तीं न राहे लवही विचार । केली तुवा दुष्कृति घोर फार २
सिंहासनावाचुनी अन्य कांहीं । त्वद्दृष्टिला तैं दिसलेंच नाहीं
दर्बार होता वश कैतबानें । केलें तुवा बंड महा खळानें ! ३

क्रूरा ! तुला जन्म दिला जयानें । केलें तुझें रक्षण आदरानें
यत्नें लघूचा तुज थोर केला । त्वद्धेतु सारें परत्रू भुकेला ! ४
तो त्वत्पिता थोर शहाजहान । करावया कैद तुला कशी न ?
रे वाटली लाज ? मनीं तयाचा । कैसा न आला उपकार साचा ५
करोनि बा ! यापरि तातघात । तू क्रूरकर्मा खल सत्सुखांत
सिंहासनीं होसि विराजमान ? । लोकापवादक्षिति रे ! तुला न ! ६
होऊनि तू यापरि भूप थोर । कृत्यें किती चालविली अघोर !
त्वत्दुष्कृताचा इतिहास बा या । कोणी नसे शक्त मुखें वदाया ! ७
साधोनि हें पाप पुढें उगा-न । त बैससी क्रूर यमासमान !
दारादि बंधू नयमार्गगामी । त्वा धाडिलें मारुनि कालधामीं ! ८
अन्याय कर्मा करिते अमूप । होऊन गेले खल दुष्ट भूप
परंतु अग्रेसर तूच त्यांत । तुझा न कोणा धरवेल हात ! ९
वाणी तुझी गोड परंतु आंत । भरोनि राहे विष बा ! नितांत
दुष्टें तुवा बोलुनि गोड वाचा । केला बरें घात किती जनांचा ! १०
देऊन पोषाक महा विषारी । त्या पृथ्विसिंगाप्रत कोण मारी ?
स्नेही तुझा तो जसवंतसिंग । हा ! आणिला त्यावरि दुष्प्रसंग ११
रूपोत्तमा सत्कुलजा सुधन्या । धर्माभिमानी रजपूतकन्या
केला हरायास्तव यत्न जेव्हां । किती उडे घोर अनर्थ तेव्हां १२
दिल्लीस मानें शिवराजयातें । त्वां आणुनी संधि करावयातें
त्या कैद केलें कपटें अचूक । अश्लाघ्य ही बा ! तव वागणूक ! १३
ही नीचता जाणुनि शूर गाजी । युक्ती रचोनी बरवी शिवाजी
जैं दक्षिणेमाजि निघोनि जाय । केलें तदा शासन सांग काय ? १४
जो माफ केला कर पूर्वजांनीं । हिंदूवरी बैसविला फिरोनी
केला तुवा यापरि पक्षपात । भरोनिया द्वेष उरे जनांत १५
द्रवत्व पाषाण वरील खास । तरी फुटे तें न तुझ्या मनास

समाजिचा घोरतर प्रकारें । केला तुवा घात अहा ! कसा रे !! १६
विश्वास कोणावरही तुझा न । सारे तुला लोक रिपू-समान !
तू निर्दयी क्रूर पिशाच साच । खलाग्रणी निंद्ययशा ! तसाच ! १७
त्या प्राणकांता धन राज्य सारें । अंतीं तुला सोडुनि दूर बा रे !
दुष्कर्म सोडी तुजला न मात्र । तूतें करी जें अयशास पात्र ! १८
करोनि दुष्कर्म बलें अमूप । झालासि तू भूतलिं पाप-कूप
पोटीं धराया तव देह अंतीं । कशी क्षितीला गमली न खंती !! १९
दोषी तनूतें लपवोनि खास । झाकावया इच्छिसि दुष्कृतास ?
परंतु गर्जोनि कथी तयास । त्वद्दुर्यशोदुंदुभि या जगास !! २०
औरंगजेबा ! शशिसूर्य जों हे । दुष्कीर्ति लोकीं तव खास राहे !
देती तुला दोष जगांत सारे । धिक्कार ! धिक्कार ! असो तुला रे २०

——————— विष्णु बाबाजी कुळकर्णी.

## प्रीती आणि मृत्यू.

### श्लोक

वर्षी शान्त सुरम्य कौमुदि शशी आनन्ददात्री अती
वायू वाहुनि मंद शीतल तसे आल्हाद देती मना
उद्यानीं कुसुमान्विता नव लता नानाविधा नर्तनां
दावोनी अपुल्या सर्व प्रियजना डोलावया लाविती १

क्रीडाया समयीं अशा प्रमुदिता प्रीति स्वयें पातली
प्रीतीचें मधु गीत गातचि मुखें प्रेमोक्तिटा हेलया
उद्यानीं शिरली परी दचकली आल्हाद गेला लया
पाहोनी बकुलीस टेंकुनि तिथें ती मृत्युमूर्ती उभी २

येतांनां तिज पाहुनी अदय तो मृत्यू वदे कोपुनी
जा जा तू परतोनि एक पळही आतां न येथें वसे

मी राजा वसतो इथें सतत गे हें राज्य माझें असें
ऐकोनी परुषाक्षरें भय मनीं प्रीती धरी तेधवा ३
निश्वासूनि सुदीर्घ शून्य नयनें अश्रू तिनें गाळिले
दु:खा आवरुनी परी क्षणिक त्या आश्वासुनी मानसा
स्वस्थानाप्रति जावया परतली सोडूनि उद्यान तें
जातांना वदली तया परतुनी संबोधुनी मानिनी ४
" तू रे मर्कट पाड काय तव तो माझ्यापुढें चालतो
तू छायेपरि या जगीं वससि रे आयुष्यवृक्षाचिया
आयू हें विलयास जाइल जधीं जाशील तू त्यासवें
होता नष्ट जसा सुपेलव तरू छाया न कोठें दिसे ५
' वदावें परि दुर्जना प्रथम ' ही उक्ती मनीं आणुनी
जातें येथुनि आज हें वच परी ध्यानीं असू दे सदा
जातां नष्टदशेस तू बसुनि मी सिंहासनीं तूझिया
यावच्चंद्रदिवाकरौ करिन रे राज्यास येथें तदा ६

वैनतेय.

---

## तारा आणि काजवा.

### श्लोक.

झालें निद्रित विश्व; शान्त रजनी होती तशी जाहली
मच्चित्तीं परि शांतता नच मुळीं, नाना विचारावली
येवोनी मम मानसा दुखविती; निद्रा न ये लोचना
आरामीं पडलों ह्मणोनि शयनीं आराम द्याया मना १
ताऱ्याची गगनांगणीं द्युति अती होती वरी फांकली
खालींही पण काजवे पसरिती अल्पप्रभा आपुली

झाली वृत्ति मदीय या उभयता तल्लीन ती पाहुनी
गर्वें तारक काजव्यास वदला तारस्वरें तो क्षणीं — २

" खद्योता ! द्युति अल्प रे तव किती स्पर्धा कशाला तरी
माझ्याशीं करिशी नभांत उडशी तू व्यर्थ वेड्यापरी
आहे का उपयोग बोल कवण्या त्वद्दीप्तिचा या जनीं
स्पर्धा आजवरी कधीं बळवतासंगें न केली कुणी ३

" कोठें कांच हिरा कुठें, गगन तें कोठें धरा ती कुठें
राजा थोर कुठें, भिकार तसला तो रंक सांगें कुठें,
मर्यादा त्यजुनी न वर्तन असें थोरासवें आचरीं
जा, जा, जा, तर खालतींच मघका ! येऊ नको तू वरी " ४

अंगाचे मग तारकें करुनिया निक्षेप नानापरी
खद्योतास कितीतरी हिणविलें त्या काय सांगू परी
खद्योतें परि आपुली न समता ती अल्पही सोडली
बोलें नम्रवचें पुढें करुनिया त्याच्या प्रणामांजळी ५

" व्योमीं वास तुझा, धरेवर असे माझा, मला हें कळे
तें तूं स्पष्ट मला वदोनि तुजला मोठेपणा का मिळे ?
स्वप्नीं देखिलही खरोखर कसा हेवा न ठावा मशीं
कां रे व्यर्थ अशीं खरे कटुवचें मन्मर्मिं तू पाडिशी ?

" गर्वोक्ती परि ही तुझी परिसतां खेदोर्मि हेलावती
तू रे थोर तरी तव मला येते अहा कींव ती !
कां हा गर्व असा मनीं धरिसि तू त्वद्दीप्तिचा निष्फळ
चंद्राची द्युति रे तुझ्याहुनि, रवी त्याच्याहुनी उज्ज्वल ६

एकाहूनिच एक थोर असती तूतें न कैसें कळे
बुद्धिभ्रंश घडे त्वदीय गमतें हा आज गर्वामुळें

येतां मेघ तुझ्यावरी मग कुठें त्वत्कांति लोपेल रे
छे! छे! मेघ तरी कशास? नलगे, आहे धुकेंही पुरें ७
कान्तीचा जरि आव घालुनि नभीं टेंभा असा वाहसी
आहे अल्प धुकें तया विझविण्या तें शक्य वाटे मशीं
माझी दीप्ति पुरे मला न कवणा झाला जरी लाभ तो
गर्वाचें गृह खालतीं तव परी येईल हें सांगतों" ८

झालें भाषण हें तदीय न पुरें तों मात ही जाहली
एकाकी श्रवणीं कडाड रव ये ज्वाला नभीं फाकली
तारा तो तुटुनी धरेवर पडे खद्योत त्या पाहता
'गर्वें घातचि जाहला तव बरें' झाला तया बोलतां ९

हा! हा! यापरि आज थोर गरिबां गर्वांत धिक्कारिती
त्यांनीं मानसिं तारकस्थिति परी ही ठेवणें जागती
येता मन्मनिं हा विचार हृदया शान्ती अती वाटली
निद्रेला वश जाहलों सहज मी बागेंत रम्यस्थलीं १०

—— नरहर शंकर रहाळकर.

## आंब्यास

पद. (चाल. वधू हे वहीं०)

गुणी सहकारा!। सोडिसी कसा सुविचारा?
मोहक मोहर फुटे तुज, तसा
रसज्ञ अलिगण आला सहसा
ठेवुनि वहि त्या रडण्यास असा
कीटकां थारा। देसि का फलमधिं सारा १

—— बाळकृष्ण अनत भिडे बी. ए.

# काव्यरत्नावलि.

अंक ८ वा.

## श्रीसुदामदेवचरित्रें.

### सर्ग ३ रा.*

श्लोक.

दामा धरूनि निज–मित्र तदा स्वहस्तीं
त्या काननीं रिघत कृष्ण मनोज्ञ–मूर्ती
उद्यान–कान्ति–रतिच्या उपगूहनाला
अव्याज–सुंदरचि मन्मथ सिद्ध झाला १

आला भतार ह्मणुनी मग तीहि बाला
आनंद–फुल्ल–वदना निज विग्रहाला
शृंगारुनी करित विभ्रम कीं निवाली
देखोनि अन्य पुरुषा जणु दूर ठेली २

चेतो–हरा निरखुनी अतिचारु कान्ता
स्वान्ता निजा पवन–वचपला नितांता
जो विक्रिया न करिता अति–शांत ठेवी
ऐसा नरा कधिं तरी प्रसवेल उर्वी ? ३

कर्णान्त–नेत्र भरुनी अ–निमेष–पंक्ति
आलोकिती युवति कृष्ण सु–मेघ–कान्ति

* गेल्या ६ व्या अंकांत २ सर्ग आलेला आहे.

त--द्वर्णना करितसे अति--गोड वाचें
दामा करी श्रवण भाग्य खरें तयाचें ४

' या वल्लरी अति--मनो--हर भू--रुहांच्या
अग्रीं किती करिति विभ्रम रम्य साच्या
स्त्रैण भ्रतार बघुनी जणु मस्तकीं या
त्याच्या वि--शंक--हृदयें निज देति पाया ५

आमोद--युक्त जल--निर्झर--संग--शीत
हा नेतसे श्रम मदीय हरूनि वात
नेई कपोल--तलिंचे श्रम--वारि--बिन्दु
वाटे खरोखर सख्या मज सौख्य--सिन्धू ६

आमत्त कोकिल पहा किति मंजु गाती
जाणों वसन्त--समयासच हे स्तवीती
गुंजारवा करिति भृंग अनंग तोही
चूतांशुगांस धरुनी करिं सज्य होई ७

हे आम्रमंजरिपराग पडूनि खालीं
सर्वा धरा धवलगन्धनियुक्त झाली
जाणों वसन्तपतिला सुखवावयाला
लाऊनि चन्दन निघे सुकुमार बाला ८

हे सान्द्र पाहि सखया किति वृक्ष रम्य
यांचीं तळें दिनकरांशुसही अगम्य
जाणों स्वकीयविटपायतबाहुपाशें
आलिंगितांतचि मिथा प्रियमित्र जैसें ९

आहे पहा सलिल हें स्फटिकाच्छकान्ति
दे प्रेक्षकां अननुभूत सदैव शान्ति

पीयूषही मजपुढें अतिहीन ऐसें
मानूनिया जणु मनीं अतिमात्र हासें ॥ १० ॥

या मौक्तिकावलि किती पथिं उल्लसन्ती
कण्ठीरवाग्रनखरांतुनि येथ येती
मत्तेभगण्डरुधिरार्द्र तसेंच पाद--
विन्यास हे दिसति भीषण जेवि नाद ॥ ११ ॥

आता पुढें विरलवृक्ष विभाति भारी
छाया तदीय रविरश्मियुता सुहारी
भूमीवरी पडुनि ती शबला जहाली
कालिन्दि भीष्मजननीस जणू मिळाली ॥ १२ ॥

हा कृष्णसार तरुमूलिं पहा प्रियेचे
कायावरी निज समर्पुनि मूर्ध साचें
निद्रासुखा अनुभवी वनवास खास
देई अनेकविध निर्वृति हा मनास ॥ १३ ॥

कण्डू कपोलतलिंची शमवावयास
हे गण्ड घासिति करी सरलद्रुमांस
क्षीरार्द्रगन्धयुत देखुनि त्यांस मृग
येती त्यजूनि सहकार अनेकसंघ ॥ १४ ॥

शाखाकरा पसरुनी निज हा पथांत
छायाप्रधान सहकार अहा वनांत
येथें बसा, अनुभवा वनवासशर्म
ऐसें कथी तरि करूं वसतीस भर्म ’ ॥ १५ ॥

कृष्णोक्ति ही परिसुनी मग तो सुदामा
देखोनिया बहुतसान्द्र अतीव वामा

छाया तदाश्रय करी कीर मित्रपाणी।
घेऊनिया वदतसे अति गोड वाणी। १६

'देखोनि ही हृदयहारि वनां–त–कान्ति
येई उचंबळुनि मन्मन नष्टशांति
आहा! किती तरि अगाध बरें जनांच्या।
हा दृक्पथांत वितरे महिमा प्रभूचा १७

कुल्या–तटीं बघ किती तरि चारुभास
हे शाद्वल प्रसभ लोभविती मनास
ही गारुडोल्लखचित भूमि तयार केली।
सौंदर्यदेविस जणूं करण्यास केली। १८

या शाद्वलांत चरती किति धेनु पाही
ज्या देखतां मनिं न खेदलवांश राही
वत्सें स्तनधय अभीक्ष्ण पयोधरातें
सोडूनिया बघति हीं गळिता पयातें' १९

आर्या.

देखुनि हें आठवलीं माता पितरें तथैव तन्ममता
ह्मणती चला गृहासी होईल विलंब येथ वनिं रमतां २०
दाम वदे 'श्रीकृष्णा! येतों, ठेवी मनांत आठवण!
भावी संकटसमयीं मित्र मला तुजविणें असे कवण? २१
करणें नामा ऐशी कीर्ति अशी रीति सत्य जगताची
कार्या नच तव कृष्णा! हेंचि असे विनति सर्वदा माझी!!' २२
कृष्ण वदे 'सखया गा, दिनरजनीं हृदयिं ठेव आठवण
मित्राविण या जगतीं मज आठविता दुजा असे कवण? २३
ये द्वारकेंत पडतां संकट सखया सुदामदेवा रे!

टाळीन शक्य जरि तें करुनी माझे प्रयत्न मी सारे!' २४
'बरवें येतों आतां' ऐसें विनवूनिया परस्पर ते
निघती निजालयासी टांकुनिया निजपदासि सत्वर ते २५

गणेश–सुत गुणे.

---

## मातृवियोग*.

आर्या.

उगवुनि संसारनभीं अज्ञानतमास यत्कृपातरणी
धाडी दूर दिगंतीं, ठेवीं त्या स्वशिर ईशवरचरणीं. १
आला वसंत यास्तव झाला सर्वांस बहुत आनंद;
सन्मानिती तया जन जणुं आणुनि तो मनांत सुखकंद. २
नानाविध कुसुमांनीं विकसुनि भूतल अतीव शोभविलें.
घेउनि सुगंध संगें पवनें जनचित्त फार लोभविलें. ३
फलभारें नम्र तरू देखुनि कोकिल करी गुणस्तवना
मधुरस्वरें, जणु डुले होउनि बहु हर्ष त्या समस्त वना. ४
विमलाकाशीं तारास्त्रीजनपरिवार घेउनी संगें,
होउनि सहर्ष, विधु तो बहुविध केलींत काय जणुं रंगे. ५
ऐशी समस्त सृष्टी आनंदें कोंदली दिसे भारी,
परि निर्दया यमा! रे! घालिसि का मजचि दुःसहीं भारीं? ६
ज्याहीं दुष्टाचरणें लाजविलें फार भूस, त्यां अधमां
रक्षुनि; मज्जननीतें न्यावें हा न्याय काय योग्य यमा? ७
अथवा दोष कशाला देऊं? बापा! तुलाचि यमधर्मा!

---

* कवीचे मातोश्रीस चैत्र वद्य ११ शके १८२४ रोजीं देवाज्ञा झाली त्या प्रसंगास उद्देशून ही कविता लिहिली आहे.

नाहीं आचरलों त्या, सज्जन ज्या नित्य वर्णिती धर्मा. ८
आई ! तूच न गेलिस, गेली गृहसंपदा गमे सकल;
भासे असार सर्वहि, हो जेविं वृथा सुभव्य तरु विफल. ९
निलयादि सर्व दिसती निस्तेज,-पहा, तमीं जशी सृष्टी;
सोडुनि परत्र जाता केलें आह्मांस फार गे ! कष्टी. १०
उपकृति निष्काम किती ! परि आह्मी होउं केविं उतराई :
सोडुनि दया सुतांसह, सहसा गेलीस काय गे आई ! ११
करिसी दयाच तू, जरि अनिष्ठ हा सुत करावया सजला;
यास्तव टाकुनि विपदीं, जाशिल वाटे न सत्य हें मजला. १२
बालपणीं घेउनिया कुडेवरी, फिरविलें मला मोदें,
येचें न सौख्य हो तरि दुःखानं देह गे ! तुझा कोदे. १३
तरुसुमफळास दावुनि परोपरी मन्मनास रमवीलें,
करवूनि पयःपाना गावुनि मज पाळण्यांत निजवीलें. १४
आनंदें बागडतां देखुनि, मनिं हर्ष नित्य तव वाटे,
थकतां धावत येउनि, उचलुनि, मोहें तुझा गळा दाटे. १५
मज लागली क्षुधा तरि सारुनिया दूर आपुलें पान,
भरविसि अन्न मुखीं मम, यातचि तुज वाटलें समाधान. १६
वत्सासि ताडिल्यावरि रोषानें जेविं धेनु ती उसळे,
मद्रक्षणार्थ तेवीं केलें वर्तन सदा तुवां कुशळें. १७
होतों अशक्त बहु मी, त्यांतचि दुखणें करी मला विकळ,
जागुनि मजसंगें तूं घालविल्या रात्रि दीर्घतर सकळ. १८
तेव्हां त्वन्नयनींचे अश्रु न खळती, महीवरी गळती;
तेविं उठे, उदकाविण मत्स्यमनीं जेविं फार तळमळ ती. १९
काय उपाय करावा न सुचे, यास्तव जनास विनवीलें,
त्याहीं कथिले करुनी कष्टें रोगास अल्प शमवीलें; २०

तेव्हां स्थिर चित्त तुझें होउनिया, सौख्य वाटलें कांहीं;
स्मरते स्थिति ती होती किति कष्टप्रद, असह्य लेंका ही. २१
केले अन्याय अती मजवरती तरि कधीं न कोपावें,
स्नेहें सदा वदावें, बा रे ! ऐसें करूं नको पावें. २२
धाक कधीं कधिं दावी, परि केंव्हांही मला न ताडावें,
परि नीतिप्रेम मनीं माझ्या, आई ! सदैव ठसवावें. २३
गोष्टी सांगूनि कधीं अन्यायातुनि मनास फिरवावें,
स्मवावें बहुतापरि, सत्यहितोक्तींत नित्य शिरवावें. २४
विद्याभ्यासाविषयीं घेतलि जी काळजी तुवां मोठी,
ती वर्णाया नाहीं शक्ति पुरी जाण माझिया ओठीं. २५
उठुनी प्रातःकाळीं, घालुनिया स्नान देउनी अन्न;
विद्यालयात धाडिसि सगें देऊनि सोबती अन्य. २६
फिरुनी गृहांत येतां किंचित मुख देखिलें जरी खिन्न,
बोधामृतास पाजुनि पळात करिसी कुतर्क उच्छिन्न. २७
एक क्षणहि न पडलों दृष्टिस तरि घाबरी किती होसी,
टाकूनि कामधंदा दूरि उभी राहुनी पथा बघसी. २८
पंगूदीनजनाहीं केली जरि याचना तुझ्याजवळ,
संतुष्ट नित्य केलें देउनिया त्यास एक तरि कंबळ. २९
जाय जशी धावुनिया कन्या निजजननिवचन परिसून,
त्वदुदारपणें त्वदूच खालीं पडु दे न तेंवि जरि सून. ३०
प्रकृती तामस यास्तव काका जरि कोपले तुझ्यावरती,
शांती ढळे न मनिंची; शिवला न कदा मनास कोप रती. ३१
त्या ये कोप बहू जरि मृदुशब्दें युक्तिनेंचि निववावें,
ज्या कोपानें आह्मा सर्वांचें सर्व धैर्य पळवावें. ३२
शक्ति न हळू हळू तरि भोगेश्वरदर्शना तुवां जावें,

वंदुनि अनन्यभावें परमेशातें, सदा गृहीं यावें. ३३
शिक्षण द्याया स्वसुतां दूर करावें असें न जरि गमलें,
काकांते तरि देउनि धैर्या, आह्मांस दूर पाठविलें. ३४
निजसुत शिक्षित व्हावे ऐशी इच्छा तुझ्या मनी प्रबळ,
झटलिस तदर्थ बहुपरि, निजदेहाची करूनिही अबळ. ३५
एखादे समयीं जरि निजकार्योत्साहभंग गे ! झाला,
त्वद्बोधबळें आह्मा पुनरपि ये धैर्य कार्य करण्याला. ३६
गृहसुस्थिति जी दिसते आली केवळ तुझ्याच गे ! यत्नें,
संकटघण आदळतां दिली परीक्षा खरी तुवा रत्नें. ३७
त्वद्देहावस्थेतें देखुनि धडकी मनीं भरे फार,
यास्तव येऊं न दिलें जवळ तुझ्या मज कधींहि साचार. ३८
सेवा पितराची हा धर्म मुलाचा, करूं न दे दैव,
यास्तव मजला वाटे, झालों व्यर्थचि जगांत हतदैव. ३९
संसारताप मोठा, आजवरी परि मला न तो गमला,
वारुनि तूंच परस्पर, सोसाया पाडिलें न भाग मला. ४०
या विस्तीर्ण भवाब्धीं भगुनि तू नाव आजि मी पडलों,
संकटमकरभयंकरदंष्ट्रेमाजीच काय सापडलों. ४१
मत्तगजे धावुनिया भूवरि त्या कर्दळीस पाडावें,
तैसें केलें काळा ! शूरें शूरासि मात्र ताडावें. ४२
रोगें निशक्त तनू, यास्तव तुज सोसवे न मृदु वसन,
आता सोसेल कसें लोहापरि कठिण गे ! चिताशयन ? ४३
ज्या देहें जन्म दिला, वाढविलें, पोशिलें, तया देहा–
कैशी विचित्र करणी ! अनलातें निजकरेंच हा दे, हा ! ४४
त्वद्देहातें नच, ह्या अनला मद्दैभवासि लावियलें,
काय करूं मी आतां ? दुर्दैवें मत्स्मृतीस घालविलें. ४५

मावळला गृहरवि, हा ! पडला अंधार काय घनदाट !
होतात लोचन वृथा, काढावी यांतुनी कशी वाट ? ४६
त्या प्रभुसेवे गेलिस आई ! जो या जगास आवरिता;
त्वद्भाग्य थोर परि मी, पडलों भूवरि गळूनि भाव रिता. ४७

ना. सी. जोशी.

## कलियुगांत कृतयुग.

श्लोक.

भावी प्रजेतुल्य न जो प्रजेला । दावीं कदा मान न सज्जनाला
ठेवी सदा सन्निध दुर्जनाला । व्हावा असा " भूप " अहा कशाला १
पित्यापरी लेखि न जी नृपाला । न संकटीं देइ तया धनाला
जी साह्य हो भूपतिच्या अरीला । व्हावी " प्रजा " यापरिची कशाला २
जेथें मिळे ना व्यवसाय कांहीं । राजा भिषक् श्रेष्ठिहि जेथ नाहीं
न वेदवेत्ता द्विज ज्या स्थळाला । व्हावा असा " देश " अहा कशाला ३
येते न जें नीतिपथें कराला । जाते न जें दानिंच सत्कराला
जें तोषवी न स्वजना पराला । व्हावें असें " वित्त " अहा कशाला ४
ईशस्तवीं जो रसना न योजी । सद्गुणनीं मूकचि होय गाजी
भूपांगणीं नाचवि भारतीला । व्हावा " कवी " यापरिचा कशाला ५
खरें न रेखी व्यवहारचित्र । न धर्मनीती ठसवी पवित्र
न वेधि जो वाचकमानसाला । व्हावा असा " ग्रंथ " अहा कशाला ६
शब्दांत वेदान्त अती उफाळे । स्वयें यथेष्टाचरणींच लोळे
निःशंक भोगी परकामिनीला । " वेदांतवेत्ता " असला कशाला ७
सुसंस्कृता बुद्धि नसे जयाची । जो दीनवाणी भलत्या न याची
जिंकी न जो षड्रिपुच्या बळाला । व्हावा असा " पंडित " तो कशाला ८
षड्शास्त्रिं ज्याची गति नाहिं पूर्ण । छेदी न जो संशयरान तूर्ण

न चोजवी श्रोतृमनोगतीला । " पुराणवक्ता " असला कशाला ९
त्रिकाड वैद्यात न जो अधीत । ' रोगी बरा सत्वर हो ' न हेत—
ज्याचा, हरी जो चिर तद्धनाला । व्हावा असा " वैद्य " अहा कशाला १०
राजास जो देइ न योग्य सल्ला । करी महात्म्यांवरि नित्य हल्ला
सोडूनि त्या शेखि मिळे रिपुला । " मत्री " अहा यापरिचा कशाला ११
जो न्यायशास्त्रा पढला न अल्प । वृथा उभारीच कुतर्कजल्प
जो लोटितो दु:खि निजाश्रिताला । व्हावा न " नैयायिक " हा अहाला १२
पाहूनिया पामर पगु लोक । पेटे न ज्याच्या मनिं सद्य पेट
वेची परार्थास न जो धनाला । "श्रीमत " व्हावा असला कशाला १३
जो किंकरा राबवि सर्वकाळीं । देई न त्या वेतन योग्य काळीं
सौहार्द दावी न कदा तयाला । " स्वामी " अहाला असला कशाला १४
साधी न काजा करुनी श्रमाला । स्वामीसवें वाढवि फोल बोला
तद्गुह्यगोष्टी कथि जो दुजाला । व्हावा असा " भृत्य " अहा कशाला १५
शिष्यास जो देइ न आत्मविद्या । त्याच्याकडूनी पढवी कुविद्या
नानारिती जो हरि तद्धनाला । व्हावा " गुरू " यापरिचा कशाला १६
असे सदा जो स्वहितींच दक्ष । ज्याचें गुरूपासनिं नाल्प लक्ष
कृतज्ञता दावि न जो तयाला । व्हावा असा " शिष्य " अहा कशाला १७
बाळा न जो देइ सुशिक्षणाला । देतां दुजा तें न रुचे जयाला
लोटी ऋणामाजि सुखें तयाला । व्हावा " पिता " यापरिचा कशाला १८
न अल्पही लक्ष जिचें स्वधामीं । न भृत्य बाळें जिचिया लगामीं
आनदवी जी न निजा पराला । " माता " अहा यापरिची कशाला १९
सागे न जो सकटिं सन्मतीला । वेंची न देहास मना धनाला
वारी न दोषां नच दे गुणाला । व्हावा असा " मित्र " अहा कशाला २०
द्वेषी विनाकारण जो वधूला । प्रेमें निरीक्षी गणिकागणाला
वेंची सुरामांसिंच जो धनाला । व्हावा " पती " यापरिचा कशाला २१

न चिंतितें जें पतिच्या हिताला । सदैव ध्यातें परपूरुषाला
निःशंक होवोनि त्यजी त्रपेला । व्हावें असें "दार" अशा कशाला २२
न सभ्रमें सेवितसे गुरूला । न आयके तद्धितभाषणाला
जो दुर्गुणीं घालवि जीविताला । व्हावा असा "पुत्र" अशा कशाला २३
पाळी पित्याची न कदापि आज्ञा । लज्जा त्यजूनी करि जी अवज्ञा
जी स्वैर वागे गणि नान्यबोला । व्हावी "सुता" यापरिची कशाला २४
न ज्ञातिकल्याणि जपे कदापि । सुखें स्वभ्रूस सदैव दापी
न हर्षवी जी पितरा कुशीला । व्हावी अशा ही "भगिनी" कशाला २५
जो नित्य राहे गृहिणीवचात । दावी स्वकीयां कटुता नितांत
जो संकटीं सोडवितो न त्याला । व्हावा असा "बंधु" अशा कशाला २६

दडी.

---

## निर्जनवनवास.

### आर्या.

जें जें लघुगुरु वस्तू येथें मम होइ विषय नयनातें
तत्तत्स्वामी हा मी ह्मणेल कोणी न हें अनय नातें १
मद्राज्य क्षितिजावधि; कोण स्पर्धा करील मम अन्य ?
गगनविहारी पक्षी सेवक माझे, तसेच पशु वन्य ! २
जरि एकांता ! गणिलें तत्वज्ञें तुज, अलींनि पुष्करसें
कां, सांग, एकट्या मज झालास परंतु आज शुष्क रसें ? ३
बरवी रुचली मजला, रे एकांता ! भवापदाही ते
हें स्वामित्व नको परि; निर्वैर, प्रकटशाप, दाहीतें ४
मत्पाप काय ? विधि कां मज सजला निर्जनांत टाकाया ?
काढूं आयुष्य वनीं हरहर ! मी सतत एकटा कां या ? ५
श्रवणमनोहर सुंदर मनुजस्वन वन न आयकों देतें

स्ववच:श्रवणहीं भय उद्भवुनी सकल काय कांपे तें ! ६
जे माळावर चरती, बघुनि मज, न वृत्ति त्या ढळे पशुंच्या
मद्देह ते निरखिती सकुतुक, निर्भय, भले, अपाप, शुची ७
मनुजज्ञान नसे त्यां; अद्भुत ते दाविताात सौम्यपण
पण तेंच मला भ्रमवी, श्रमवी, जणुं लोचनात लोहकण ८
ईशकृपादान असे प्रीती, मैत्री, समाज; हें मजसी
परि दुर्लभ; मति चिंती त्यांस अधनमति सदैव हेम जसी ९
हे सुखहेतुत्रितया ! फुटतील कपोतसे मला पक्ष !
तरि मारूनि भरारी, होतों त्वत्स्वादसेवनीं दक्ष ! १०
वृद्धानुभव परिशितों, जो माझा ज्ञानसंघ वाढवता
आनंदतों बघुनि मी युवजनलीलाविलासही भवता ! ११
सद्धर्माचे गुणगण अपार असती विशाल अर्णवसे
जें त्यामध्यें गवसे, वसुधेंतहि न तें सुवर्ण वसे ! १२
परि या शैलवनात न तो धर्म, न वेदवाक्यशुभघोष
नीतिप्रीती कसली ? मंगलकृत्यें न उद्भविति तोष १३
सुतजन्मोत्सव करतीं मंगलवाद्यें इथें न आढळतीं
न कधीं मृतबंधूत्तरसंस्कारा करुनि धैर्यनिधि ढळती १४
वा मारुता ! करिसि कां सोंसों शब्दें मदीय उपहास ?
निज कामगतित्वें मज सहाय हो, संचिर कराचि वनवास १५
मद्देशविरह अक्षय ! तरि तू तेथील तोषदा वार्ता
आणोनि, अमृतघनसा होईं मज शोकदोषदावार्ता १६
' मन्मित्र मला स्मरती, ' ही वार्ता करिल चारु तापाही !
मद्बंधुवृत्त आणीं, या दीना सदय मारुता ! पाहीं १७
मद्दर्शन ते प्रेमें वाञ्छुनि, मम करिति काय आठवण ?
कीं सांग, सख्या ! पवना ! ती तुटली प्रेमबंधगाठवण ! १८

एक तरी मित्र असे स्मरता मज ' एकतो असें, पवना !
तरि तद्दर्शनहीनहि मानीतों रुचिर याहि शापवना ! १९
अद्भुत मनोगती ही हीशीं तुलवेल हा न पवमान !
प्रत्यक्ष रविकरगती हीसंगें भासणार लवमान ! २०
मन्मन या वनभूतुनि मज काढुनि ने क्षणें स्वदेशाला
पूर्वपरिचिता विषयां दाखवुनी तें प्रभूत दे शाला २१
परि जागृति क्षणातीं येवोनी दाखवी स्वनिष्ठुरता
सत्यप्रत्यय होई, जो छेदी हृदय सेवुनी क्षुरता २२
कल्पित सुख निरसे तें, समक्ष मम दुःखमय दरी राहे
भानचि अनिष्ट झालें, न सोसवे जागृती शरीरा हे ! २३
परि फलहीन कशाला वनवासाचें मदीय अस्तवन ²
भास्वान् अस्ता जाउनि, रंगवितो रक्तवर्ण अस्तवन २४
सोडुनि विहार सारा विहगगण त्वरित परतला नीडा
विश्रांतिस्तव जाता त्यजुनी हे पशुहि मालभूक्रीडा २५
जनपद असो, असो वा निर्जनवन, शांतिचा असे समय !
ही ईशकृपास्मृति दे प्रेमसुखानिधी मनास तोषमय २६
कोठें असलों, तरि मज करिल कृपेची परेश पाखर तो
या सुविचारतरुवरी चित्तविहग विधृतशांतिशाख रतो २७

———————— बाळकृष्ण अनंत भिडे बी. ए.

## अवन्तिकेस.

### पद.

( चाल.– प्रिये ! पहा )

अवन्तिके ! वैभव तव पूर्व सर्व आज नष्ट जाहलें । धृ० ।
कालिदास, भवभूति, । भर्तृहरी विमलमति,

दण्डि, आण चण्डकृति । तव कवि तुज हरपले ! १
वाग्देवीकंठमणी । तव कवि ते मावळुनी
त्या जागीं अल्पगुणी । मजसम तुज लाधले ! २
शककर्ता विबुधमान्य । विक्रम नृप, भोज धन्य,
शूर रसिक नृपति अन्य । आज कुठें राहिले ? ३
ह्मणती सौंदर्यखनी । तुज, न आज परी कुणी
रूपें दे मोह मनीं । रूप कुठें लोपलें ? ४
अस्तातें विधु जाता । तेज येइ खद्योता
खुलति तशा पुरवनिता । रूप खरें मावळे ! ५
' मोर पुढें नृत्य करी । प्रमदा करताल धरी '
पूर्वीचें सर्व परी । स्वप्न अता जाहलें ! ६
विस्तृत आरामतति । विविध रम्य पुष्पपंक्ति
आज सर्व लोपे ती । उलट हाय ! जाहलें ! ७
वर—गृहास वधु जातां । वधु—गृहास भेसुरता
अवन्ति ! तूं तशि आतां । तेज तुझें नष्टलें ! ८
वेदशास्त्रपूर्णनिपुण । जाउनि तो ब्राह्मणगण
चांगि—भांगि मूढ पूर्ण । तुजसि आज लाधले ! ९
नृत्यकला गानकला । हाय ! जाति अस्ताला
फाटे नभ तरि त्याला । थिगळ कुणी लाविलें ? १०
पूर्व कविग्रन्थांनीं । परिचय तव होवोनी
पाहिन तुज लागोनी— । कधिं ? असें जाहलें, ११
होतां परि भेट हाय ! । विपरित हें होय काय
रम्य रूप तुझें जाय । विद्रुप हें दीसलें. १२
प्रेरावी दृष्टि जिथें । अश्रूतें कारण तें
अवन्तिके दुर्दिन ते । तुजसि कोंवि पातले ? १३

स्थिति ऐशी जरि झाली । स्थळें दोन या काळीं
चित्तवृत्ति मम धाली-- । बघुनि, हृदय तोषलें. १४
देखावा क्षिप्रेचा । पांग फेडि नयनाचा
वर्णाया नच वाचा-- । शक्य, शब्द खुटले ! १५
दुरितदहन सुखनिधान । पतितअधमजनपावन
महाकाल मोक्षभुवन । हृदया मम भासले ! १६
क्षणभगुर वैभव तें । तव गेलें, जावो तें
अक्षय परि हें तूतें । वैभव बघ लाभलें ! १७

—————— नरहर शंकर रहाळकर बी. ए.

## सुनेची विनति

( एका शिक्षणोत्सुक श्वशुरास सुनेनें केलेली विनति. )

आर्या.

मामाजी ! परिसावें भावें वदल्यें करूनि मी प्रणती
स्त्रीबालोक्तिहि सूक्त ग्राह्य सदा साधु मान्य जन गणती १
स्त्रीवर्गाची स्थिति जी दिसते ती उठविते हृदीं हाय !
ती बोलवी मला हें, क्षणभर मज भींड सोडुनी जाय २
अज्ञान ठेविता का; आम्हाला कां न शिक्षणा अर्पी ?
कां ज्ञानदान आह्मा मानितसां अमृतपानसें सर्पा ? ३
आयस परिसस्पर्शें कनक घडे; कनक होय आयस न
शिक्षण उन्नतिहेतू, आणी लोकीं कधीं न तें व्यसन ४
संसारशकट अवजड पुरुषस्त्री दोन हीं तया चाकें
जरि एक उंच, दुसरें नीच तरी शकट हा कसा हांके ? ५
शिशुबुद्धिशक्तिपोषण मातेवर सर्वथैव अवलंबे
तरि अबलोन्नति करणें सुज्ञें मामाजि ! का न अविलंबें ? ६

स्वकुलोन्नति करिते स्त्री सुज्ञ; तयें जाइ राष्ट्र उन्नतिला
आह्मां मागें टाकुनि नीच करितसां स्वयें निजस्थितिला ७
आह्मांला अज्ञानी ठेवाल जरी तुह्मीं हटें वडिल
तरि दूषील तुह्मां ती आपन्मग्ना सदा पिढी पुढिल ८
' मातेसम दैवत नच ' वचन असें शास्त्र–सिद्ध जन जाणे
जननिस मूढ कसा परि दावावा पूज्यभाव तनुजानें ? ९
प्रेमें पाळुनि अमुचीं ज्ञानसुखोज्ज्वळ पहा सदा तोंडें
तूह्मास साभिमान प्राप्तोन्नति आठवेल नातोंडें १०
दुःखें दूर करावीं मामाजी ! बोल सत्य परिसून
आह्मास दान द्या ही, सादर तुमची विनति करि सून ११

—————— बाळकृष्ण अनंत भिडे बी. ए.

## सुन्दरीदर्शन.

### श्लोक.

हें सौन्दर्य तुझें बघून सुभगे ! आनन्द होतो मला,
आलेख्यीं लिहिण्या मला गवसला उत्कृष्ट हा मासला;
प्रीतिप्रेरक जो जगीं रस असे शृंगार नामें, रमे,
त्यानें ही भरली लता तनु तुझी माधुर्ययुक्ता गमे ! १
वर्णाया कवनीं मला गवसला उत्कृष्ट हा मासला,
बुद्धीनें असल्या जरी तुजवरी मी लाविलें दृष्टिला,
आकांक्षा हृदयांतल्या निकट या आतां पहा धावती--
स्वप्नासादिक सर्वही समजुनी त्या ध्यावया पाहती ! २

केशवसुत.

१ चित्रांत.

# काव्यरत्नावलि.

## अंक ९ वा.

## मेघनादवधकाव्य.

### सर्ग १ ला.

गेल्या शतकांत 'माइकेल मधुसूदन दत्त' या नांवाचा बंगाल्यांत एक प्रसिद्ध कवि होऊन गेला; त्यानें मेघनादवध, तिलोत्तमासंभव, व्रजांगना व वीरांगना वगैरे काव्यें रचिलीं आहेत; प्रस्तुत काव्य मेघनादवध हें सुप्रसिद्ध रामायणाच्या कथेवरून रचिलें आहे. मेघनाद हें रावणाच्या धाकट्या मुलाचें नांव; हा इंद्रजित् या नांवानें पुराणांत प्रसिद्ध आहे. प्रस्तुत काव्य अमित्रच्छंदांत ( Blank Verse ) रचिलेलें असून त्याचे नऊ सर्ग आहेत.

आर्या.

समुखसमरीं[1] पडतां मृत होउनि वीरबाहु[2] वीरमणि
सेनापतिपद कवणा देउनि धाडी पुन्हा दशास्य रणीं ? १
इंद्रा निर्भय लक्ष्मण केवि करी इंद्रजिद्वधा करुन ?
हे देवि[3] ! अमृतभाषिणि सांग तुला विनवि दास हा दीन २
श्वेतभुजे[4] ! किंकर हा मदमती, यावरी दया वितर
महिमा अपार तव, तू अधमा करिसी दिव्य साधुवर ३

१ समोरासमोरचें युद्ध. २ रावणाचा वडील मुलगा ३ सरस्वती. ४ देवी सरस्वतीचें विशेषण.

वरदे तुझ्या वरानें रत्नाकर—चोर काव्यरत्न—हरी
झाला, तुझिया स्पर्शों विषतरु चंदनतरुद्युतीस वरी ४
पदरीं पुण्य न इतुकें माझ्या मी दीन हीन सत्य, परी
मूढ सुतावर माता प्रेम जगीं अधिक काय ती न करी ५
ये गे उडून वेगें विस्तारुनि हैमपक्ष विश्वरमे !
दे स्फूर्ति गान गाया ज्यातें परिसून सर्व विश्व रमे ६
कवि—चित्तपुष्पवनिंचा मधु घेउनि तूंहि कल्पने ये गे
सुंदर मधुचक्र रची ज्याचें करितील पान जन वेगें ७
कनकासनीं दशानन शोभे हेमाद्रिचें जसें शिखर
तेज.पुंज सभोंतीं नत भावें बैसले अनेक नर ८
लोकीं अतुल सभा ती स्फटिकमयी रत्नपूर्ण शोभतसे
कमलें विकसित होतां सुंदर मानस दिसे मनोज्ञ जसें ९
बहुरंगी स्तंभाहीं सांवरिलें दिव्य तें सभास्थान
जैसा फणी फणेतें विस्तारुनि सांवरी धरा दीन १०
जैशा पल्लव—माला कुसुमग्रथिता गृहास शोभविती
हीरक—मुक्ता—युक्ता मरकतमाला जनांस लोभविती ११
होतीं चमकत रत्नें अविरत विद्युल्लतेपरी रुचिर
त्यांची प्रभा जनांच्या नयना दिपवी परी ठरे न चिर १२
होत्या सुचारु चामर ढाळित चंद्रानना मृणाल करीं
दासी, काम मनोहर किंकरसमुदाय रम्य छत्र धरी १३
पांडव शिबिरद्वारीं रुद्रेश्वरशूलपाणि अमरमणि
तैसे भीषणमूर्ति द्वारीं पालक तयास कोण गणी १४
वाहे वसंतवायु स्वच्छंदें मंद मंद गंधयुत
नादें भरी सभा ती गोवन वेणुस्वनें जसें ध्वनित १५

---

१ वाल्मीकीस उद्देशून. २ पोळें

इंद्रप्रस्थीं मणिमय रचिली त्वां जी सभा मया[1] स्वकरीं
ती हिजपुढें कितीशी दिनमणिची काजव्यास ये न सरी १६
होता सभेंत बसला लंकापति वाग्विहीन सुतनिधनें
शरभेदें तरु तैसा गाळी अविरल जलास खिन्नमनें १७
शोणितसिक्तकलेवर दूत उभा वाग्विलास उद्धरला
गेले सुबाहुसंगें वीर बहू एक त्यांतुनी उरला १८
शोकाकुल रावण हो पुत्राची परिसुनी निधनवार्ता
मेघाच्छन्न रविपरी होय सभा काढि वाणितें आर्ता १९
मूर्छामुक्त दशानन बोले ' दूता खरेंच सांग मला
त्वत्संदेश निशेच्या स्वप्नासम वा असत्यसा गमला २०
ज्याचें भुज–बल पाहुनि भीतीनें अमरवृंद थरथरतो
त्या वीरपुंगवाचे प्राण कसे क्षुद्र तो रघू हरतो २१
वाटे जणो विधाता कुसुमदलें शाल्मली[2] तरू कापी
हे वीरबाहु ! पाहू कोठें तुज मी किती तरी पापी २२
हे दारुण दैवा तू माझें हरिलेंस रत्न रमणीय
गेला मान कुलाचा होय मना दुःख या अशमनीय २३
आधीं कापुनि शाखा मागुनि तोडी तरूस काष्ठहर
तैसे दुर्बळ करिती देवा मज शत्रुचे अनंत शर २४
तो कुंभकर्ण माझा शंभुपरी विक्रमी त्यजी मजला
योद्धे अनेक तैसे विधि वाटे दुःख द्यावया सजला २५
त्या पाहिला विषारी पंचवटी–काननीं भुजंगम तो
हे नष्टे शूर्पणखे ! नष्ट क्षण तो अहा मला गमतो २६
वन्हिशिखा मूर्तिमती आणुनि मी ठेविली जधीं सीता
त्या सुंदर कनकगृहीं, वाटे मज समय तो अशिव होता २७

---

१ मयासुर. २ सांवरीचा वृक्ष.

येतें मनात जावें सोडुनि लंकापुरी सुवर्णमयी
शमवावी वसुनि वनीं ज्वाला जी पेट घेतसे हृदयीं २८
सज्जित सुममालांहीं दीपततीं भूषिता असे नगरी
माझ्या ती दुर्दैवें आज परी दिसतसे उदास पुरी २९
एकैक पुष्प सुकलें दीपाचें सर्व तेज माळवलें
वाद्यें स्तब्ध जहालीं दुर्ग्धीं दैवें विपास कालविलें ३०
सजयमुखें परिसुनी प्रियसुतनिधनास अधराज रडे
रडला रावण तैसा शोकसमुद्रीं तदीय काय बुडे ३१
सारण मंत्री वदला कर जोडुनि वाक्य त्यास वाराया
" बोधावें काय तुला ज्ञानाच्या सागरा अगा राया ? ३२
वज्राघातें पडतां मोडुनि उत्तुंग अद्रिचें शिखर
भूधर धीर न सोडी दुःखीं तैसा विवेकपूर्ण नर ३३
भवमंडल मायामय सुखदुःखें भूपते वृथा सारीं
धीरें धीमन्तानें व्यर्थ बुडावें न शोक—कासारीं " ३४
भूप ह्मणे " सचिववरा वदसी तू सत्य सर्व मज कळतें
काय करूं हाय परी सुतनिधनें धैर्य जाय, बळ गळतें ३५
हृद्वृत्तावर फुलली कलिका नेता हरून कालानें
हृदय बुडे शोकसरीं जेंवि बुडावें जलीं मृणालानें " ३६
इतुकें वदूनि राजा पाही दूताकडे ह्मणे त्यास
" सांग मला केंवि पडे समरीं तो वीर देवसत्रास " ३७
राजेन्द्रपदा नमुनी करयुग जोडोनि दूत मग बोले
" भूपा तत्सुतविभवा पाहोनी अमरवृंदही डोले ३८
वारण शिरे नलवनीं तैसा अरिच्या दलीं शिरे वीर
करुनी नाद भयंकर, तो स्मरता धडधडा उडे ऊर ३९

१ दैठ. २ डौल. ३

मेघाची जळधीची सिंहाची गर्जना असामान्य
त्याहून ही भयंकर वीर न का निर्जरां असा मान्य ४०
मग वीरबाहु शिरला सगें घेऊनि सर्व वीर रणीं
जैसा गजराज शिरे गजयूथा घेउनी सर्व विपिनीं ४१
धूळि उडे सूर्य दडे ! शस्त्रावरि शस्त्र आदळूनि झडे
जाती बाण सणाणा शत्रुशिरें घेउनी त्यजूनि धडें ४२
इतुक्यांत राम शिरला स्वकरीं घेऊनि चाप समरात
झगडे सुबाहुसगें सिंहासम, हर्ष होय अमरात ४३
झंझावातें सागर तैसा सेना—समुद्र तो खवळे
मारी राम कुमारा असुर चमूतील सर्व तोख पळे ४४
हाहाकार उडाला दैत्यांचे वीर पावले पतन
हत—दैवी उरलों मी एकाकी हें करावया कथन " ४५
तैं नैकषेय[1] बोले " तुजसम बा अन्य बोलका नाहीं
दूता निवलों हृदयीं परिसुनि तव धन्य बोल कानांहीं ४६
सुतशौर्यकथाश्रवणें समरोत्सुक कोण हो न वीरवर
डमरुध्वनितें परिसुनि कालफणी त्यजि न काय निजविवर ४७
जाऊं जन हो पाहूं वीरसुबाहू कसा रणीं पडला
वदुनि असें सौधावरि उदयनगीं भूप भानुसा चढला ४८
तेथुनि दिसली लंका कनकमयी कीं दुजी कुबेरपुरी
पुष्पवनें किति फुललीं सुंदर कमलें सुवर्णवर्ण सरीं ४९
उडति किती कारंजीं रुंजी घालिति सुमावरी भ्रमर
भ्रम रम्य रत्नशाला उपजविती वांछिती जयां अमर ५०
तें देवमंदिरांचे पाहुनि रमणीय रत्नमय कळस
वाटे ऐश्वर्याचा झाला लंकापुरींत त्या कळस ५१

१ रावण.

हे दिव्यपाद लंके ! पूजावे देववंद्य तव चरण
आणुनि ठेवी ह्मणुनी जग हे गमतें समस्त उपकरण ५२
जैसा गिरिपृष्ठावर फिरत असे केसरी तसे वीर
प्राचीरावर होते समरमदें मत्तशूर रणधीर ५३
तारामंडल गगनीं सिकताकण सिंधुच्या जसे तीरीं
नगराच्या बाहेरी सीताहर अरिदला तसें हेरी ५४
बसला पूर्वद्वारीं नल, अंगद शूर दक्षिणद्वारीं
कंचुकभूषित विषधर जेविं हिमान्तीं वसे निजागारीं ५५
सुग्रीव उत्तरेला रोधी पश्चिम दिशा धरी राम
रामाविरहें दुःखी ज्योत्स्नेविण जेविं चंद्र सुखधाम ५६
मित्र बिभीषण भीषण समीं लक्ष्मण सुलक्षणी बंधु
मारुतनंदन हनुमान् जो भासे स्वामिभक्तिचा सिंधु ५७
व्याधानीं मिळुनि जशी रोधावी गहन काननीं हरिणी
होती दलें रिपूच्या अगणित लंकापुरी मनोहरिणी ५८
पाहे रणभू रावण गृध्रशिवाश्वानशकुनिकाकयुत
पडली रणगाजींचीं वाजींचीं मृतकलेवरें अयुत ५९
कुंजर पंजर पडले शस्त्रास्त्रें मोडलीं जयां न मिती
असुरहित असुर केले रामशरें देव यज्जया नमिती ६०
मृत वीरबाहु पाहुनि रावण हृदयात फार तळमळला
मोहें मुग्ध जहाला धैर्याचा मेरु हाय डळमळला ६१
बोले " धन्य कुमारा केलें तू या रणांगणीं शयन
निजयश रक्षायातें मरणाचें वीर बाळगी भय न ६२
जो भी तो भीरु असे त्यातें धिक्कारिती सदा सुकवी
सुख वी न जन्म त्याचें चिंतेनें अंबिकानना सुकवी ६३

१ तटबंदी.

वत्सा हें मज कळतें शोकें परि हृदय फार खळबळत
चिंताग्नीनें जळतें न कळे मोडेल केंवि खळबळ तें ६४
संसार रंगभूमी मानवपात्रें तियेवरी फिरती
तूं सूत्रधार धात्या ! कथिसी तैशा कृतींस तीं करिती ६५
दुःखी पास पाहोनि व्हावें हर्ष प्रफुल्ल तव मन कां "
सुतदुःखें होय पिता दुःखी हें जाणसी जगज्जनका " ६६
वदुनि असें मुख फिरवी पाही मकरालया नृपति विकल
अचलघनश्रेणींसम सलिलावर शोभती शिलाशकल ६७
होत्या शिला कुळांतें ताडित लहरी प्रचंड फेनमय
फूत्कारा करुनि जसा ताडी मूषक फणींद्र हीनदय ६८
राजपथासम विस्तृत होता सेतू अपूर्व बंधन तो
जलधिप्रवाह गाजे वर्षाकाळीं जसा घन स्वनतो ६९
रत्नाकर ह्मणति तुला सिंधुवरा बोलला तदा राय
कंठीं कठिण शिलांचा हार तुझ्या शोभतो कसा हाय ! ७०
अससी अलंघ्य सकळां उल्लंघाया मनुष्य राम शके
केंवि तुला [२] नवल गमे जिंकावें काय खगवरा मशकें ७१
माधववक्ष प्रांतीं कौस्तुभ लंका तशी सुवर्णवती
शोभे उरःप्रदेशीं तव, न तिचे हाल आज वर्णवती ७२
सिंधुवरा ऊठ ह्मणों तोड चिंडी राख ही कनकलंका
करितों विनति तुजला प्रक्षाळुनि टाक या जनकलंका ७३
वदुनि असें सचिवांसह राय बसे येउनी सभास्थानीं
शोकें विषण्ण, पडला रोदनरव त्याचिया तदा कानीं ७४
घेउनि सख्यांस सगें देवी चित्रांगदा सभे आली
आली दशाननाची सुतशोकें फार विव्हला झाली ७५

---

१ शब्द करितो.

कबरीबंधन सुटलें आभरणीं प्रेम कोठुनी उठलें
विटलें मन संतापें दुर्दैवें सौख्यसूत्र कीं तुटलें ! ७६
हिमनिकराहतकुसुमा वन्यलता शोभ[illegible] तशी देवी
अश्रुजलें नयन खुले कमलाचें शिशिरपूर्ण दल जेंवी ७७
सौदामिनीस्वरूपा—दासी [illegible]केशभार—मेघतती
निश्वास घोर मारुत अश्रूंची वृष्टि होय शीघ्रगती ७८
शोक—समीरण वाहे रव न साहे सभेकडे पाहे
मोहें मुग्धा महिषी मग बोले मृदु वचास लवलाहे ७९
" होय विधिबलें एक्या रत्नाचा प्रसव माझिया उदरीं
तरुगर्भी खगशिशुतें तेंवि तया-घातलें तुझ्या-पदरीं ८०
लंकानाथा कोठें माझें तें ठेविलें तुवां रत्न
अबलधना रक्षावें राजानें करुनि सर्वदा यत्न " ८१
राय वदे " ग्रह छळती देसी दूषण मला कशाला-गे
लागे कटुवचन. जसें सुदारें चाच मारितां कशो लागे ८२
होय निदाघीं जैशी कुसुमविहीना वनस्थली ललने
ही वीरपुत्रधात्री वीरविहीनापुरी विभिन्नछलनें ८३
एक तुझा पुत्र मरे ह्मणुनी रडसी करून खेदास
किति म्यां तरी रडावें शतसुत करितां यमें सखे दास ८४
शोभे विलाप तुजला असुनी तू वीरसू असा काय ?
उज्ज्वल कुलास करुनी स्वर्गी तव सत्कुमार गे जाय " ८५
देवी ह्मणे " गमे तो मजलागी धन्य धन्य वीर गडी
जननी तदीय धन्या, शौर्यें जो अरिस आहवीं रगडी ८६
कोठें क्षुद्र अयोध्या ? कोठें लंका ? कळे न हो मजला
करणार काय राघव ? वामन शशितें धरावया सजला " ८७

---

१ दवाच्या योगानें गळला आहे पुष्पभार जीचा. २ चाबूक.

ती वीरबाहुजननी वदुनि असें स्वीय मंदिरा गेली
झाली लंकापतिची रामावरि चित्तवृत्ति रागेली ८८
शौर्यें गर्जोनि वदे राय तदा "वीर हो चला जाऊं
मारूं रणीं मरूं वा रामाचें शौर्य काय तें पाहूं" ८९
तों होय नाद भैरव दुंदुभिचा भव्य त्या सभास्थानीं
यच्छ्रवणें कर्बुरगण जलधिपरी खवळला मदें मानी ९०
शुंडादंड उभारुनि आले दंती त्यजूनि गजशाले
वक्रग्रीव तुरंगम उत्कट झुजावया रणीं झाले ९१
असि चर्म शूल घेउनि सजले सैनिक करावया समर
वातें झडती उडती ध्वज कौतुक बघुनि पाहती अमर ९२
हय हेषिति[1] उल्हासें गज गर्जति शंख वाजती नाना
टंकारति कोदंडें विद्युत्प्रभ वाजती असि झणाणा ९३
रोधी श्रवणपथातें कोलाहल हालवी कनकलंका
शिरुनी तळीं जलाच्या उपजवि वरुणप्रियामनीं शंका ९४
पंकज वनांत असतां बाधित सुकुमार वारुणी क्लेश
दचकुनि पुसे सखीतें का अस्थिर जाहला वद जलेश ९५
बघ ही थरथर कांपे सखये मुक्तामयी सदनचूडा
वाटे लहरीसंगें झुंजतसे पवनवृंद दे पीडा ९६
देवेंद्रसभेमाजी प्रार्थियलें मी प्रभंजना देवा
बांधुनि मरुद्गणातें कारागारीं तयास हो ठेवा ९७
"भूतलतरंगिणी नव दासी त्यांशीं सदा रमायातें
आज्ञा जलेश्वरी दे मान्य तुझें वचन होय मग मातें" ९८
वदता असें प्रभंजन झालें सखये मनांत संतुष्ट
अनुमति दिली तयातें का मग छळिती मला पवन दुष्ट? ९९

---

१ खिंकाळती.

नोहे मारुत, देवी देसी दूषण वृथा जगत्प्राणा
राघवगर्व हराया रावण साजी रणार्थ निज सेना १००
" वदसी सत्य सखे तूं " बोले पाशिप्रिया तिला फिरुनी
' समरार्थ राम आला नेतां सीता दशाननें हरुनी ' १०१
रक्ष कुलराजश्री आहे प्रियतम सखी सखे माझी
जा सत्वर पूस तिला अजि कैशी चालली असे आजी. १०२
उठली मुरली गेली जलतल सोडून शीघ्र लंकेला
कमलालयीं मनोहर पाहे कमलेस निष्कलंकेला १०३
अनुचर होउनि राहे पद्मापदपद्म सुरभिच्या मोहें
वासंतानिल सतत ठायीं त्या सुस्वना करी, वाहे १०४
रत्नीं धनेशमंदिर तेंवि सुमें शोभलें रमासदन
चंदनतैलयुतायत दीपगुणें तारका अधोवदन १०५
कमलालयांत जाउनि दूती कमलापदीं करी नमन
रक्ष.कुललक्ष्मीचें झालें तिज पाहतां प्रसन्न मन १०६
" कोठें सखी असे मम मुरले आलीस कासया बोल ?
कुशल तिचें परिसाया असती मत्कर्ण सर्वदा लोल " १०७
दूती ह्मणे सतीला " देवी, पाशीप्रिया सुखी आहे
राहे शांत जल–तलीं कुशलाची काळजी तुझ्या वाहे " १०८
रघुवीर–रावणाच्या संग्रामीं विजय पावला कवण
तें वृत्त सांग सारें देवी उत्सुक करावया श्रवण " १०९
निश्वासुनी विषादें बोले कमला " कथूं तुला काय ?
मुरले सरलें वाटे रावणसाम्राज्य आज गे हाय ! ११०
चंचलतरंगवेगें सागरतट होय जेंवि हीनबल
तैसा दुर्मति रावण, करिशिल परिसून तूं मनीं नवल १११

---

१ वरुण २ लढाई ३ वारुणीची दासी.

अतिकायं जाय सुरथी झाला असुहीन कुंभकर्ण रणीं
मृतवीरांच्या भारें गेली दडपून वाटतें धरणी ११२
योद्धे अनेक मेले विव्हल नगरी समस्त शोकानें
करिती विलाप माता कांता जो ऐकवे न तो कानें " ११३
तैं मुरला प्रश्न करी " सेनानी कोण व्हावया सजला ? "
लक्ष्मी वदे, " चला गे नयनीं पाहू न ठाउकें मजला " ११४
वदुनि असें हरिरमणी निलयाच्या जाय तूर्ण बाहेरी
मुरलेसह औत्सुक्यें रावणसेनामहार्णवा हेरी ११५
घर्घरती रथ, धावति हय, करिती गर्जना महा थोर
दंती यमदंडासम शुंडेतें फेकुनी सभोंवार ११६
वाद्यें वाजति उडती ध्वज फडफड अंबरीं जया न मिती
वातायनीं बसोनी वर्षिति सुमनें मनोहरा युवती ११७
सुरदल घेउनि संगें वाटे वासव पुरींत या शिरला
ऐश्वर्य स्वर्गीचें आलें भवमंडला वदे मुरला ११८
आले कदन कराया रणभागीं आज कोण कोण रथी
करुनि कृपा सांग मला माते ही कुठली मदीय मति ११९
पद्मा ह्मणे " पहा हा, स्वर्णरथीं बैसला विरूपाक्ष[1]
हा शूर कालनेमी गजपृष्ठीं बैसला रणी दक्ष १२०
पाही अश्वारोही तालासम तुंग तो गदाधारी
यन्नाम ताल—जघा[2] शौर्यें शत्रूंस सगरीं मारी १२१
दावानलें करावे भस्म जसे काननीं तरू सकल
तैसे शत्रुशराहीं राक्षस केले कथूं किती, विकल १२२
शोभे विक्रमशाली शूरांच्या मालिकेंत हीरकसा
दासी पुसे दिसेना कोठें तो मेघनाद वीर कसा १२३

१ राक्षसाचें नांव २ राक्षसाचें नाव.

बोले रमा रमे तो उद्यानीं घेउनी सर्व रमणी।
ठावें न त्यास झाला मृत सोदर वीरबाहु वीरमणि १२४
" जातें वैकुंठा मी सांग असें वारुणीस जा मुरले
निज–दोषें रायें बुडे शोकसमुद्रांत भाग्यबल नुरलें १२५
वर्षाकालीं सरसी विमलजला कर्दमोद्गमें समला
होय तशी स्वर्णपुरी पापें येथें रुचे न वास मला " १२६
वदुनि पद-पद्मांचें पवनपथें तूर्ण किंकरी-परते
जाई रमा स्थलीं त्या जेथें तो असुरवंशदीप रते १२७
तें स्थान फार सुंदर वाटे अमरावती जणों दुसरी
शोभित उपवनिकांहीं ज्यांची नंदनवनास ये न सरी १२८
तेथें तरुशाखांवरि कूजिति कोकिल सदा स्वनें मधुर
मधु रम्य सेवण्यातें गुंजत उडती सुमांवरी भ्रमर १२९
वाहति वासंतानिल विमल जलाचे तसे अनंत झरे
विकसति नाना कुसुमें परिमल ज्यांचा चहूंकडे पसरे १३०
शिरतां सुवर्ण हर्म्यीं पाहे हरिची प्रिया स्त्रियाःशूर
द्वारीं फिरती जैशा विवरमुखीं कालसर्पिणी क्रूर १३१
शोभे करीं शरासन पृष्ठीं तूणीर–संगिनी वेणी
चमके निषंगगर्भीं मणिमय फणिच्यापरी शरश्रेणी १३२
शोभा कुचद्वयातें दे कांचनकवच त्यांचिया फार
विकसितकमलकुलातें जैशी दे कांति भानुकरभार १३३
शर खर-तूणीरस्थ प्रखर परी त्याहुनी कटाक्षशर
फिरती प्रमदा जैशा मधुकालीं मत्त हस्तिनीनिकर १३४
कांची नितंबबिंबीं नूपुर मधुर स्वना करी चरणीं
विहरे युवराज अशा रतिसुंदर घेउनी सर्व तरुणी १३५

---

१ रावण राजा २ गढूळ ३ इंद्रजित ४ भाता.

घेऊनि दक्षबाला त्याशीं रजनीपती जणो रमला
किंवा गोपवधूसह मुरलीधर यामुनी–तटीं गमला १३६
धात्रीरूपें कमला रमला युवराज त्या स्थलीं जाय
उपमातेचे वंदी भावें बीरेंद्रकेसरी पाय १३७
मग मेघनाद बोले " माते आलीस कासया गे तूं ?
सांग मला लंकेचें परिसाया कुशल मानसीं हेतु " १३८
चुम्बुनि शिर तनयाचें मग धात्रीरूपिणी पयोधिसुता
बोले " काय कथूं मी आली तव बांधवा रणीं व्यसुता[1] " १३९
त्या वीरबाहु–निधनें लंकेची दुर्दशा पुरी झाली
वाली न आज उरला तिजला ती शोकसागरीं न्हाली १४०
विस्मित युवराज ह्मणे " करवे ना वृत्त हें मला श्रवण
माते, मद्भुवरा शकशा मारावया रणीं कवण ? १४१
केलें निशारणीं मीं रामातें प्राणहीन बाणाहीं
मारील बांधवातें वीर असा एकही दुजा नाहीं " १४२
" राघव केवळ कपटी झाला फिरुनी सजीव मेलेला
ऊठ ह्मणा धाव रणीं रक्षीं निजवंशमान गेलेला " १४३
धात्रीवचनें खवळे फेकी सुमहार वलय कनकाचें
नाचे समर कराया मन त्या प्रमिलासुभाग्यजनकाचें १४४
वस्त्रें विगलित झालीं आलीं कर्णस्थ कुंडलें खालीं
जैशी अशोकतरुचीं पर्णें कुसुमें महामरुत्कालीं १४५
राय वदे " रिपुचमुनें आक्रमिली सर्वही कनकलंका
हा धिग् जीवित माझें ! रमतों रामासवें त्यजुनि शंका १४६
मी इंद्रजिद्दशानन–नंदन मज हा सहे न अवमान
मानव राघव किति तो ! होइन मी त्या तृणास पवमान १४७

---

१ मरण.

साजे वीराभरणीं रावण–सुत जिष्णु, साच गोग्रहणीं
किंवा हैमवतीसुत सेनानी[1] तारकासुरोन्मथनीं १४८
रथ मेघवर्ण भासे, चक्रें विद्युत्समप्रभावमती
ध्वज इंद्रचाप, वाजी वेगानें मारुतापरी गमती १४९
ऐशा दिव्यरथावरि बैसे जों मेघनाद वीरमणि
रमणी प्रमिला येउनि आक्रंदे पतिकरद्वया धरुनी १५०
“ कोठें सोडुनि जाता नाथा मातें वियोग जाचतसे
पति जीवन वनितेचें त्याविण पळही सती न वांचतसे ” १५१
हासुनि घननाद वदे “ बांधुनि दृढ पाश गे तुवां चरणीं
चिरदास यास केलें कैसा सोडील हा तुला रमणी ? १५२
स्वस्थ रहा विरह सहा शशिवदने अल्पकालपर्यंत
येतों कीर्तिस वरुनी करुनी मी समरात अर्यंते[2] ” १५३
वदुनि असें पवनपथें वेगानें मेघनाद रथ हाकी
वाटे सुवर्णपक्षां पसरुनि मैनाक उडतसे नाकी १५४
उतरे द्रुतगति सुरथी ये घेउनि जेथ तातदलभारें[3]
पाहुनि वीरवरा त्या कर्बुरगणें[4] हर्ष पावला फार १५५
वदुनि चरण पित्याचे नंदन बोले “ मला न हें साहे
राहे राघव अर्जुनी आलों त्या मारण्यास लवलाहें १५६
अनुमति द्यावी येतों मारुनि कुमति क्षणात पामर तो
शिरतो दीप्त ज्वलनीं उरतो तो शलभ का नृपा मरता ? १५७
आलिंगुनि तनयातें प्रेमभरें वचन बोलला राजा
वत्सा कुलावतंसा तुजला मज सांगवे न समरा जा १५८
छळितें दुर्दैव खरें प्रति–दिनिं मजला करूनि हीनबळ
तरती शिळा जलावर मृत झाले फिरुनि वांचती नवल ! १५९

---

१ कार्तिक स्वामी. २ शत्रूंचा नाश. ३ रावण. ४ राक्षस.

परिसुनि वचन पित्याचे पुत्र वदे " होउ राम मत्त करी[1]
मी हरि हरिन तयाच्या प्राणा एक्या पळांत खर-नखरीं १६०
राहुनि गृहीं कराया जर मी सांगेन आपणा समर
हांसेल मेघवाहन[2] नाकीं होतील रुष्ट ते अमर १६१
आज्ञा द्यावी फिरुनी माराया एकवार रामाला
पाहीन औषधी त्या त्याच्या येतील केंवि कामाला १६२
तैं बोलला दशानन " मदनुज घटकर्ण समरीं भिडला
पडला वज्रें तरुसा तन्निधन श्रवुनि वीरगण रडला १६३
जाणें असेल जरि तुज समर कराया निकुंभिलीं[3] यज्ञ
सांग करीं तू वत्सा, धर्मे जयलाभ सांगती सुज्ञ १६४
सेनापतिपद दिधलें त्वदुचित, तुज तू अनर्घ्य वीरमणि
जा जिंकुनि रामातें ये वरुनी कीर्ति तू नवी रमणी १६५
घेउनि मग गंगोदक रायें अभिषेकिलें स्वतनुजाला
आनंदे बंदीजन हर्ष जहाला समस्त दनुजाला १६६
" हे राजनगरि लंके आवरि शोकास मुक्त केशांस
या उत्सवप्रसंगीं उचित अशा तू न दीन वेषास १६७
रक्ष कुलरवि येई उदयनगीं जाय दूर दु:खनिशा
होय उषा हर्षकरी असती कां तू अजून शोकवशा ? १६८
हा मेघनाद पाही बाही कोदण्ड भीम बाण करी
तत्कार्मुकध्वनीतें परिसुनि मघवा मनांत भीति वरी १६९
धन्य दशानन राजा ! धन्या मंदोदरी महाराणी !
तू वीरपुत्रधात्री लंके तुज कोण कवि न वाखाणी ? " १७०
भाट असें जों वदती रणवाद्यें वाजवी असुरसेना

---

१ हत्ती २ इंद्र ३ एक प्रकारचा यज्ञ हा केल्यानें इंद्रजित् अजिंक्य होईल असा ब्रम्हदेवानें त्यास वर दिला होता.

कोंदे 'जय जय' शद्धें लंका अवकाश अल्प गवसेना। १७१
अभिषेक सर्ग पहिला मधुसूदनदत्तवंगकविरत्नें
रचिला, रूप मराठी त्यास दिलें माधवानुजें यत्नें १७२

माधवानुज.

---

## "माझें ठेवुनि चित्त घे."

### श्लोक.

"माझें धाडुनि चित्त दे" लिहुनि हें मीं धाडिलें कां तुला ?
आतां हा अनुताप दुःसह असा जाळीतसे गे मला !
तूं कांहीं मजपासुनी हृदय हें मागून नेलें नसे;
गेलें ते तुजमागुनी, तर तुझा अन्याय का हा असे ? १
गेलें तें तुजमागुनी, सहृदये ! येऊं दिलें तूं तया;
हा तूझा उपकार मी विसरुनी जावें न मानावया;
तें राहून दुरी, स्वकीय मजला देसी न तूं चित्त तें,
हा मानून विषाद मी चुकुनिया गेलों भ्रमाच्या पथें. २
चित्ताचा तव लाभ यास घडुनी येणार नाहीं जरी,
पायापासुनि तूझिया चळुनिया जाणार नाहीं तरी
माझें चित्त दुरी, असून पुरतें हें ठाउकें गे मला,
"माझें धाडुनि चित्त दे" ह्मणुनि मीं कैसें लिहावें तुला ? ३
झाली चूक खरी; परन्तु सदये ! मातें क्षमा तूं करीं !
मच्चित्तावरतीं यथेष्ट कर गे स्वामित्व तूं सुन्दरी !
अव्हेरून मदीय चित्त परतें देऊं नको लावुन,
माझें ठेवुनि चित्त घे !—मग जगीं धन्यत्व मी मानिन ! ४

केशवसुत.

# काव्यरत्नावलि.

अंक १० वा.

## मेघनादवधकाव्य.

### सर्ग २ रा.

आर्या.

जाय लयाला सविता निजतेजें विश्व सर्व भासविता
त्रासविता कुमुदांतें नलिनींतें स्वोदयें विकासविता १
संध्यासमय जहाला गेल्या गाई गृहास हंबरत
गात मनोहर गाना खग निजनीडांस[2] चालले परत २
घेउनि तारामंडळ आला गगनीं मृगांक उदयाला
परिमलपूरित मारुत लागे स्वच्छंद गीत गायाला ३
ज्योत्स्ना प्रसन्न झाली सर्गे निद्रेस घेउनी आली
आली[3] श्रांत जनांची सेवुनि जीतें धरा सुखी न्हाली ४
घेउनि शचीस सर्गे बसला होता सभेंत देवपति
शोभे छत्र शिरावर ढाळिति चामर मुखावरी युवती ५
नंदनवनकुसुमींचा परिमळ घेऊनि पातला पवन
वाद्यें वाजवि करिती इन्द्राचें रागरागिणीं स्तवन ६
रंभा सुचित्रलेखा हास्यमुखी उर्वशी उषा आल्या
आरंभुनि नृत्यातें अमरमना त्वरित मोहित्या झाल्या ७

१ गेल्या नवव्या अंकांत ह्या काव्याचा पहिला सर्ग आलेला आहे.
२ घरटें. ३ सखी.

पात्रें सुधारसाचीं भरुनी गंधर्व आणिती नाना
कोणी कुंकुम केशर चंदन कोणी सुदिव्य कुसुमाना ८
स्वर्गी सर्व सुराच्या असतां वासव सुखांत त्या काळीं
उजळीत दिव्य लोका निजतेजें असुरदेवता आली ९
उठुनी नमी रमेच्या चरणातें सभ्रमें शचीकांत
आशीर्वादुनि पद्मा त्यास ह्मणे परिस मद्वचा शांत १०
" झाले बहु दिन करिलें प्रेमें लंकापुरींत मी वास
पूजी मला दशानन भावें तैसा न अन्य देवांस ११
दुश्चरितें निज आला दुर्दैवाचा तयावरी घाला
झाला हताश भूपति नच मातें सोडवे परी त्याला १२
होते विक्रमशाली अगणित लंकापुरींत वीरगडी
उरला एकचि त्यातुनि अन्यांतें क्रूर काळ तो रगडी १३
देवेन्द्रा ! तुज ठावा दशमुखसुत मेघनाद वीर कसा
लावील समरीं तो रामाचा सत्य सर्व धीर कसा १४
सेनानायक होउनि जाय जरी राजपुत्र कृतयज्ञ
होइल अजेय समरीं ऐसें वदतात सर्वही सुज्ञ १५
काय करूं गति न सुचे हरहर पडणार संकटीं राम "
वदुनि असें स्तब्ध बसे केशवकांता समृद्धिचें धाम १६
शक्र ह्मणे " गे माते रामातें संकटांत शंकर तो
आहे क्षम रक्षाया, समरीं श्रीराम वीतशंक रतो १७
जें वज्र वृत्रहननीं पटु त्यातें परतवी निजास्त्रबलें
अग्निवरें सर्वजयी रावणसुत देवही तया उबले १८
द्यावी आज्ञा मजला जातों मी शीघ्र दिव्य कैलासीं
प्रार्थुनि उमावरातें येतों रामास घेउनी आशी " १९

१ रक्षःकुल--राजलक्ष्मी २ त्रासले. ३ आशीर्वाद

देवी ह्मणे त्वरें जा वद करुनी चंद्रशेखरा नमन
" भार न साहे बाहे चिंतेतें शेष होय खिन्न मन २०
झाला मत्त दशानन गेली त्रासूनि सर्वही धरणी
जाइल रसा[1] तळातें जरि यातें जिंकिलें कुणी न रणीं " २१
वदुनि असें देवेन्द्रा होय अधोगामिनी रमा देवी
निजतेजें पथ उजळी विमलजला हेमपुत्तली जेवि २२
रथ येता मधुर वचें वदला वासव शचीकडे वळुनी
" चल काते मत्संगें तुजविण गे सौख्य जाय मावळुनी २३
मारुत परिमलपूरित येता त्या कोण रसिक ना याची
शोभा खरी दुणावे कमळाच्या संगमें मृणालाची " २४
प्रियकर निजरमणाची परिसुनि वाणी पुलोमजा हसली
तत्करपीडन करुनी प्रेमें यानांत जाउनी बसली २५
येतां गगनपथातुनि खालीं वासवविमान तें वेगें
भानूदयभ्रमानें निद्रित जग जाहलें त्वरें जागें २६
झाली प्रभात मानुनि संगीतातें समस्त खग गाती
लज्जाशीला युवती सोडुनि शय्या स्वकार्यरत होती २७
मानससरोवराच्या सन्निध शोभे सुदिव्य कैलास
वर्णें सुनील, त्यावर करिती शिवपार्वती सदा वास २८
येतां कैलासातें उतरुनिया दंपती रथाखालीं
पूजी पद दुर्गेचे पाहुनि त्यां अंबिका मनीं धाली २९
कर जोडुनि इन्द्र वदे " देवद्रोही प्रमत्त लंकेश
माते तुजला ठावा हृदयीं त्याच्या वसे न नय लेश ३०
धाडी फिरुनि रणा तो सेनापतिपद सुतास देऊन

---

१ पृथिवी.

वदली स्वर्गीं ऐसें रक्षःकुलदेवताच येऊन ३१
रघुकुलभूषण राघव देवप्रिय वीर तो करील रण
भगवति तव चरणाविण अन्य तयाला जगीं नसे शरण " ३२
कात्यायनी[1] वदे तैं " शैवकुलोत्तम नैकषेय[2] असे
प्रियकर भक्त शिवाचा कोणी त्या जिंकण्यास शक्त नसे " ३३
" करितो अधर्म हरितो अरि देवांचा सदा दरिद्रधन
पामर पात्र कृपेनें केंवि तुझ्या उचित त्या ह्मणा निधन ३४
सत्यप्रतिज्ञ राघव जनकाज्ञापालनव्रता धरुनी
सोडुनि भोग सुखाचे सर्वहि गेला सदार घोरवनीं ३५
दुष्टें नेली कपटें भार्या त्याची पतिव्रता हरुनी
भडके कोपाग्नीची ज्वाला हृदयीं प्रसंग तो स्मरुनी ३६
निजनाथदत्तचित्ता रात्रंदिन रडतसे अशोकवनीं
पाहुनि वैदेहीच्या दुःखा पाषाणही द्रवेल ह्मणी ३७
हरवरमत्त निशाचर परधनपरदारलोभनीं सक्त
देवास तुच्छ मानी शिव त्यावर केविं होय अनुरक्त ३८
हांसुनि वदे मृडानी विनवितसां उभयतां तुह्मी मातें
लंकाध्वंस कराया, शक्त परी मी नसें करायातें ३९
नाहीं समर्थ कोणी लंकेशा त्रिभुवनांत माराया
योगीं मग्न सदाशिव होउनि बसला तयास ताराया ४०
शृंग भयंकर नामें योगासन, रुद्र त्यावरी राहे
तेथें उडून जाया पक्षीन्द्रहि गरुड भीतितें वाहे " ४१
वदला फिरुनि वासव जगदंबे तूंच रक्षि आह्मातें
शरणागतास करुणा वितर तुला विनवि दास हा मातें ! ४२

---

१ पार्वती. २ रावण.

परिसुनि वच इन्द्राचें दुर्गा शिवमोहिनी मनीं द्रवली
भेटूं कशी शिवातें चिंता चित्तास ही तिच्या शिवली ४३
इतुक्यांत सुरभिगंधें गेला भरुनी समस्त कैलास
शंखांचा घण्टांचा वाद्यांचा चालला महा घोष ४४
प्रश्न करी विजयेतें हैमवती[1] करुनि नाद तो श्रवण
पूजी मला अकालीं सखये मद्भक्त कासया कवण ४५
हांसुनि विजया बोले " भगवति तुज राम पूजतो भावें
देउनि अभय तयाला भक्ता निज संकटांत तारावें " ४६
सांगुनि सत्काराया विजयेतें दंपतीस जाय सती
ध्यानाच्या मार्गानें होती जेथें विलासमग्न रति ४७
असतां करीत कुंजीं स्वच्छंदानें स्मरप्रिया केलि[2]
इच्छा प्रबल सतीची तेथें वायुस्वरूपिणी गेली ४८
नाचे हृदय रतीचें वल्ली नाचे जशी मरुत्स्पर्शें
जाउनि कैलासातें दुर्गेच्या ती नमी पदा हर्षें ४९
गौरी ह्मणे तियेला कैशी त्र्यंबकसमाधि भेदावी
न सुचे उपाय मातें चतुरे त्वां युक्ति गे निवेदावी ५०
त्वां रूप मोहिनीचें घेउनि जावें महेश्वरापाशीं
शृंगाराया तनुला आभरणीं निपुण ही असे दासी ५१
वदुनी असें, सुवासित तैलें रति रम्य कुंतलां न्हाणी
आणुनि सुमनें सुंदर गुंफी सतिची मनोहरा वेणी ५२
नयनीं कज्जल घाली कुंकुम भालीं सुकस्तुरी लावी
केशर चंदन अंगीं रत्नाभरणें कितीक बोलावीं ५३
लाक्षारसें पदातें रंगवुनी करुनि वस्त्र परिधान

१ पार्वती. २ क्रीडा.

गौरी होय शिवाचें भग करायास सज्ज अवधान ५४
बसला होतां त्र्यंबक डोळे मिटुनी समाधि लावून
योगासनीं अपर्णा गेली सर्गे स्मरास घेऊन ५५
आज्ञापितां शिवेनें मकरध्वज सत्वरीं कुसुमबाणीं
योगस्थ स्थाणूतें हाणी तैं कापला उरगपाणि ५६
हाले जटा शिरींची भालींचा वान्हि दीप्त हो फार
होउनि भयभीत शिरे दुर्गावक्ष स्थलांतरीं मार ५७
नयनोन्मीलन करितां अंबेचें मुग्ध रूप पाहून
पशुपति मोहित झाला योग लयाला क्षणात जाऊन ५८
" एकाकिनी सखे तूं कां या विजनस्थलास आलीस
कोठें मृगेन्द्र विजया रंगीं कां मग्न सांग झालीस ५९
बोले स्मित करुनि उमा " योगीन्द्रा दिवस फार हो झाले
पाहुनि चरणसरोजा नाथा मी ह्मणुनि दर्शना आलें " ६०
परिसुनि वचन सतीचें शंकर अजिनासनीं तिला बसवी
प्रेमळ पतिपत्नींचा संगम हृदयीं तदा नवा रस वी ६१
पुष्पें विकसित झालीं भृंग करायास येति मधुपान
वाहे मलयसमीरण कोकिल मधुर स्वरें करी गान ६२
वक्षीं लपुनि उमेच्या मनसिज सोडी शिवावरी बाण
प्रेमें मत्त पिनाकी गेला विसरून सर्वही भान ६३
लज्जावेपें येउनि राहू चंद्रा करी प्रभाहीन
हांसुनि मनीं जहाला क्षणभर भस्मीं विभावसू लीन ६४
बोले शिव मग " सखये कळला तव भाव गे खरा मातें

---

१ पार्वती. २ मदन. ३ शंकर. ४ शंकर मदनमुग्ध झालेला पाहून ललाटींचा चंद्रमा शरम पावला.

आला कैलासातें वासव रक्षावयास रामातें ६५
निकषानंदन माझा भक्त प्रियकर परंतु दुष्टमति
बुडतो निजकर्मगुणें रोधाया शक्त कोण दैवगति " ६६
मदनमुखें शक्रा तो सांगुनि मायानिकेतना जाय
बोले " तिच्या प्रसादें क्षम लक्ष्मण मेघनाद जिंकाया " ६७
सोडुनि हृदय उमेचें स्मर गेला जेविं जाय विहगेश
वेगानें कैलासा इन्द्रा सांगावयास संदेश ६८
रति पतिविरहव्याकुळ होती द्वारीं उभी अधोवदन
गाळित अश्रुजलातें तों तेथें जाय मधुसखा मदन ६९
पुशिले अश्रु करांहीं प्रेमें आलिंगुनी स्मरें रमणी
हिमकण कमळदळींचे प्रात कालीं जसे करें द्युमणि ७०
" चिंता करिता करिता व्याकुल हे जाहले मम प्राण
प्राणेश्वरा त्वरेनें भेटुनि मजला दिले चुडे दान ७१
धडधड हृदय उडे हें ऐकिलिया नाम वामदेवाचें
वाचे वदवे न मला पूर्वींचा तो प्रसंग मन काचे " ७२
हांसुनि मनसिज वदला " नाम शिवाचें वृथा तुला भिववी
तपतां तपन व्योमीं छाया पांथास काय ना निववी " ७३
देउनि अभय सखीला दुर्गेचा दूत झडकरी मार
गेला जेथें होता विजयेचा इन्द्र घेत सत्कार ७४
परिसुनि शिवसंदेशा काममुखें जाय राय देवांचा

---

१ रावण. २ शंकर. ३ सूर्य. ४ शंकराचें. ५ छाया जशी सूर्य प्रखर असला तरी पांथास त्रास होऊं देत नाहीं तसा शंकर जरी उग्र रूप असला तरी मी पार्वतीच्या सान्निध्याला आहे तेव्हां त्याच्या उग्रतेपासून मला भय नाहीं असा मदनाच्या बोलण्यांतील भाव.

स्वर्थी मायानिलया वदुनि पाया तिच्या वदे वाचा ७५
रुद्रादेशें आलों शक्र वदे भगवती तुझ्या सदनीं
रामानुजास देई वर घननादास जिंकण्या कदनीं ७६
" अस्त्रें शिवें स्वतेजें निर्मियलीं तारकास माराया
देतें मी तीं होतिल समरीं क्षम लक्ष्मणास ताराया ७७
पाहे सुवर्णमंडित बा ! देवेन्द्रा ! अभेद्य ही ढाल
साक्षात् विद्युत्सन्निभ बघ ही झळके कराल करवाल ७८
तूणीर पूर्ण बाणीं जैसा पाताललोक नागाहीं
घेई धनु हें जाई नेउनि रामानुजा त्वरें देई ७९
जाईन मी स्वयेंही रक्षाया लक्ष्मणा विपत्ग्रस्त
होइल लंकेशाच्या सुतनिधनें भाग्यभानुचा अस्त ८०
घेउनि अस्त्रें स्वर्गा इन्द्राणीकान्त सत्वरीं आला
पाचारुनि चित्ररथा हर्षभरें वचन बोलता झाला ८१
दे हीं गंधर्ववरा ! अस्त्रें नेऊनि रामरायातें
याहीं समर्थ होइल निजरिपुचा नाश तो करायातें ८२
जा सांग राघवातें " विजयश्री घालणार तुज माळ
वाहू नकोस चिंता साक्षात् दुर्गा करील सांभाळ " ८३
गेला चित्ररथी मग अस्त्रें घेऊनि मर्त्यलोकाला
पाहुनि त्या दिव्यनरा भावें रघुवीर वंदिता झाला ८४
देउनि आसन पूजुनि पाद्यें अर्घ्यें तया पुसे राम
" नाम तुझें काय तरी भूलोकीं काय नरवरा ! काम " ८५
" अनुचर देवेन्द्राचा गंधर्वांचा समस्त मी स्वामी
तत्पर तत्सेवेतें जैसा तैसा नसें निज स्वामी ८६
चित्ररथी मज ह्मणती अस्त्रें देऊनि धाडिलें अमरीं
झाली प्रसन्न तुजवर दुर्गा रक्षील ती तुला समरीं " ८७

" ऐकुनि हें राय वदे हर्षसमुद्रीं बुडून मी जईं
गंधर्ववंशदीपा ! कैसा होऊं कळे न उतराई " ८८
इंद्रियदमन करावें सत्य वदावें नयेंच वागावें
निर्धनदु:ख हरावें भावें प्रभुतें अहर्निशीं ध्यावें ८९
बोधुनि रामा देउनि अस्त्रें स्वर्गास चित्ररथ परते
भावें सदाशिवाच्या चरणीं श्रीरामचंद्रभूप रते ९०
हा अस्त्रलाभ नामें रचिला सर्ग द्वितीय कविरत्नें[1]
वंगीं, रूप मराठी त्यास दिलें माधवानुजें यत्नें ९१

माधवानुज.

---

## श्रीसुदामदेवचरित्र.[2]

### सर्ग ४ था.

### ( दारिद्र्यवर्णन )

श्लोक.

गुरुगृहिं निज--विद्या संपवोनी, यशाला
मिळवुनि सदनातें जो शिशु प्राप्त झाला
क्षण तरि पितयाचा राहि कां हर्ष--सिंधु
अतिशयित निवान्त प्रेक्षुनी त--न्मुखें--दु १
जनक--चरणिं अर्पी तो निजा मस्तकातें
जनकहि निज अश्रू ढाळुनी सिंचि त्यातें
जणु कारे अभिषेका द्यावया त्या कुमारा
परिणत--वय होतां सर्व--संसार--भारा २

---

१ मधुसूदन कवीनें. २ या काव्याचा तिसरा सर्ग आठव्या अंकांत आलेला आहे.

मिळवुनि गुण--खाणी कन्यका कांत--वर्णा
उजवित बहु--हर्षे त्या सुता लब्ध--वर्णा
वदति जन सदा या आश्रमातें द्वितीय
परि उपकृति--शीला मार्ग हा अ -द्वितीय ३

ढकलुनि भव--सिंधू--माजि ससार--तारूं
निज तनय--वधूसें पावण्या पैल--पारू
अवसित--गृह--कार्ये प्राप्त झाला वनाला
परम--पद--जिगीषा--ध्यास ठेवी मनाला ४

जरि सकल पडे तो भार माथीं, सुदामा
तरि नच कधिं सोडी पद्धती आत्म वामा
दिन--रजनिं न सोडी पुण्यशा कृष्ण नामा
स्मर--हर--सम भासे तो रिपुक्रूर कामा ५

क्षण--भरि न त्रिकारा स्थान ऐशा वनां--तीं
वसुनि किति तरी ते ब्रह्म हो मेळवीनी !
जगतिं खचित धन्य ब्रह्म लाभे जयाला
भविं; ह्मणुनि सुदामें सर्व--ससार केला ६

गुरु--सदनिं करोनी वास, फेडी ऋणाला
सकल ऋषि--वरांच्या, तेवि ती याग--माला
करुनि, अनृ--ण झाला सर्वथा तो सुदामा
निखिल--सुर--गणाचा, सेवुनी कृष्ण--नामा ७

पितृ--गण सुखवाया आश्रमाते द्वितीया
धरि, करि दिन--रातीं वर्तना माननीया
जरि जन पथ ऐसा स्वी--करीती कशाला
स्व--वसति मग लागे धुडणें त्या यशाला ८

प्रिय--युवतिंत झालें देखुनी आत्म--जन्म
परम मनिं सुदामें मानियेलें न शर्म
प्रिय न सुहृद, दुःख--प्राप्ति ना अ-प्रियानें
सम-धि मन-तुरगा आकळीलें जयानें ९

कधि न सु-पथ सोडी पाप-भीती धरी तो
भजत मधु-रिपूते आपदातें हरी जो
परि बहुत दरिद्री जाहला तो सुदामा
हरिल बत विधीची कोण तो दृष्टि वामा ? १०

परि सु--सह--चरी त्या प्राप्त झाली सु--दैवें
निरखुनि तिज सीता नाम कैसें न यावें ?
जरि सम वर--कांता--रूप--चक्रें तरी तो
सुख--कर भव--रूप--स्यंदना--रोह होतो ! ११

उठुनि चरम--यामीं रात्रिच्या तो द्वि--जन्मा
करित स--सुर--पूजा ब्रह्म--कर्मा सु--दामा
मग पर--गृहिं हिंडे आणण्या भैक्ष्य, देवा
कधिं न मनिंहि दूषी जाणुनी पूर्व--ठेवा १२

जरि न मिळत जाया--पुत्र यातें पुरेसें
अशन, तरिहि दामा लागुनी धर्म--कासें
करित, कधिं न सोडी--वैश्वदेवादि धर्मे
अघ हरित घडें जें पंच--सूना--दि--कर्में १३

सतत पति--परा जी त--प्रिया साधु--शीला
प्रथम पति--सुतांसी वाढुनी भोजनाला
दिवस--परिसमाप्तीसाठिं अन्नास ठेवी
मग विभु--पदिं चित्ता अर्पुनी शेष सेवी १४

वसनहि न पुरेसें झाकण्याला शरीरा
गृह बहु--दिवसाचें वारिना शीत धारा
खुडखुडति अहाहा ! तीव्र शीतांत बाळें
क्षुधित बहुत पोटीं ताडिताती कपाळें ! १५

अधिच अशन थोडें त्यात दीर्घा--द्ध येतीं
जननिस लघु बाळें फार तीं त्रास देती
गृहिं कलश मिळे ना ठेवण्या जीवनातें
तृषित बहुत तापें टाकिती जीवनातें ! १६

गळत गृह भिजोनी जाय वर्षा--प्रसंगीं
तळमळ करि माता ती बहू अन्तरंगीं
रजनिसहि मिळे ना कोरडी चीत जागा !
रडति बहुत बाळें भोगिता पाप--भोगा १७

उपजुनि जरि पोटीं कींव कोणी वदान्य
करिल कनक--दाना तें न त्या होय मान्य
वदत उप--कृतीतें घेउनी अन्य--जन्मा
करुनि निज--करें मी हेतु ठेवू द्वि--जन्मा ? १८

जरि गृहि न मिळे त्या अन्न, 'आतिथ्य--धर्मा
कधिंहि न विसरे तो विप्र--राजा सुदामा
न गणुनि निज दु:खा दु:खितां तोषवी तो
प्रभु--वर--गुण वर्णी, सर्वदा नाम गातो १९

नच मिळत तयातें मान कोठें जनात
हसति सकल वृत्ती देखुनीया नितांत
हिणविति जन सारे पाहुनी त्या विपन्न
शिव शिव विपदेसें दुःख कोठें न अन्य ! २०

विप-दतिशय ऐसा भोगितां तो विटे ना
प्रभु--वर--भजनाचा छंद त्याचा सुटे ना
परम--सुख जयातें लक्ष्य केलें तयाला
शिणवितिल न दु खें क्षुद्र विद्व--ज्जनाला २१

परि निरखुनि पुत्रां माय ती हाय बोले
क्षणभरिहि पडे ना चैन त्या लोक-बोलें
अठवलि तव तीतें एक युक्ती सु--रम्या
मग पति विनवाया चालली सर्व--नम्या २२

हळुचि अवनता--गी पातली भर्तृ--ठाया
वदत करितसे ही प्रार्थना एक पाया
जरि सु--कर करावी मान्य गा प्राण--नाथा
सपदि तुहि हरावें दुःख हें घोर काता ! २३

सतत कथितसां कीं कृष्ण दुर्जात--बंधु
वसत धनसुताहीं युक्त कारुण्य--सिंधु
बहुत दिवस झाले पाहुनी त्यास कांता !
तरि निज सु--हृदातें भेटण्या जाच आतां २४

स्मरत मनिं चुकोनी जो तया देत नाकां
उरविळ तुमच्या तो भेटता यातना कां ?
तरि करुनि दयाळा निश्चयातें निघावें
निज--सख गुरु--बंधू भेटुनी त्यास यावें २५

परिसुनि विनतीतें हर्षला तो सुदामा
वदत ' निघु पहाटें जावया बन्धु--धामा
परि नच मजपाशीं द्यावया त्या अहाहा !
श्रुति वदति न बन्धू रिक्त--हस्तें पहावा. २६

मग सदनिं फिरोनी चार आणी सु--शीला
पृथुक, परि मिळे ना बांधण्या वस्त्र त्याला
मग मिळवुनि चैला त्यांत घालोनि पोहे
वदत पतिस कान्ता कीं ' सख्यालागिं द्या हे ' २७

झडकरि उठुनी प्रभातिं दामा । स्मरुनि हृदीं प्रभु--राज--पूज्य नामा
पृथुकहि करिं अर्पुनी द्विजाती । निघत पुरी मग लक्षुनी तदा ती २८
औत्सुक्यानें मार्ग तो अल्प झाला । थोड्या कालीं द्वारकेपाशिं आला
तों तो देखे पत्तनातें विशाला । जाणों स्वर्ग स्थान सोडोनि आला २९

गणेश--सुत गुणे.

## कवीस पत्र.

श्लोक.

आत्मश्रिया राजित तू कवे ! कीं, । तू मान्य ईशा सदसद्विवेकीं,
साष्टांग माझी नति तूज थाहे, । विनति थोडी परिसावि वा हे.-- १
मजशिं तुल्य तुझी स्थिति हे खरी, । ह्मणुनि ही प्रकटे मम वैखरी.
समसुखासुख जो भुवनीं दिसे, । हृदय त्याजकडे उडि घेतसे. २
उपवनें पवनें डुलती यदा, । सुनवपल्लवल्लरि तोपदा,
स्मितयुता सुमिता सु--मितान्तरा । युवतिशा युवरजनतत्परा, ३
नटुनि वृक्षलता रुचिराकृति । करिति जै मधुमाधवसत्कृति,
भुवनलक्ष्मि मनोरम वेष घे, । प्रियविलाससुखार्थ मुदें निघे, ४
रिझविण्या तिज गायन मी करीं, । तवहि तें स्फुरते वर वैखरी.
कवण अन्य रमे हृदयंगमीं । भुवनकांतिवसंतसमागमीं ? ५
मज रुचे तरुचे कुसुमाकुलें । सरसपक्कफलीं सुघनीं दलीं
विहरणें, हरणें श्रमसतति । मधुनि सेवुनि पक्कफलांप्रती. ६

वनिं जिथे तरुची घन सावली । मति तिथे मम जाण विसावली.
वनविहार यथेच्छ खुल्या मनें । दिधलि वृत्ति मला करुणाघनें. ७
भुवनिं सचरुनी फिरतों सुखें । सुगुण गात जगत्प्रभुचे मुखें.
प्रिय मला वनवृत्तिच कष्टदा । न नृपसद्मि खुशामत इष्टदा. ८
रविकरास रिघाव जिथे नसे, । स्मृतिहि ज्याचि महाभय देतसे,
झटुनि हिंडुनि धुडि अशा वना । मजपरी तव केवळ कल्पना. ९
उडुनि उच्च अतीच नभोंगणीं । सुरविमानपथा जधि मी गणीं,
न जनदृष्टि टिके, झणि हार घे; । परि तुझी प्रतिभा पुढती रिघे. १०
भुवन सर्व मला दिसतें तदा, । तुजहि तें प्रतिभागत सर्वदा.
सकल विश्व असे गृह आमुतें । फिरुनि घेउ सुखें अनिरुद्धतें. ११
गिरिदरींत अगाध जलोदरीं, । गगनकंदरिं, वा सुरमंदिरीं,
जनमनें नमनें करिती जिथे, । शिरुनि गूढ करू उघडें तिथे. १२
भुवनिं भव्य उदात्त सुरम्य जें । तुज मलाहि रुचे, न रुचे दुजें.
न परवा परवाक्शरताडनीं, । स्वसुखतुष्ट अशी वसु काननीं. १३
मधुर वाणि अशा दिलि ईश्वरें । जनमनें रमण्यास्तव, हें खरें.
धनमदें नच ऐकति ते जरी । बधिर आपण त्या समजू तरी. १४
भवनवैभवसभ्रम वानिती, । भुवनवैभव हें अवमानिती !
शिशु करस्थसितोपलकाहुनी । अधिक रम्य हिरा न गणी मनीं ! १५
सुरसवाग्रससेवनि ज्या नरा । न रुचि, तोच सुके सुखसागरा.
मदयुता दयिता जरि ये रतों, । न रमतो नर पुंस्त्वविहीन तो. १६
न पुसती जन हे तुजला कवे, । न धनिकांपुढती तुज ठाकवे,
तरि विषाद नको करुं मानसीं; । सकलसृष्टिमनोगत जाणसी. १७
नृप करी अधिकार जनावरी, । तव कवे विभुता सचराचरीं,
तुरिं दयत्सरिता नग बोलती, । अणखि उन्नति कोणति ? बोल ती. १८
जन सुखासुख सेवुत पाळिनें, । सुखचि ठेवियलें तुज सृष्टिनें.

त्रिभत्र दे नव ज्या नव कल्पना, । कुठुन खेद शिवेल तया मना ? १९
दिधलि, ज्या, प्रतिभा, जगदीश्वरें । सुरस आळवि त्यासच सुस्वरें.
अमति मी बहु काय लिहू तुसी ? । विहगिं लोभ असो, विनती असी. २०

विहगम.

---

# ॐ ब्रह्म.

श्लोक.

येतां मेघ नभांत वासरमणी तो झाकला जातसे,
होतें गोचर नीर तें न नयनां येतां वरी शैवल,
सेवी दर्पण बिंब तें न हृदयीं होता मळें ज्यात तो,
दृष्टीनें न दिसे जरी पडळ तें ये लोचनाच्यावरी; १

जाई झांकुनि अग्नि उज्ज्वल अती धूमें जरी वेष्टिला,
रत्नाचें पडतें न तेज जरि तें वस्त्रांत बान्धीयलें,
उल्बें वेष्टित राहतो निशिदिनीं गर्भाशयीं गर्भ तो,
जाती झाकुनि सर्व अस्थि तनुच्या जैशा त्वचेच्यामुळें २

गेलें झाकुनि त्यापरी जगतिं या तें ब्रह्म मायेमुळें,
व्हावें ब्रह्म मना! तुला, तरि असे हा मार्ग तूतें खुला;
मायाबन्धन तोड हे, नच पुढें राही अतां त्यामधें,
जें जें या जगतीं तयातिल तुझी आसक्ति घे काढुनी.
अभ्यासें तुज साध्य हें, वदति ते ज्ञानी पुराणान्तरीं
ब्रह्मप्राप्ति—नव्हे स्वयं—मग मना!—होशील ॐ ब्रह्म तूं! ३

—— नरहर शंकर रहाळकर बी. ए.

# काव्यरत्नावलि.

अंक ११ वा

## श्रीसुदामदेवचरित्र*

### सर्ग ५ वा

( द्वारकावर्णन. )

श्लोक.

देखूनीया कनक–मय तो वप्र आ–पीत–वर्ण
त्याची छाया पडुनि सलिलीं अभ भासे सुवर्ण
वाटे झाला उदय रविचा पश्चिमीं दिग्विभागीं
प्रातःकालीं म्हणुनि जल हें रंगलेसें सु–रंगीं १

किंवा पूर्वी मथन करितां सिंधु, जेवी निघाली
लक्ष्मी–देवी कनक–रुचिरा; तेवि हे आजि झाली
अर्धे व्यक्ता उपरि, सलिलीं अर्ध भासे उभी ती
व्यक्त–च्छायीं निरखुनि जलीं द्वारका हेम–कांति २

किंवा ऊर्वी मथन करितां ऊरु, जो प्राप्त झाला
और्वा–ग्नी; तो वसतिस निजा पश्चिमा–ब्धींत आला.
फेकी ज्वाला कनक--निकष--स्निग्ध अभावरी तो
ऐसें भासे निरखुनि तट द्वारकेचा महा तो ३

* या काव्याचा चवथा सर्ग १० व्या अंकात आला आहे.
१ तट. २ दिशेस. ३ प्रतिबिंब. ४ उरू मुनीचा वंश चिरकाल रहावा म्हणून देवांनीं त्याची पुत्रोत्पादनार्थ प्रार्थना केली. " आपण पुत्र

एका स्तभावरि निरखुनी द्वारका--पत्तन तें
वाटे हेमा--बुजचि सलिलीं वाढलेसें मनातें
शोभे भारी नलिन रुचिर स्तभ--रूपी जयाला
प्रासादाचे शिखर--गण ही पत्र--पक्ती तयाला ४

ऐशी रम्या निरखुनि पुरी विस्मया--विष्ट झाला
दामा चित्तीं, स्थिति निज तदा आठवे ना तयाला
दृष्टी सारी पुरिवरि, तसें स्वांतही शून्य त्याचें,
पायीं मार्ग क्रमित, वदनें गात नाम प्रभूचें. ५

ऐसा मार्ग क्रमुनि पुरिच्या तो तटापाशि आला
द्वारालागीं निरखुनि हृदीं विस्मया--विष्ट झाला
वाटे त्यातें खचित नगरी--लक्ष्मिचें तें विशाल
पुण्या--लीचें फल--तट -भुजातील भव्या--तराल ! ६

त्यामाजी तो निरखित मुखा मानवांच्या रिघाला
रथ्या--कीर्णा नगरिस तदा देखता तेथ झाला
गेला भावावुनि निरखुनी सौध--पंक्ती विशाला
कोठें जावें प्रभुसि बघण्या हें सुचेना तयाला ! ७

' कोणालागीं पुसुं पथ ! कसा तो सखा कृष्ण मातें
भेटावा या पुरित न कळे ! व्यर्थ हा व्यर्थ होतें

---

लत्न करूं, पण तो जगाचें भक्षण करील " असें सागून उरू मुनीनें अयोनिजपुत्रप्राप्तीकरितां आपल्या उरूचें ( मांडीचें ) मथन केलें. लागलीच एक ज्वालामय पुरुष उत्पन्न होऊन खावयास मागूं लागला. त्यानें जगाचा नाशच केला असता प तु ब्रह्मदेवानें त्यास समुद्रात राहून पाण्यावर निर्वाह करण्यास आज्ञा केली ( हरिवंश ) १ सुंदर. २ जीत जिकडे तिकडे सडका पसरल्या आहेत अशी.

घेणें माझें गमत मजला ! काय आतां करावें !
विस्तीर्णा या नगरिंत किती व्यर्थ आतां भ्रमावें ! ८

आहे मोठा पथ मजपुढें याच वाटें फिरावें
दैवानें तो प्रभु--वर कुठें भेटल्यासी पहावें !'
ऐसा हेतू धरुनि हृदयीं चालला विप्र मार्गें
तों त्यालागीं बहुविध अशी सृष्टि वाटेंत लागे ! ९

एकामाजीं ललित--ललना, वहुरी अन्य--ठाया,
एकालागीं कळस, शिखरें शोभती अन्य--काया,
ऐशा रीतीं नगसम तिथें सौध देखूनि उच्च
याथार्थ्यानें नगर गमते ती पुरी भव्य साच १०

त्या सौधांच्या वलभि खचिल्या स्वच्छशा चंद्र--कांतीं
चंद्रा--स्त्राहीं स्त्रवत जल जो पावुनाया द्रवातें
तेणें रात्रीं नाभ जल--भरा ठाव कोठें नसोनी
वाहे वारी स्फटिकसम तें त--त्प्रणाली मधूनी ११

तेथें कामी रजनिस रति--श्रांत होवोनि, जाया
घेवूनीया पहुडति जलीं खेद तो घालवाया
कांता--श्वासें चल, विधु जयामाजि तो बिंबलासे
ऐसें पीती मधु विशद जें भासतें चंद्र--हासें १२

श्यामाशारी मरकत--मणि--प्रोत भित्ती विशाला
मार्जारांचे नयन गमती ते मणी लोचनाला
होवूनीया भय--चकित त्या देखुनी अंधकारीं
सारा कांतावरिल करिती कोपही दूर नारी ! १३

---

१ गच्ची.

त्या प्रासादीं मलय--ज--समुद्भूत--धूमास केकी
सेवी हर्षे मग जग रवें व्यापुनी सर्व टाकी
तेणें सर्पी--वलि गळुनिया चंदना मुक्ति होई !
केकीचेंही ऋण फिटुनिया तो सदा मुक्त राही । १४

त्या प्रासादीं दिसति रुचिरा--शोक ते अंगणात
बाला--कांतें स्तविति जणु जे जोडुनी पत्र-हस्त
पाचारीती युवतिसि पदा--घात--योगें हराया
दैन्या, तैसें जनन निज तें पूत पुष्पें कराया १५

तैसे तेथें बकुलहि बहू अंगणीं शोभताती
ज्यातें कांता वदन--मदिरा अर्पुनी तोषवीती
पुष्पांचा तो बहर मग ये, टाकि सर्वी दिशातें
व्यापोनीया निज सुरभिशा हारि--गन्धें प्रभाते १६

कांताक्षांसी चरण--कमला रंग लाक्षा--रसातें
निर्मायासी बहु--विध वपु--भूषणा पल्लवांतें
कांतामार्गे बलभिवरती सेवणाला मधूनी
अर्पी कल्प--द्रुम सकलही एकटाची वधूसी १७

त्यांमाझारीं विलसति तशा वापि वारी जयांचें
झालें सारें कुवलय--रजोधूलिनें छन्न साचें
तेथें नारी उपटुनि करें सुंदरा उत्पलांत,
होवूनीया प्रणय--कुपिता ताडिती कांत हस्तें १८

---

१ चंदनाचा धूम सेविल्यानें चंदनाचा आपणावर झालेला उपकार मयूर हे आपला टाहो फोडून व त्यायोगें चंदनावरील सर्प दूर करून फेडून टाकितात असा अर्थ.

ऐशा सौधां निरखित पथें चालला तो द्वि--जन्मा
झाला भारी श्रम--विकलही धुंडितां कृष्ण--धामा
सारीं नेत्रांसमचि दिसतीं गोपुरें तीं तथातें
गेली आशा प्रिय निज--सुहृ--द्दर्शनाची लयातें १९

देखूनीया निजसम तदा ब्राह्मणा वृद्ध दामा
बोले त्यातें हळुचि विनयें ' जाणतां कृष्ण--धामा ?
सांगा कोठें मजसि वसतो दीन--वात्सल्य--सिंधु. '
शब्दो--च्चारा करित असतां वाहती बाष्प--बिंदु २०

त्या विप्रानें सकल कथितां जाणिलें त्या सुदामें
कीं हीं सारीं दिसति नयनांलागुनी कृष्ण--धामें
केलीं भार्या--सुत--युत तयें सर्वही कृष्ण--नाथें
दुःखाचें त्या नगरित नसे स्वल्प ही नाम कोठें २१

एका सौधामधिं रिघु बघूं कृष्ण तो बाल--मित्र
ज्याची लीला अघटित मना भासते सत्य चित्र !
ऐशा चित्तीं करुनि मग तो निश्चयातें सुदामा
जाता झाला हळुहळु बहि--र्द्वार--देशीं द्विजन्मा २२

देखूनीया हृदिं दचकला द्वार--पाला सुदामा
खालीं दृष्टी करुनि मग तो घेउनी कृष्ण--नामा
भीत त्यातीं झडकरि शिरे आंत पाही फिरोनी
मार्गे झालें क्षुभित हृदयीं काय कोणी ह्मणोनी ! २३

तेथें आज्ञेविण नच शिरे वात ही, मात काय
अन्याची ती ? परि नच कदा विप्र तो दण्ड्य होय !
पक्षः--पातीं सहन करितो य--न्नदा विश्व--तात
त्या भू--देवा छळित नर जो इच्छितो आत्म--घात ! २४

ऐसा दामा अंगणीं त्या रिघाला
अंत--द्वारापाशि ही शीघ्र आला
त्या देखोनी भेटण्या कृष्ण–नाथ
गेहांतूनी धावला अंगणांत १५

पांचवा सर्ग समाप्त.

गणेश--सुत गुणे

---

## कवितेवर कविता.

### ( वाचकास विनति. )

श्लोक.

नाना शास्त्रतरू समाकुल खरे शाखोपशाखाभरें,
नानाकाव्यलतासुमीं रस भरे, आमोद येती बरें,
नाना बुद्धिसरें, तिथून पसरे स्फूर्त्यंबु तें निर्भरें,
नाना संकटि वाग्धरेवरि उरे हें वाङ्मयोद्यान रे. १

उद्यानीं तरु थोर जे जरठही दृष्टी न तेथें रमे,
यालागीं कवितालता कवि नवी लावीतसे संभ्रमें;
शोभा मांगलिका परी न रसिकाश्रयाविना ही धरी;
अन्यायत्त जगीं स्थिती दिसतसे कांताजनाची खरी. २

त्रैलोक्यांत हिला अगोचर असें कांहीं नसे आपुलें;
वेलीनेंच चढे, कुठेंहि न अडे, ही तारकांच्या पुढें;
शाखा व्यापुनि सर्व, भव्य भुवनामाझारि कोंदाटल्या;
शेषाच्याहि अधःस्थळीं पसरुनी हिच्या मुळ्या राहिल्या. ३

बोहें घोर निर्जंल घोरत पडे जैं राष्ट्र निर्घोसें,
तेव्हां त्यां कवितालताच उठवी ही स्वीय जीनें रसें;

ताकीं दर्प शिगोनि इंद्रियगणीं जैं चेतना सचरे,
आवेशें तयि तें क्रमें समुचितोद्योगीं श्रमें वावरे. ४

जें कालोदर भूतभावि लपवी गोष्टी हठें दाविना,
तत्संबंधिकपाटपाटनपटू नाहीं कुणी हीविना,
दावी ही गतवैभवा उघडुनी भावी स्थितीही नवी,
सृष्टीचे अतिगूढ जे नियम ते सांगून उत्तेजवी. ६

वीरांतःकरणीं शिरूनि, मरणीं भीती नुरों दे रणीं;
शौर्याची करणी करूनि, धरणी ते तोपवीती क्षणी.
होती मूढमणी कुटुंबभरणीं गुतूनि जे धारणी,
त्यांवी त्या झुगणी जनोपकरणीं ही टाकुनी भारणी. ६

केव्हां ही रडुनी, कधीं खवळुनी, त्वेषास आणी जनीं;
सत्कार्यार्थ वनीं निवासि करुनी गोडी न दे भोजनीं;
"'प्राणाशा त्यजुनी, रणीं झगडुनी, दुःखें बहू साहुनी,
व्हावें कीर्तिधनी' असें भरि मनीं कर्त्तव्य तें बोधुनी. ७

अज्ञानांधतमीं बुडे सकलही कर्त्तव्यता जेधवां,
ज्ञानाच्या किरणीं प्रकाशित करी दृक्--प्रांत ही तेधवां
तेवां संकटसागरीं जन बुडो लागे कुठेंवे जरी,
ही होवोनि तरी, स्वसाह्य वितरी, तारी तयातें तरी. ८

आलस्या पळवी, हठास मळवी, चित्तसही पोळवी,
खेदानें ढळवी, मदास गळवी, विश्रामही वाळवी,
शौर्या चेतवि, वीर्य पेटवि, मनोधैर्यास सजीववी,
कर्तृत्वा स्फुरवी, यशा प्रकटवी, ही न श्रमा वाटवी. ९

जी अल्पज्ञ अदूरगा मति तशी दृष्टी जनांची असे,
दिक्कालादि उपाधि तोडुनि तिला दीर्घत्व ही देतसे.

आशेच्या शिखरावरून पडतां चित्तास ही सांवरी;
जो जो काम असेल तो पुरविते ही कल्पवल्लीपरी. १०

ज्याना ऐहिक पाहिजे विभव त्या नेई तयाच्या शिरीं;
मोक्षाचा अभिलाष जो धरि तया ही पात्र त्यातें करी;
' रगू दगचि होउनी ' ह्मणति जे रंगेल ' लीलारसी '
आहे सज्ज तयांस हा रिझविण्या कांता महोदारसी. ११

क्रीडाऽऽवेश सवेश आशय बहू लीला कला दावुनी,
चातुर्यें भुलवी मना न कळतां घालूनिया मोहनी;
प्रेमें नर्म करी, भरे नवरसें, हासे, रुसेही कदा,
ऐशी हो सदलंकृता सुकविताकांता सदा तोषदा. १२

मोठे वीर ह्मणोनिया जरि हिला कोणी बळें झोंबती,
पाडिलें अथवा हिला वश करूं कोणी जगी पाहती,
लाज त्या तरि ती नवीन युवती जैशी वडीलाप्रती;
प्रीतीनें करि ती स्वयेंच रसिकापाशीं विलासां सती. १३

देती पर्णरती हिला जन किती आलिंगनातें स्वयें,
लोकीं तो विरळा परी, पुलक ज्या अंगीं धरारून ये;
स्पर्शोनी विभुकातेला न खुलती रत्नें कधीं काचतीं !
त्यांमाजी तरि चन्द्रकांतचि धरी एक द्रवातें अती. १४

बागेमाजि, वनांतरीं, रणशिरीं, किंवा स्मशानांतरीं,
कोडे दुर्गम दुर्गी. वा निजसुखें पातालकुंजोदरीं;
नेघे पाउल आजिनें विचरणी केल्याहि भूपागणीं,
रंकाच्या ह्मणि झोंपड्यात रमते ही स्वैरसंचारिणी. १५

हस्तातें धरुनी नरा त्रिभुवनीं कोठेंहि नेई क्षणीं;
धात्याची पुरनी न सृष्टि, रचुनी ही नूतन आणी ह्मणीं;

दुष्टांचीं कपटें, नयज्ञचरितें, प्रेम प्रियाहृद्गतें,
कार्ये नीचकृतें, महाशयमतें, गुप्तेंहि ही सांगते. १६

माता, बंधु, पिता, क्षणीं शिकविता, स्वामी, सुकांता, सुता,
होई ही बहुरूपिणी, हित कथी प्रेमार्द्रचित्ता नता.
वृद्धाचा करिते युवा, शिशुहि वा, ही जादुवालीपरी;
क्षुत्तृष्णादि दशात्रयादि अवघ्याही देहधर्मा हरी. १७

रत्नें होति यदा सुगंधि सुरुची, इंदू सदा पूर्णसा,
नक्षत्रें दिवसा प्रकाशित, रवी कीं सौम्य अंभोजसा,
पुष्पें म्लानिविहीन, त्याहि तरुणी तारुण्ययुक्ता सदा,
त्यांशीं होइल तुल्य काव्यलतिका चेतोहरा ही तदा. १८

पुष्पें, पल्लव, वल्लरी, नग, नद्या, एणांक, धाराधर,
भृंगे, कोकिल, मोर, हंस, मदिरा, पीयूष, कांताधर,
त्या त्या मोहक भिन्न वस्तु विधि कां निर्मून वायां श्रमे!
त्याहूनी मज थोर एक कविताकर्त्ता कवी हा गमे. १९

गेलें राज्य समस्त, मस्तक लवे. ठेलें असे हस्तकीं,
चिंताग्रस्त उदास राहुनि मिळे हें तों दुरापस्त कीं,
आहे हेंच अभंग एक कवितासाम्राज्य, हे सत्रुनी
दावा स्वत्वरती, तशी रसिकता; कर्त्तव्य घ्या जाणुनी. २०

विहंगम.

---

## इथून कोणीकडे ?

### दिंडी.

दिवस पूर्वीचे शांति शुभ सुखाचे
स्मरुनि, वदनीं ये मोद तेज साचें,

क्षणें लोटे परि लोचनात पाणी,
दिसुनि घडवी जी हानि मृत्यु--पाणी ! १

लांबवोनी निज हस्त यम क्रूर,
नेइ हरुनी मम गोतवळा दूर,
काय त्यची स्थिति ? कोणता निवास ?
गूढगूढाचि हे, ज्ञात न मनुजास. २

तिथें लाभे का अढळ शांत झोंप ?
रोग असती कीं असे स्थिति निकोप ?
व्यसन भेटे कीं पथ मृदु गुलाब ?
अशा शंकांना कोण दे जबाब ? ३

स्वजन गेले ज्या, ज्ञात तो न गात्र;
इंद्रियांची पोंचे न तिथें धाव;
कल्पनाही टेंकीस येइ येथे !
शैल चढतां पंगूस यश न येतें. ४

आत्म बंधूचे स्मरति मला बोल,
ज्यास सेवाया असति कर्ण लोल;
प्रेममुद्रा त्या, शांतिसुखस्पर्श,
रम्य शीत स्मित मूर्त सुधावर्ष. ५

सकळ गेलीं तीं पूर्ण होय लोप,
हाय ! भिनला खर असह विरहरोप.
अतां न कळे काय तत्स्थिती झाली ?
गर्द दिसते पसरली तिमिर जाळी ! ६

व्यर्थ चिंता, प्रश्न हे व्यर्थ सारे;
विचाराचे श्रम विफळ या प्रकारें.

परी माझा विश्वास थोर आहे,
तर्कशास्त्रीं छाणणी जरि न साहे. ७

कारिति निष्ठा आगळी मम उमेद
तीव्रशस्त्रें संदेह तरूच्छेद;
नष्ट होता हीं, सुखकळा विरेल,
असंतोषाची हाय रेलचेल ! ८

जरी, ' मृत्यूनंतर नसे कांहीं ',
असें निश्चित जाहलें विवेकाहीं;
कशाला हा तरि जगद्‌-व्याप सारा ?
विफळ ठरला विकराळ हा पसारा ! ९

कशाला या धादळी उठाठेवी ?
मनुज ईर्षेनें का श्रमास सेवी ?
शुभाशुभ तें राहिलें तरी काय ?
निवळ पोसाव सकळ नरीं काय ! १०

नको घातक ही अशी तर्क-माला,
चक्षुपुढता ती पसरि घन तमाला.
जडे केवळ जडवस्तुविषयवेध,
नरापशुच्यामधिं काय तरी भेद ? ११

दृश्य वस्तु स्थिति मात्र सत्य खाशी,
नाश केवळ विलसतो मृत्युपाशीं;
नको वस्तुतोही, वसे हींत दोष,
चित्त करिते ही मलिन असंतोष १२

असे माझा विश्वास सदृढ साचा,
करी उद्भव जो मनीं सुखरसाचा,

मला आहे अज्ञात जो प्रदेश,
मृत्यु तेथें करणार मत्प्रवेश. १३
सर्व मग मम अज्ञानतम झडेल,
स्वजनसघाशीं गांठही पडेल;
हीच आशा, विश्वास, ही उमेद,
दूर करिती संदेह जन्मखेद. १४

———————— बाळकृष्ण अनंत भिडे बी. ए.

## सकाळ

श्लोक

सकाळची वेळ किती प्रशांत,
उद्यानशोभाहि खुले तशांत;
नानापरी पुष्पसुवास येती,
आनंदवृत्ती उठतात चित्तीं. १

ही वेळ दे निरुपचारसुखास खास
रंका, नृपा, तरुणवृद्धनरस्त्रियास;
सृष्टींतले विषय सर्वहि रम्य होती,
शोभा अशा समयिंची किति वर्णु हो ती २

वारा गार सुमंद येउनि भला लागोनि अंगास हा
सांगे कीं, उठ लौकरी झट सुखें कामा, श्रमांत सहा.
कांता लज्जितशी उजड पळवी निद्रा कुठेंशी दुरी;
शय्या सोडुनिया शरीरहि कशी खाशी हुशारी धरी. १
जागे होऊनि पक्षी किलबिल करिती हर्षुनी अंतरांत,
सृष्टीतें गोड शब्दीं स्तवुनिच जणु कीं जाति हे अंबरांत;

थोडाही काळ वाया दवडिति न कधीं, दाविती कीं जनातें,
आहे सृष्टींत सारें सुखचि, परि नसे साध्य यत्नांविना तें. ४

अंधारा न उरे महीवरि जरा कोठेंहि थारा बरा,
दावी वस्तु भराभरा लपविल्या होऊनिया बावरा;
पाताळीं मग जाउनी लपतसे पाहूनि येतां रवी,
सर्वांतें सुचवी न चोरि बरवी, ही यातना भोगवी. ५

ज्यांनीं हो रात्रीं बहु मिरविलें तेज अपुलें,
अम्हाहूनी नाहीं अधिक कुणि हें चित्तिं गणिलें,
फिके तेची झाले मगण शरमूनी जणु कसे;
न गर्वाला जागा जगिं मुळिं, जनां सांगति असें. ६

होई धूसुर पूर्वभाग पिंवळा हा शेंदरा मागुनी,
आलें भव्य निशाण हें रविरथा जें राहिलें लागुनी;
शेला लाल दिसे असे अरुण हा, शोभे किती त्या रथीं;
आहे पंगु परी रवीस न असा कोणी मिळे सारथी. ७

सुरुचिर पसरे हा केशरी रंग लाल,
महि जणु हिमनाशा पांघरी दिव्य शाल;
दिसति तरुवराग्रीं सुप्रभा चित्तहारी,
नयनविषय सारा होइ आल्हादकारी. ८

ये सूर्या उदयासि तेज पसरीं आभाळिंचा तूं मणी,
विश्वाचा सगळ्या तुझ्याविण दुजा नाहींच कोणी धणी;
प्राणी आणि वनस्पती जगविशी तूं उष्णता देउनी,
येशी, जाशि पुन्हा अशी करपुनी जाऊं हणोनी उनीं. ९

जरी उठवशील नूं विसरुनी न एके दिनीं,
बनेल तरि आंधळी असुनि नेत्र ही मेदिनी;

न लोहतिल अजही खगमृगादिकांच्या तती;
न राहिल खलाचिया कुचरितास कांहीं मिती. १०

पापें समोर तुझिया करण्यास भीती,
रात्रीं ह्मणोनि बहुधा जन आचरीती;
अर्का ! तरी ममहि पातक सर्व जाळीं,
जें जें असेल लिहिलें विधिनें कपाळीं. ११

जो तूं जगा सुखविशी, मज दे सुखाला;
दुर्बुद्धि दुर्गुण समस्तहि ने लयाला;
तेजासमान तुझिया मति दे विशाला;
मी भास्करा ! नमितसें तुझिया पदाला. १२

विहंगम.

---

## वामनाचें स्मारक.

कवीचा वामन नांवाचा मुलगा ईश्वरपरायण होता. त्यास जेवणावर श्लोक ह्मणण्याची फार हौस असे. "गोविंद" हें देवाचें नाव ज्यात येईल असे श्लोक असतील तर बरें, असा आपला हेतू त्यानें कवीस कळविला. आणि ह्मणूनच कवीनें हें एक "गोविंदाष्टक" तयार केलें. परंतु ह्या जगांतील प्रत्येक वस्तूची अशाश्वतता जाणण्यासाठींच की काय अष्टकाची व त्याची गाठ पडण्यापूर्वींच त्यानें परलोकीं प्रयाण केलें ! मग कवीच्या मनाची काय अवस्था झाली असेल ह्याची कल्पना वाचकानींच करावी. कवीनें आपल्या शोकग्रस्त मनाची छाया शेवटच्या श्लोकात "वामनाला" व 'स्वगीता" ह्या श्लिष्ट पदांनीं

ध्वनित केली आहे. जेवतांना "गोविंद" "गोविंद" ह्मणण्याची आपल्यांत एक जुनी चाल आहे. ह्या चालींत शहाणपणा व दूरदृष्टि फार आहे. शिवाय ह्या चालीनें मनोरंजन होऊन सर्व जेवणाराचें लक्ष्य आयतेंच देवाकडे लागतें. ह्या पद्यांत अन्नाचा संबंध आणून शिवाय अलंकार व रसही साधिले आहेत.

श्लोक.

तिर्यग्योनि धरी, बळीस फर्मेती, हिंसा करी सिंहसी,
वेगत्वास वैरी, तसा शिनळ जो वेदांस निंदी पिसी,
म्लेंछा मुक्त करी, रहस्य इतुकें भक्तीमुळें गुंतलो;
पूर्णब्रह्म असा सदा सुखद हो स्वानंद गोविंद तो. १

भिक्षावृत्ति धरी सखा धनद ज्या स्त्री अन्नपूर्णा सती,
चौर्या देवहि गोरसार्थ करितो जो होय गोपीपती,
ऐसें दुर्लभ अन्न गोरसहि तो ज्याच्या प्रभावें पहा
लाभे, तो प्रभुनाममंत्र जपणें 'गोविंद' 'गोविंद' हा. २

गोपेंद्रप्रियपुत्र जो, सततही क्षीराब्धिमाजी वसे,
तृष्णाशांतिस अन्यतत्र हरि तो, ही उक्ति मिथ्या असे;
भक्तातें नच सोडवे ह्मणुनिया त्याच्यामधें नांदतो
जो, कोण्याहि मिषें, वदा मुखि सदा सानंद गोविंद तो. ३

उष्टीं भिल्लिणिचीं फळें कुजलिंही नाकासही वासलीं,
अन्ने गोपहतें शिळीं बुरसलीं, दिव्यें तरी भासलीं,

१ मच्छ, कूर्म, वराह, नृसिंह. २ वामन. ३ परशुराम. ४ राम. ५ कृष्ण ६ बौद्ध. ७ कलकी.

खाण्यालागिं कण्या जुन्या विदुर दे, मिष्टान्न मानून घे;
तो गोविंद सदा वसो मनिं, मुखीं ‘ गोविंद ’ ‘ गोविंद ’ घे. ४

मुष्टी एक जरी वरी पृथु, तरी दे काचनाची पुरी,
वाढी क्षीर पुरी द्विजा, करिं, शिरीं वदून पायां चुरी;
कल्याणार्थ नरा ! निरतर धरीं गोविंदनामीं रती
गा ! झाला प्रतिकूळ काळ तरिही बाधा न बाधेल ती. ५

भक्तें गाइयलें स्वनाम परिसे तेचि जया साकर,
तें गायासि जपे, खपे घरिं सदा होवोनिया चाकर;
पाहारा करितो, गुरें चरवितो, कीं अश्व घासी बरे;
ऐसा थोर यदीय, तन्मुखिं असा गोविंद राहील रे ! ६

प्रल्हाद क्षणमात्र घेउनि मुखीं गोविंदनामाक्षरां,
तातानें दिधल्या विषा जिरवुनी सांगे जनातें गिराः--
ह्या गोविंदसख्या भजा, सुजन हो ! माझी प्रतीती पहा;
हाता येइल इष्ट नित्य जपतां ‘ गोविंद ’ हृत्तापहा. ७

गोविंदाक्षरमंत्र नित्य जपती त्यां भूतबाधा नसे,
बाधेना विषही. त्रिदोष शमती, चित्तात शांती वसे,
सतीं संग जडे, पुढें मल झडे, वैकुंठ अंतीं चढे,
गोविंदीं, इतरांस दुर्लभचि जें, सायुज्य तेंही घडे. ८

या अष्टकें तुष्टवु वामनाला[१], । बुद्धी उदेली जरि मन्मनाला,
न स्वर्गतो[२] त्यापरि अन्य जोडे[३]; । सुधा पिल्या भूवरि काय गोड ? ९

जुन्या चालीचा.

---

१ देवाला, पक्षीं ह्या नांवाच्या कवीच्या पुत्राला. २ स्वर्गांत असलेल्या, पक्षीं स्वर्गास गेलेल्या.( त्या वामनाला ). ३ लाभ.

# काव्यरत्नावलि.

अंक १२ वा.

## काव्यरत्नावलीच्या संपादकास पत्र.

श्लोक.

वनीं उपवनींहि वा विहरुनी खगांच्या तती
किती वसति भक्षुनी सुफलसस्यबीजाप्रती;
परी रमुनि मानसीं कवण सेवि रत्नावली
मरालकुलनायका ! तुजशिवाय पृथ्वीतलीं ! १

फुलें फुलति कोमलें, सुमधुगंधरंगादिकीं
निसर्गरमणीयता वितरि त्यां विधाता निकी;
परी न असतास तू जरि मधुव्रता पारखी,
तयांचिहि कृतार्थता न दिसती अतासारखी. २

मरंद बहु सेवुनी भ्रमरकोकिलाही जरी
पतत्रिगण गुंगुनी मधुर गायनातें करी,
अलभ्य मधुगंध तो पसरिता दिगंतीं तरी
कृती न कुणि मारुता ! तुजसमान पृथ्वीवरी. ३

सरे दिवस, हें भरे तमहि दृक्प्रमादाकर,
दिसे पथिक आसरा मिळविण्यास चिंतातुर;
अशा समयिं निस्तुल श्रम मला गमे हा निका
उदारहृदया ! तुझा कवनरत्नसंपादका ! ४

रमूनि कमलीं अली भुजगराजही गायनीं
सुखें पडति बंधनीं, परि न जाति तें सोडुनी;

चकोरकुमुदें विधूदयिं धरीति उल्हास कीं;
तशी कवनरत्नि ही रति तुझीहि नैसर्गिकी. ५

बुभुक्षित समस्त हे धनकणाकडे धांवती,
कवित्वनवमौक्तिकें कुणि न हुंकुनी पाहती;
अशा अवसरीं श्रमें करुनि त्याचिया संग्रहा
कवींस दिधला तुवां अगतिकास आधार हा. ६

अहा ! रसिकवर्य तो सुकविलापती भोज गा,
तसा चतुर विक्रमार्कहि त्यजून गेला जगा !
अणीकहि सरस्वतीप्रिय, जिहीं कवी पोशिले,
कसे अहह ! घेउनी रसिकतासवें, लोपले ! ७

जनात विधवा जशी अशुभमूर्ति सन्यासिनी,
तशीच कविता दिसे जनतिरस्कृता योगिनी !
पुनः परिणया हिच्या परि न यत्न कोणी करी
श्रुतिस्मृतिविरोधही नसुनि, चित्र हें भूवरी ! ८

तरी धरिशि तूं करीं कविनिसर्गमित्रा ! हिला,
प्रयत्नहि, तुवां जनां रुचविण्यासही, वाहिला.
धरीं अतुल धैर्य, जें अजवरी तुवां दाविलें;
सुकार्यिं धन वेंचलें-समज तेंच बा जोडिलें. ९

प्रयत्न अमुचा, परी फल नसेच अस्मत्करीं:
स्वकार्य करितो मुदें बुध, फलीं न आशा धरी.
तरी न निजला प्रभू फल सुयुक्त तो अर्पितो.
तदीय भवदीयही सतत मी कृपा याचितो. १०

विहगम.

# श्रीसुदामदेवचरित्र.

## सर्ग ६ वा.

### ( दारिद्र्य–हरण )

श्लोक.

नवां–बुंद–सम–द्युती कशित पीत–वासा कटीं
दिसे रदन–पंक्ति ती स्मित मुखांत शोभे किती
सुभव्य–ललिता–कृती स–वृष–देव ज्या वादिती
असा प्रभु उठाउठी प्रकट जाहला श्री–पती १

' सरीं नलिन वाढतें सर न पंकजीं तें कदा '
असें श्रवणिं ऐकिलें, नयनिं देखिलें सर्वदा.
दया–रस–सरोवरा नयन–कंजि ज्याच्या स्थिति !
असा प्रभु उठाउठी प्रकट जाहला श्री–पती २

धरी प्रभु भुजामधीं कवळुनी सख्यातें हृदीं
उचवळुनि ये तदा प्रभु कृपा–रसाचा निधि !
द्रवे दगडही अहा निरखितांचि मित्रा ! कसा
द्रवेल न कृपा–मृदु प्रभु बघूनि दामा तसा ! ३

स्व–मित्र–शिरिं ढाळितो सलिल–बिंदु हर्षो–द्गत
प्रभू गमत विष्णुसा, द्विजहि शंभुसा भासत.
स्रवे सलिल–जान्हवी उपरि–गेचि नेत्रांतुनी
प्रभु–प्रभुलिया, पडे द्विज–शिवालिया मूर्धनी ४

---

१ सूर्यकांत दगड शब्दानें अतिशय काठिणता दर्शविली जाते. २ सूर्य पक्षी सोबती. ३ दयेनें कोमल अंत.करण ज्याचें आहे असा दगडविरुद्ध. ४ गंगा ही विष्णूच्या पायापासून वाहते, परंतु या वेळीं खालची गती सोडून वर वाहू लागली असा अर्थ. ५ कृष्ण. ६ विष्णु. ७ ब्राह्मण सुदामा रूप शंकर

करीं कर धरूनिया निज--गृहांत जाऊनिया
स्व--मंचि बसवूनिया वदत कृष्ण--राजा तया
' कितीक दिन जाहले तुजसि भेटुनी वत्सला !
मनांत गमलें असें विसरलासि मित्रा मला ! ५

असे वहिनि ना सुखी ? कुशल ना तुझीं लेकरें ?
यथा--सुख असे स्थिती गुरु--वराचिया ना बरें ?
कथीं मजसि सर्वही, अमृत कर्ण--रंध्रा--तरीं
श्रणीं रिचवुनी करी सुखित गा सख्या अंतरीं !' ६

' नभीं तपन तापता तिळ न अंधकार--व्यथा,
तशी गुरु--दयार्द्रता मम शिरीं सदा जागृता
कदापि नुरली कथा मम विपत्तिची सर्वथा !
सदा सुखवि जी नतां, तिळ न वाक्य हें अन्यथा ७

तुझी बघुनिया स्थिती मुदित होय ही मन्मति
तसेंच हृदयाप्रती अमृत--बिंदु ही न्हाणिती !
सुहृत्सुखचि तोषवी अधिक तेवि आनंदवी
सतास म्हणुनी कवी स्तुतिस त्याचिया वर्णवी ! ८

स्वतांचि कमला--लया रगडिते पदा--ब्जांस या
महत्व तव गावया कथन अन्य तें कासया ?
असें असुनिया दया--पर विभो दरिद्रास या
स्मरूनि हरिसी भया ! स्तविल कोण ना या नया ! ९

अशी परिसुनी तदा स्व--सुहृ--दुक्ति शर्म--प्रदा
अ--नंत सुख जाहलें कलि--मला--तका काम--दा
सदा कवि--गणीं हृदीं पुजुनि जो मुखें वाणिला
असे असित वेद ज्या वदत तो प्रभू माणिका १०

' असे निज--कराहिं जें प्रथम--जन्मिं संपादिलें
तदीय फल या जगीं मिळत ऊन ना आगळें
ललाट--लिखितांप्रती पुशिलसा बळी कोण गा !
जरी प्र--बल, वारणें हलविलें कधीं कां नगा ? ११
असो, मजसि काय गा निज--गृहाहुनी आणिलें
उपायन ? सुहृ--द्वरा अजुनि तू न तें दाविलें !
असे विदित या जना तव ममत्व, येशील कां
विरिक्त--कर देखण्या बहुतशा दिनीं हा सखा ! ' १२
हृदीं बुचकळे अशा परिसुनी वचां लागुनी
' करूं पृथुक हे पुढें ! न करुं कां ! ' असा तो मनीं
विचार करि ! जाहलें वदन--कैरव म्लान तें
विपत्ति--तपनें मग प्रभुसि अर्पिलें त्या नतें १३
' तुझे पद सदा धुती सुर--वर स्व--मौली--गत--
स्त्र--गुद्गत--मधु--द्रवें करुनिया शिरां आनत !
अशास वद काय गा तुजसि अर्पणें निःस्वकें ?
परी सख ह्मणूनिया पृथुक अर्पितों हे निके ! ' १४
बघूनि पृथुका हृदीं बहुत हर्षला श्री--पति
तयास मग भक्षुनी वदत देव दाम्याप्रति
' अणूहि दिधलें पुरे मजसि भक्ति--युक्तें नतें
अ--भक्त जरि विश्व दे खचित आवडे या न तें १५
असो, प्रभु--वरें गृहीं सुखवुनी सख्यातें तया
कितीक दिन ठेविलें, अ--सुख धाडिलें तें लया
करूनि गुज--गोष्टिसी, स्मरुनि बाल--चेष्टांप्रति
परस्पर--सुखा--सुखां कथुनि दुःखही हारिती १६

अनंत--चरितां तिथें निरखितां कळे त्याप्रति
असे सु--गुण--रूप--भाक् पुरुष लोकिं हा श्री--पति !
सुदाम मग तो निघे निज--गृहीं यदा जावया
जुळूनि कर--पंकजां स्तवि तदा प्रभूला तया १७

' प्रभु--वरा तुझिया पद--सारसीं । जन असो रत षट्पदसा रसीं
करित जो तुझिया पद--वंदना । अ--शिव तें शिवतें न तया जना १८
तव कथा--श्रवणीं रति जो नर । धरि, तया लघु हा भव--सागर
कधिंहि रुष्ट तयावरि या जनीं । न कमला कमला--लय--वासिनी १९
तुजसि हे सख, यादव हे, असें । वदुनिया अवमानियलें असे !
क्षमुनि तें करिं मुक्त मला प्रभो । जगतिं या गति या न दुजी विभो ! २०
भजसि मुक्ति पुरे नलगे धन । गणिति ज्या कवि पातक--भाजन
असति निर्धन पुत्र विभो घरीं । भवि, तरी वितरी धन त्यांवरी २१
श्रवणिं कीर्ति वसो अघ--हारिणी ! । नयनिं मूर्ति तशी सख--कारिणी !
चरणिं दे स्थिति--अर्पिशि जी जनीं । कवि-बुधां-विबुधा ! मजलागुनी ! ' २२

ऐकुनिया स्तव असा करुणा--रसाचा !
हेलावला प्रभु पयो--धि दया--रसाचा !
स्पर्शूनिया निज करें पदिं आनतातें
आशीर्वचासि द्विधलें मग विश्वतातें २३

' आमृत्यु होशिल सुखी धनधान्ययुक्त
भोगी सुखांस भविच्या असुनी असक्त
या पंचभूतरचितां त्यजितां शरीरा
जाशील मुक्तिस सख्या मग निर्विकारा ' २४

ऐसा दामा तो सुखी नित्य झाला । संसारांतीं मुक्त लागूनि गेला !
गातां ध्यातां कृष्णनाथा जगीं या । भुक्ती मुक्ती लागती सत्य पाया ! २९

श्रीसुदामदेवकाव्य समाप्त.

गणेश--सुत गुणे.

## माझें ज्ञान

आर्या.

हव्यासें मनुजानें कितिही संपादिलें जरी ज्ञान;
तरि अत्यल्प अहो ! तें, किंबहुना सर्वथैव अज्ञान. १
ज्ञानप्राप्त्यर्थाचि मीं आजवरी शिणविलें स्वयें काय;
संप्रति तथापि जगतीं मजला कळतें असें असे काय ? २
असती अनेक भरले सृष्टींत पदार्थ त्यांस नच गणती;
यास्तव भूदेवीला जन " बहुरत्ना वसुंधरा " ह्मणती. ३
सृष्टिरहस्य कळाया सुविचारें मी करीं परिश्रम ते,--
जाती फुकट; तयानें माझी मति मात्र बहुपरि भ्रमते. ४
विषयीं प्रवेश होतो, आरंभीं बुद्धि चालते कांहीं;
ज्ञानहि तितुकेंच असे निश्चित ! जाणीव चांगली का ही ? ५
खुटे ज्ञानगती मग विषयाचा बोध व्हावया पुरता,--
साम्राज्य कल्पनेचें माजे न उपाय अन्य यापरता ! ६
योजुनि अपार युक्ती केलें निर्माण सृष्टिकर्त्यानें,--
हें वस्तुजात अवघें. ' स्मरणें जो सद्गतीस मर्त्या ने ' ७
ईश्वरकृति जाणाया मानव असमर्थ सर्वथा आहे;
शास्त्राहुनि सुज्ञा हें तत्त्व कळे सत्य; हेंच हित पाहे. ८
न्हाया खविज्ञ केले यत्न परंतु न पुरी मिळे सिद्धी;

थोडें कळतें आधीं, मागोनी संशयीं पडे बुद्धी. ९
परिमाण भास्कराचें महांतरें महगती नियम यांचे,
केले प्रदक्षिणांचे सिद्ध; सहज हें मला कळायाचें १०
हें सत्य परंतु कशी त्यांची रचना तयावरी वसती,
कोणी प्राणी करिती कीं नाहीं तेथ केंवि ते असती ! ११
उपजीविका कशानें होते त्यांची न हें मला ठावें;
याविषयीं अज्ञासम मी सुज्ञ न वचन अनृत वाटावें. १२
तें अंतराल राहो ! दूरच तें !! मी परंतु जीवरती,
वसतों स्वतां अहर्निश, तीची तरि माहिती हवी पुरती. १३
तीही पण नाहीं हो ! तिजविषयीं ज्ञान तेंहि मज थोडें;
गुह्य कळाया जावें पुढतीं तों खुटतें तिथें घोडें. १४
पंचमहाभूतें ज्या वदती प्राचीन तत्पृथक्करणा,
करुनी तद्घटकांतें नामें अन्वर्थ मीं दिलीं जाणा. १५
तरि अग्नीस कशानें ये दाहकता, जला प्रवाहित्व;
याचा न शोध लागे उमगेना स्वल्पही मला तत्त्व. १६
सेविति उदकाग्नींतें जन सारे, तत्स्वरूप नोळखती;
माझीहि तशीच गती तेथें धिक् ! काय ही खरी प्रगती ! १७
आधार पदार्थांना नसतांना होय त्यां अधःपतन,
तज्ज्ञ गुरुत्वाकर्षण-फल हें ऐसेंच बोलती वचन. १८
हें मज कळलें पतना आकर्षण लागलें ह्मणायाला;
इतुकाचि बोध मजला या विषयापासुनी असे झाला. १९
होते पदार्थमात्रा पृथ्वीमध्याकडे गती ज्यानें;
तद्रूप परि न कळलें आकर्षण ह्या वरील शब्दानें. २०
प्राण्युद्भिज्ज खनिज हे मुख्य अवांतरहि जाति ज्या त्यांत,
त्याचे वर्ग कळाले मज; झालों निष्णात सृष्टिशास्त्रांत, २१

केलें श्रमोनि हें मीं पण गवताच्याहि एक पाताचें,
पोषण होय कसें हें चातुर्य कळे न विश्वतातांचें. २२

श्लोक.

अहा ! चातुर्याचा निधिच विभु जो सृष्टिकरिता,
धरी हातीं मारू कलम वनपुष्पां चितरिता;
विचित्रत्वा देई करि विविध रंगें सुबकशी,
तया जाणायाला जडमति असे ही क्षम कशी ? २३

ज्याचा सुंदर रंग मंदिरिं भरे तेजस्वि जें माणिक,
शोभे फार मनास कौतुक गमे तो पाचही आणिक,
शिंपाही बहुशा तशा रिझविती रंगें मनातें अती,
धाती नेत्र कळे न ईश्वरकृती गुगे इथें मन्मती ! ! २४

आर्या.

इतर प्राण्यामध्यें दिसतें चातुर्य जेथ मत्नयना;
उपजत बुद्धि तयातें आहे मी बोलतों असें त्यांना. २५
साम्य नराशीं पशुचें तैसें वैधर्म्य शोधण्याला मी,
बहुविध तर्क लढवितों; करितों बद्धीहि खर्चे ह्या कामीं. २६
एकदरींत बघतां जाणति पशु जेंवि मम मनोधर्म;
त्यापरिच मीहि त्याचे जाणें हें एक आतलें वर्म. २७
पक्षी उडति मजेनें आकाशीं, स्वैर करिति संचार;
किंवा अन्य ठिकाणीं जाया निघतात जैं सपरिवार; २८
तैं संकेत तयाचे शद्बहि बहुसाल तेंवि होतात;
अक्षरशत्रुस पंडितभाषा मज ते तसेच अज्ञात. २९
धर्मग्रंथिं खगांची गति जितकी तेवढीच माझीही,
त्यांच्या वर्तननियमीं; नाहीं आधिक्य त्याहुनी कांहीं. ३०

श्लोक.

हर ! हर ! हर ! केले यत्न म्यां ज्ञान व्हाया,
अमित अजवरी ते जाहले सर्व वायां;
मम मति किति पाहू ! ठेवि अज्ञान थोर,
कळुनि मजसि आले सर्वही हें असार ! ! ३१

प्रभुवरकृति कोठें आमुचें ज्ञान कोठें !
लघुतम तिस जाणेना जरी होय मोठें
खचित खचित आहे मानवज्ञान अल्प;
विभुकृति न कळे त्या शोधितां कोटिकल्प ! ३२

झाला मनुष्य जगतात सुविद्यमान्य,
कोणी तयासम नसे जरि सुज्ञ अन्य;
ज्ञानाभिमानहि तथापि तयास लोकां,
दावावया न अवकाश जरा विलोका. ३३

जाणीव ये जरि नरास तरीहि तेणें,
कोती मती ह्मणुनि गर्व न तो वहाणें;
कीं ज्ञान भूषण नसे अपुरेंच बा ! तें;
" गर्वा त्यजीं मनिं धरीं प्रभुच्या पदातें " ३४

" भृंग "

## जीवितकर्तव्य.

पद.

निर्व्याज प्रेमानें मजसह अवडे ज्या वागणें
जगतों जगिं मी त्या कारणें
दयाघनें या मानवतनुला निर्मुनिया पाहिलें
करावें सार्थक मीं योजिलें

कर्तव्याचा बध मनाला सर्वकाल टोंचितो
ईश्वरी इच्छा उपदेशितो
करि मनोराज्य हा तरुणपणीं नर किती
अति उच भराऱ्या मारी गगनाप्रती
करिं धरिन चद्र हा असें ऐसी मती
होते त्याच्या शतांश जनहित व्हावें या हेतुनें
जगावें भूवरि हें वाटणें १

उपकारांची परंपरा ही ज्यांनि करुनि ठेविली
ह्यांनी मजकरितां सोशिली
त्याचे मागुनि त्या मार्गानें जावें हें वाटतें
जातां दुःख सर्व आटतें
स्वदेशमुक्तिव्रतधर सत्कवि सज्जन साधू निके
तयांचें चरित्र गाऊ मुखें
ही विपुल असे महि काल अनावर असे
यदुदरीं जन्मती अनत रत्नें तसे
उभयास भूषविति अपुल्या करणीमिषें
नररत्नांचीं गाणीं गाउनि यशप्रभेनें जनां
दिपवू घालुनि ज्ञानांजना २

मान्य वाल्मिकी कविवर झाला भविष्य लिहिलें करीं
रघुवर कृती करी त्यापरी
भक्ताजनास्तव अनत लीला परमेश्वर तो करी
ज्ञानी जाणतसे अतरीं
भारतयुद्धीं अवतरली जी गीता तीच्यापरी
लागता काय उणें भूवरी

दव्यार्जन करणें जननहेतु हा नसे
सदसद्विचार जागृत ठेवुनि वागूं असें
आणितां मनीं त्या अशक्य कांहीं नसे
उज्ज्वल होइल हें सारें जग लाभतील तीं सुखें
स्वर्गच येइल उतरुनि इथें ३

सत्यस्वरूपा माझ्या जाणुनि मजसह जो वागतो
जीवित त्याकारण ठेवितों
सहाय व्हावें ज्याच्या वसते इच्छा ही अंतरीं
सेवा करितों त्यांची परी
कुमार्गगामी सुहृज्जनानां परावृत्त हा करी
करूनी यत्न सदा परोपरी
कवि सर्ग लिही मग काव्य पूर्ण होतसे
कादंबरिकारहि पाडि भाग हे तसे
कालाचे अवयव सर्व वाटती असे
थेंबे थेंबे तळें साचतें तत्व मनीं आणुनीं
करावी सत्कृति सर्वहि जनीं ४

वनवासी.

## भृंग.

गाणें

भृंगा ! दंग अहा ! होसी, । गुंगत धांव वनीं घेसी;
तुजमागुनि वाटे यावें, । गोड फुलें चुम्बित गावें ! १
रवि येत असे उदयातें, । अरुणतेज विलसित दिसतें;
तरी तिमिर हा विरळ असे । धुकें भरुनि न स्पष्ट दिसे. २

कविच्या हृदयीं उज्ज्वलता । आणिक मिळती अधुकता;
तीच स्थिति ही भासतसे । सृष्टी कवयित्रीच दिसे ! ३
तिच्या कल्पना या गमती । कलिका येथें ज्या फुलती
सुगन्ध यातुनि जो झुकतो । रस त्यांतिल तो पाझरतो ! ४

भृगा ! आणि तुझें गान । सृष्टीचें गमतें कवन !
गा तू गा ! नादी भ्रमरा ! । मी गणमात्रा जुळणारा ! ५
शुक पंजरबन्धीं घालू, । त्या पढवू नरवाग् बोलू,
श्रुतिवैचित्र्या बघणारे । आह्मी मात्रा जुळणारे ! ६

कवि आह्मांलागुनि ह्मणणें । कविशब्दार्था लोळविणें !
अस्मद्गान नव्हे गान, । तें गाना चिंध्यादान ! ७
परन्तु भृगा ! तव गान । परमानन्दें परिपूर्ण !
उदासीन ही जगाविशीं । तव तन्मयता सृष्टीशीं ! ८

अस्मदीय हृदयीं ठरलें । कीं जग हें दुःखें भरलें !
ह्मणुनी सुन्दरतेलाही । कुसें अह्मां दिसती पाहीं ! ९
परि तव गानातून, अले, । थबथबला हा भाव गळे:--
" गुङ् गुङ् गुङ् गुङ् !--भान नसे !-- । सृष्टि अहा गुङ् ! मधुर असे ! १०
" दुःख--वदा तें कोंठे असे ? । अश्रू--तें हो काय ? कसें ?
फुलें फुलति--परिमल सुटती-- । रस गळती--गुङ् ! सौख्य किती ! " ११
जाइ, जुई, मोगरी भली, । कमलिनीहि सुंदर फुलली;
मधु यांचा सेवुनि गोड । पुरवी तू अपुलें कोड ! १२

प्रीति, चारुता, आनन्द, । याचे गा मधुरच्छन्द;
प्रीति, चारुता, आनन्द, । सिंचिति सृष्टीचा कन्द ! १३
वरुनि नभातुनि चंडोल । ओतीतसे हेचि बोल;
खालीं तव गुंजारव हा । प्रतिपादितसे तेंचि अहा ! १४

श्लोक.

होईल का रसिकता तव लब्ध मातें !
गुंगी मिळेल मजला तव केधवां ते !
येतें मनांत तुझियासम भृंग व्हावें,
वेलींमधूनि कलिकांवरुनी झुकावें । १९

केशवसुत.

## पंचरत्न

श्लोक.

तोयें पंकज, कीं मदें गज, निशा पूर्णेंदुनें शोभते
शीलानें प्रमदा, जवें हय, तसें नित्योत्सवें सद्म तें
वाणी व्याकरणेंहि, हंसमिथुनीं सिंधू, सभा पंडितीं
हे लोकत्रय विष्णुनें, कुल सुतें, पृथ्वी नृपें शोभती १
नौका दुस्तर ही समुद्र तरवी, ध्वांता हरी दीपक
पंखा ताप हरी; मदान्ध करिच्या गर्वा हरी अंकुश
कांहीं एक परी उपाय कथिला नाहीं विधीनें जया
बाटे दुर्जनचित्तवृत्तिहरणीं कांहीं सुचे ना तया २
वैद्या पानरता, नटा कुपठिता, स्वाध्यायहीना द्विजा
युद्धीं भ्याड नरा, यतीस अबुधा, ना नाल ऐशा हया
राजालाहि कुमन्त्रिवेष्टित अशा, देशास सोपद्रवा
भार्येला मदगर्विता पररता, सोडा नको बान्धवा ३
नादे शान्ति कशास ढाल, अरिभी क्रोधी नरा काय ती
ज्ञाती साह्य न अग्निभी, जरि सुहृत् दिव्यौषधी ती किती
आहे दुर्जनसंग काय अहिभी, श्री काय विद्येविण
साधे काव्य कशास राज्य, असता लज्जा नको भूषण ४

छत्रानें रवितापं शीघ्र शमतो, वन्हीं जळानें शमे
आटोपे गज अंकुशें, चपल तो गोऱ्हाहि दंडा नमे
जातो रोगहि औषधें हरितसे मंत्रें विषाला बुध
सर्वा औषध सांपडे परि जगीं मूर्खा नसे औषध १

मोरो गणेश लोंढे.

## सुमनगुच्छ.

### श्लोक.

सकल आक्रमुनी नभ भास्कर । उतरला हळु तो क्षितिजावर
समिप वल्लभमूर्तिच पातली । मुदित पश्चिमदिग्वधु जाहली १
समय, शांत सुखप्रद अंतरीं । बघुनि ताप उरेल कसा तरी
वनविहारअचंचलकामना । निपजलीच खरोखरि मन्मना २
चढवुनी वसनें स्वतनूवरी । वनपथा धरिं सोत्सुकअंतरीं
फिरत मी निमिषीं वनिं येवुनी । सकल पाहिं वनश्रिस लोचनीं ३
मरुत मंद सुशीतल हालवी । सकल आम्रततीमृदुपल्लवी
कुसुमसौरभयुक्त बने वन । मुदित होय तरी किति मन्मन ! ४
विविध पक्षि तरूंवरि बैसुनी । करिति सुस्वर गायन काननीं
विहगशर्मदगायन ऐकिलें । अतुल हर्षभरें मन हें डुलें ५
विपिनवास निरंतर शर्मद । मज गमे पुरवासाचि तापद
छळिति षड्रिपु हे मनुजां पुरीं । शिवति ते न कधीं विपिनांतरीं ६
करि विचार असा जइं मीं मनीं । नवल एक दिसे मज काननीं
कनकरत्न--अलंकृत सुन्दरी । गजगती फिरतां दिसली दुरी ७
शशिमुखी ममसन्निध पातली । बघुनि मद्वदना मृदु हांसली
त्रिविधपुष्पसुगुच्छमनोहर । मम करीं दिधला धरुनी कर ८
कुसुमगुच्छ सुवासिक देउनी । त्वरित जाहलि गुप्त विलासिनी

सुमनसौरभलोलुप जाहलों । मुदितमानस मी गृहिं पातलों ९
कुसुमगुच्छ मनोहर ठेविला । जपुनि मी सदनीं अति सुस्थला
युवतिनें मज का दिधला करीं । करि विवेक न गूढ कळे परी १०
पुढति एक दिनीं करिं घेतला । सुमनगुच्छ विवर्णहि पाहिला
बघुनि तत्स्थिति ये द्रव मन्मनीं । खळखळा गळलें जळ लोचनीं ११
प्रथम जें सुखदा अपुल्या मना । पुनरपी उलटी करि भावना
बहुत सुंदर जें जगतीं तया । स्थिरपणा असणार कुठूनिया १२
" काळा ! किती निर्दय तू जगांत । दया तुझ्या अल्प न अंतरांत
ग्रासोनिया गुच्छसुपुष्पकाय । हा ! हा ! मिळालें तुज सौख्य काय ! १३
ऐसें रडोनी अति शोक केला । म्यां ढाळिलें हो नयनोदकाला
झाली धरा सान्द्र, तदा दिसे कीं । पुढील अश्वासनयुक्त पक्षी १४
" काळास तू देसि कशास दोष । सोडूनि दे तूं मनिंचाच रोष
प्रत्येक वस्तू जगिं नष्ट होई । त्याच स्थितीमाजि तुझी तनूही १५
तारुण्य आहे कुसुमासमान । वायां मुळीं तें दवडीं नरा न
पुष्पें जशी तोषविती सुगंधें । तैसें जनां तोषवि तूं स्वकर्में " १६

जगन्नाथ वामन हर्षे.

## सुभाषित.

आर्या.

हर्ष नसे धन येतां दुःख न विपदेंत धीर समरांत
विरळा निपजे ऐसा जननीसुत थोर जो वसुमतींत १
सुजन व्यजनचि गमती उत्तम वंशांत जन्म ज्यां जाले
श्रमवून आपणाला ज्यांनी परतापनाशना केलें २

मोरो गणेश लोंढे